
# माणूस

औषध
चार वेळा हलवून घेणे !

किंमती
चार वेळा पाहून घेणे !

वार २३ सप्टेंबर १९७०

४० पैसे



बुधवार, २३ सप्टेंबर १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : विसावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |
| किमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

¤ नेहमीप्रमाणे दि. १२ सप्टे. ७० चा अंक हातात पडला. अधाशाप्रमाणे वाचून काढला. विशेषतः सौ. सुलोचना घोटीकर यांची 'त्रिशंकू' कथा फार आवडली. आपल्या प्रतिनिधीने माणूसच्या वाचकांना सादर केलेला 'चक्क पंधरा दिवस कापूस व्यापारी संपावर होते' हा लेख अत्यंत वाचनीय आहे व उद्‌बोधकही आहे.

'सायकेडेलिक' हा श्री. विजय तेंडुलकरांचा लेख चांगला आहे.

१२ सप्टेंबर, १९७० — नृसिंह लि. दांडगे, नांदेड

¤ मी आपल्या पहिल्या जनता अंकापासून वाचक आहे. आपल्या मासिकाच्या प्रगतीकडे कौतुकाने पहातो. माझ्या इतर भाषी मित्रांना माणूसची ओळख करून दिल्यापासून ते सुद्धा प्रत्येक अंक चाळून पहातात. माणूस द्विसाप्ताहिक झाल्यावर ते अधिक सर्वांगसुंदर होईल अशी आशा होती, पण ती आशा फोल ठरली आहे. राजकारण आणि सिनेमा, नाटके ह्यांची परिक्षणे ह्याने अर्धी अधिक पाने भरलेली असतात. आता गेल्या ४–५ अंकांचेच उदाहरण घेऊ. अरुण गोसावींनी लागोपाठच्या २–३ अंकात व एका अंकात सदाशिव पेठकरांनी बेळगावच्या प्रश्नाविषयी चर्वित-चर्वण केले आहे. अहो आम्ही वर्तमानपत्रात रोज राजकारणाविषयी वाचतो. त्या-

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक

शिवाय लोकांच्या गप्पा (त्यांना त्यातले काही समजत नसतानासुद्धा) राजकारणावर चाललेल्या असतात. मोकळ्या वेळात माणूस वाचावा तर त्यात परत राजकारण. तर कृपया जरा राजकारण कमी करा बुवा. आपण माणूसला समग्र साप्ताहिक म्हणता पण काही विषयांचे आपल्याला वावडे दिसते. उदा. क्रीडाविषयक सदर. २ वर्षापूर्वी श्री. रेगे आपल्या अंकांतून क्रीडाविषयक लिहावयाचे. नंतर ते आपण बंद केले. तसेच प्रवासवर्णने. मात्र माणूसचे मुखपृष्ठ नेहमीच चांगले असते व त्यात तोच तो पणा कधी नसतो. तसेच विजय तेंडुलकरांचे रातराणी हे सदर. वसंत सरवट्यांची चित्रे ही सुद्धा एक जमेची बाजू आहे. पण त्यात सुद्धा बऱ्याच वेळा राजकारणावर विनोद असतात. माणूसवरील प्रेमापोटीच ह्या सूचना केल्या आहेत. तेव्हा त्याचा रोष नसावा.

१२ सप्टेंबर, १९७० — अशोक म. जोशी, ठाणे

□ 'रोखलेल्या बंदुका...' लेखमाला फारच सुरेख आहे. अनिल बर्वे यांचे मनःपूर्वक अभिनंदन. नक्षलवाद्यांना केवळ गुंड म्हणून उपेक्षिणाऱ्यांना त्यांची लेखमाला छान उत्तर आहे. नक्षलवादी आततायी, भयंकर कृत्य करतात म्हणून त्यांचा तिरस्कार करण्याआधी त्यामागची परिस्थिती, कारणे याचा विचार केला जात नाही. सत्ता आणि स्वार्थ यांनी धुंद झालेल्या पुढाऱ्यांची राजवट आणि जुलूम जो समाज नेभळटपणे सहन करतो त्याला नक्षलवाद्यांना देशद्रोही म्हणून धारेवर धरण्याचा काही अधिकार नाही. गरीबांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन लाखोंच्या रक्ताचे शोषण करणाऱ्या जमीनदार, सावकारांचे मुडदे पडले तर 'अत्याचार, अत्याचार' म्हणून ओरड करणे मूर्खपणा आहे. नक्षलवाद्यांना देशद्रोही म्हणून चिरडून टाकण्याची भाषा करणाऱ्या राष्ट्रवाद्यांनी प्रत्यक्ष राज्यकर्ते किती देशप्रेमी आहेत याचे संशोधन करावे. नक्षलवाद्यांना विरोध करणाऱ्यांना तो बौद्धिक पातळीवरून करावा लागेल. नक्षलवाद्यात आज अनेक विचारवंत सामील होताहेत. ज्यांना तो मार्ग आततायीपणाचा वाटत असेल त्यांनी पुढे येऊन नवीन मार्ग सुचवावा, तो यशस्वी करून दाखवावा. तसे झालेच तरच नक्षलवाद नष्ट होईल. नाही तर आज तो ग्रामीण भागात व कलकत्त्यापुरता मर्यादित, पण एक दोन वर्षात देशभर पसरण्यास वेळ लागणार नाही. आज नक्षलवाद्यांचे लक्ष सावकार जमीनदार आहे तेच उद्या शेकडो एकर जमीन बाळगून जनतेला क्रांती आणि शांतीचे पाठ देणारे मंत्री हे होईल. 'देशप्रेम राष्ट्रनिष्ठा या भरल्यापोटी बोलायच्या गोष्टी. भुकेल्या पोटांना त्यांचा अर्थ समजत नसतो', हे सर्वांना कळून चुकले.

नक्षलवाद्यांची ध्येयनिष्ठा, तळमळ, प्रामाणिकपणा, विशिष्ट ध्येयासाठी सर्वस्वाचा होम करण्याची वृत्ती याचे दर्शन घडविल्याबद्दल अनिल बर्वे यांचे पुन्हा एकवार अभिनंदन.

११ सप्टेंबर, १९७० — अवधूत परळकर

# हा व्यवहार आहे : किफायतशीर व्यवसायही आहे

काही काही गोष्टी अशा असतात की ज्यांच्या सत्यतेसंबंधी आपल्याला मुळीच शंका नसते; परंतु त्याचबरोबर पुराव्यानिशी त्या सिद्ध करणे सर्वस्वी अशक्य असते. आपल्या सर्वांनाच काळाबाजार आता इतका परिचित झालेला आहे की आपण ही वस्तु काळ्याबाजारात खरेदी केलेली आहे हे सांगताना एखादा पराक्रम केल्यासारखा अभिमान वाटतो. आपल्या देशात प्रत्यही सरकारी कर चुकवून हजारो लहानमोठ्या वस्तु येत असतात, आणि त्यांचा व्यापार राजरोस सुरू असतो. सरकारी कचेरीतील आपले महत्त्वाचे काम संबंधित अधिकाऱ्याचे हात ओले केल्याशिवाय पूर्ण होत नाही ही गोष्ट गृहीत धरूनच आपण सरकारी कचेरीमध्ये प्रवेश करीत असतो. लाचलुचपत आपल्या देशात किती बोकाळलेली आहे हे श्री. श्रीप्रकाश यांनी मोठ्या गमतीदार शब्दात सांगितले आहे. ते म्हणतात की 'मी लाच घेणार नाही अशी ग्वाही देऊ शकतो; परंतु लाच देणारच नाही अशी खात्री देणे मला अशक्य आहे.'

जातीयवादी प्रचाराबाबतही हीच गोष्ट आहे. अगदी प्रधानमंत्र्यापासून तो जिल्हा परिषदेच्या अध्यक्षापर्यंत सर्वजण वेळीअवेळी जातीयवादाशी मुकाबला करण्याचे लोकांना आवाहन करीत असतात, परंतु हीच मंडळी निवडणुकीच्या आखाड्यात उतरली की तो आखाडा जिंकण्यासाठी जातीयवादाचाच मनःपूत वापर करीत असतात असे आपल्याला नेहेमी आढळून येते. या संदर्भात गेल्या वर्षीच्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीचे उदाहरण नेहेमी डोळ्यासमोर येते. आपल्या पक्षातील 'सिंडिकेट गटा'ला हतप्रभ करण्यासाठी श्रीमती इंदिरा गांधी यांनी त्या गटावर स्वतंत्र पक्ष आणि जनसंघ यांच्याशी बोलणी केल्याचा आरोप केला होता. मात्र हा आरोप त्यांनी स्वतः उच्चारला नाही. त्यासाठी त्यांनी फकरुद्दीन अली अहमद आणि जगजीवनराम यांची निवड केली होती. या दोघांवरच त्यांनी ही जबाबदारी का सोपविली याची लोकांना सांगण्याची कारणे कोणतीही असोत, आपल्या पक्षातील मुस्लीम आणि हरिजन सदस्यांनी सिंडिकेट गटाविरुद्ध पवित्रा घेऊन आपल्या बाजूने उभे रहावे हाच या कारवाईमागचा खराखुरा उद्देश होता. आणि हीच मंडळी जातीयवादाचा बीमोड करण्याची भाषा करीत असतात.

एवढ्यावर ही विसंगती थांबत नाही. आलेली सत्ता आपल्याच हाती रहावी यासाठी किंवा हिरावून गेलेली सत्ता पुन्हा आपल्याकडे यावी यासाठी नवकाँग्रेसपासून डाव्या कम्युनिस्टांपर्यंत सर्व इहवादी पक्ष केवळ जातीयवादी पक्षांशीच नव्हे तर प्रच्छन्न जमातवादी आणि निःसंदिग्ध प्रादेशिकवादी पक्षांशी आणि गटांशी विनासंकोच हात मिळवणी करीत असतात. म्हणून तर जनसंघ हा जातीयवादी

पक्ष आहे, परंतु मुस्लीम लीग मात्र आम्ही जातीयवादी मानीत नाही असे श्री. गोपालन यांच्यासारखा डावा कम्युनिस्ट नेता सांगू शकतो. त्याचप्रमाणे निव्वळ जाट समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या चरणसिंगांच्या भारतीय क्रांतिदलाशी सत्तेची भागीदारी पत्करायला इंदिरा गांधी यांना कोणताच संकोच वाटत नाही.

थोडक्यात सांगायचे झाले तर व्यासपीठावरून बोलावयाच्या राजकारणाचा निवडणूक जिंकण्याच्या राजकारणाशी काहीही संबंध नसतो असेच आपले राजकीय पक्ष मानतात. म्हणजे देवपूजा करून आणि गळयात कोणत्या तरी साधूच्या (आणि साधू न भेटल्यास बुवाच्या) नावाने माळ घालून पेढीवर येणाऱ्या व 'हा व्यवहार आहे' असे नाडलेल्या शेतकऱ्याला सांगून त्याच्याकडून बेसुमार व्याज उकळणाऱ्या व्यापाऱ्यामध्ये आणि सत्तास्पर्धेच्या व्यापारामध्ये गुंतलेल्या या राजकारणी मंडळींमध्ये तसा फारसा फरक नाही.

आणि 'हा व्यवहार आहे' असे हे लोक एकदा सांगू लागले की स्वत:च केलेले निमय स्वत: मोडल्याबाबत त्यांना दिक्कत वाटू नये हेही ओघानेच येते. निवडणुकीच्या वेळी कोणी किती खर्च करावा यासंबंधी निवडणूकमंडळाने काही निश्चित नियम केलेले आहेत. हा नियम करण्यामागचा उद्देश स्पष्ट आहे. दुर्दैवाने अद्यापही आपल्या देशातील बहुसंख्य मतदार अशिक्षित वा अल्पशिक्षित आहेत आणि शिवाय ते दारिद्र्याने गांजलेले आहेत. त्यामुळे केवळ आपल्या थैलीच्या जोरावर एखाद्याला निवडणूक जिंकणे शक्य होऊ नये या हेतूने निवडणूक मंडळाने उमेदवाराने करावयाच्या खर्चावर मर्यादा घातलेली आहे. परंतु आतापर्यंत चार सार्वत्रिक निवडणुका होऊन गेल्या. राज्य-विधानसभांच्या गेल्या दोन वर्षामध्ये मध्यावधी निवडणुकाही बऱ्याच होऊन गेल्या. परंतु यापैकी एकाही वेळेला, एकाही उमेदवाराकडून खर्चासंबंधीचे नियंत्रण पाळले गेले आहे असे म्हणता येणार नाही. अर्थात प्रारंभी म्हटल्याप्रमाणे ही गोष्ट सर्वांना माहीत असली तरी सिद्ध करणे बरेच कठीण; किंबहुना जवळजवळ अशक्यच असते. कारण निवडणुकीसाठी प्रत्यक्ष होणारा खर्च आणि निवडणूक मंडळास सादर केला जाणारा हिशेब यातही तफावत असते. तिचा तपशील कागदावर उपलब्ध होत नाही.

तरीदेखील अधून मधून ही अशी प्रकरणे न्यायालयांकडे जात असतातच. यापैकी एक प्रकरण तर सर्वोच्च न्यायालयात दाखल झाले होते. या प्रकरणाचा विचार करताना सर्वोच्च न्यायालयानेही निवडणूक हा पैशाचा खेळ झाला असल्याचे आपले मत नमूद केले आहे. हा पैशाचा खेळ दोन प्रकारांनी खेळला जातो. एक तर पैसेवाले उमेदवार आपला स्वत:चा पैसा अनेक हातांनी वाटत असतात. परंतु राजकीय पक्ष तर अनेक बड्या भांडवलवाल्यांकडून निवडणूक खर्चासाठी पैसा गोळा करीत असतात. भांडवलदारही या 'दाना'कडे व्यवहाराच्या काटेकोर दृष्टीतूनच पहात असतात. साधारणत: ही मदत सत्ताधारी पक्षाला किंवा सत्तेवर येण्याची शक्यता असलेल्या पक्षाला दिली जाते. त्यामुळ तो पक्ष सत्ताधिष्ठीत झाला की भांडवल-

दारांना त्यांनी पूर्वी केलेले दान सवलतींच्या रूपाने दामदुपटीने वसूल करता येते. अनेक बड्या कंपन्यांच्या गैरव्यवहाराबाबत संसदेत चर्चा होते, या गैरव्यवहारांची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्याची मागणी केली जाते; परंतु सरकारकडून त्याबाबतीत जी टाळाटाळ वा दिरंगाई होते तिच्यामागचे कारण न सांगताही समजते.

१९६७ मधल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर तर भारतीय राजकारणाचे स्वरूपच बदलून गेलेले आहे. स्वतःला अखिल भारतीय म्हणविणाऱ्या पक्षांचे स्वरूप प्रदेशवार बदलत गेलेले आहे. त्याचप्रमाणे कोणत्याच पक्षाला निर्विवाद बहुमत लाभण्याची शक्यता दुरावत चालल्यामुळे प्रत्येक राज्यात लहान लहान पक्षांचे पेवच फुटलेले आहे. अस्थिर राजकारणामध्ये या अशा लहान पक्षांना खूपच महत्त्व येते. कारण त्यांच्या पाठिंब्यावरच कोणत्याही पक्षाचे सरकार उभे राहते आणि त्यांनी पाठिंबा काढून घेतला की ते कोसळते. बिहार, उत्तरप्रदेश, पंजाब आदी राज्यांनी या राजकारणाचा भरपूर अनुभव घेतलेला आहे. त्यामुळे कसेही करून निवडून येणे आणि आपला लहानसा गट बनविणे हा किफायतशीर व्यवसाय झाला असून त्यासाठी निवडणुकांच्या वेळी भरमसाठ पैसा खर्च करण्याविना, या स्पर्धेत उतरणाऱ्या पक्षाला, गटाला वा व्यक्तीला पर्याय उरलेला नाही.

अर्थात याचा अर्थ कायदा नको असे करणे अधिकच चुकीचे ठरेल. कारण कायद्यामुळे आज जी गोष्ट लपतछपत आणि अंधारात केली जाते ती कायदा नसला तर उजळ माथ्याने केली जाईल आणि त्यामुळे थैलीशहांच्या उन्मत्त वर्तनास अधिकच ऊत येईल. उलट सध्याचा कायदा अधिक कडक केला पाहिजे आणि त्यादृष्टीने मुख्य निवडणूक आयुक्तांनी गेल्या वर्षीच्या मध्यावधी निवडणुकींचा अनुभव जमेस धरून केंद्र सरकारला काही सूचना केलेल्या आहेत. सरकारने त्या सूचनांचा स्वीकार केला असून त्याआधारे नवा निवडणूक कायदा करण्याचा विचार असल्याचे केंद्रिय कायदामंत्री श्री. हनुमंतय्या यांनी संसदेस सांगतले आहे.

हा कायदा जेव्हा कार्यवाहीत येणार असेल तेव्हा येवो. परंतु तेवढ्याने निवडणुकामधील अपप्रवृत्तींना आळा बसणे शक्य नाही. कायदा करणाऱ्यांपेक्षा कायदे मोडणारे अधिक चतुर असतात हा अनुभव काही नवा नाही. म्हणून सर्व पक्षांच्या प्रमुखांनी याबाबत आपल्या पक्ष कार्यकर्त्यांवर काही निर्बंध लादून घेतले आणि आपल्या उच्चार–आचारात सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला तरच 'निवडणुका म्हणजे निव्वळ पैशाचा खेळ आहे' ही आजची परिस्थिती बऱ्याच प्रमाणात निवळू शकेल.

सत्ता संपादनासाठी विचित्र शय्यासोबतीला चटावलेले राजकीय पेंढारी एवढा संयम दाखवतील अशी अपेक्षा बाळगणे म्हणजे आपणच आपली फसगत करून घेण्यासारखे ठरणार आहे.

—सदाशिव पेठकर

# राज्ये : स्वायत्ततेचा प्रश्न आणि राष्ट्रीय ऐक्य

गुजरात आणि बंगालात नेहमी येणाऱ्या महापुरांनी चांगलाच हाहाःकार यंदाही उठवून दिला आहे. बंगालात अजून शेकडो चौरस मैल जमीन पाण्याखाली अडकून पडली आहे. पुरामुळे नक्षलवाद्यांच्या आततायी कृत्यांना काही बाध आलेला नाही. उलट त्यांच्या दहशतवादी कारवायांना जोरच चढू लागला आहे. त्यामुळे नुकतेच बंगाल सरकारने एक पत्रक काढून दहशतवादी कृत्यांना आळा घालण्यासाठी आपल्या हाती अधिकार घेतले आहेत. असे अधिकार १९३२ साली अविभाजित बंगाल सरकारने घेतले होते. नक्षलवाद्यांना दडपून टाकण्यासाठी या अधिकारांचा कितपत उपयोग होतो हे बघायचे.

अपेक्षेप्रमाणे तामीळनाडूच्या द्र. मु. क. सरकारविरुद्धच्या अविश्वासाचा ठराव नापास झाला. पण ठरावावरील चर्चेमध्ये एक गोष्ट मात्र स्पष्ट झाली. ती ही की द्र. मु. क. पक्षात गंभीर मतभेद आहेत. मुख्यमंत्री करुणानिधी यांनी नुकतेच राज्यातल्या मंत्र्यांसाठी ‘ कामराज योजने ’चे मंत्रावगहन केले होते. त्याचा परिणाम तामीळनाडूचे एक ज्येष्ठ मंत्री एल्. मधोकझनग यांच्या राजिनाम्यात झाला. पक्षातील अंतर्गत फुटीचे हे गमक मानले जात आहे. अविश्वासाच्या ठरावावरील चर्चेत हेही स्पष्ट झाले की द्र. मु. क. चे मित्र आता त्या पक्षावर नाराज होत आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे आतापर्यंत द्र. मु. क. सरकारला पाठिंबा देण्यात स्वतंत्र आणि कम्युनिस्ट या एकमेकांचे तोंड न पाहणाऱ्या पक्षात मोठी अहमहमिका होती. आता हे दोन्ही पक्ष द्र. मु. क. ला सोडताहेत असे दिसते. कम्युनिस्टांचे म्हणणे द्र. मु. क. आता प्रतिगामी बनत चालला आहे. तर द्र. मु. क. खासदारांनी तनखे–विधेयकाला पाठिंबा दिला म्हणून स्वतंत्रांची नाराजी. अर्थात या दोन्ही पक्षांच्या राजी–नाराजीमुळे सध्याच्या द्र. मु. क. सरकारचा केसही वाकडा होऊ शकत नाही ही गोष्ट अलाहिदा. पण ७२ च्या निवडणुकांचे काय सांगावे ?

बाहत्तरची तयारी म्हणूनच की काय द्र. मु. क. ने मद्रासमध्ये नुकतीच एक ‘ राज्य स्वायत्तता परिषद ’ भरविली होती. राज्यांनी बरीचशी स्वायत्तता देऊन केन्द्र सरकारचे अधिकार कमी करावे अशी या परिषदेची मागणी आहे. त्यामुळे देश अधिकच बळकट होईल असे परिषदेचे म्हणणे आहे. अकाली दलाचे प्रतिनिधीही तिथे हजर होते. त्यांनी या मागण्यांना पाठिंबा दिला. परिषदेत बोलताना करुणानिधींनी इषाराही दिला की स्वायत्ततेची मागणी मान्य झाली नाही तर राज्यांच्या फुटीर प्रवृत्ती वाढतील.

स्वायत्ततेच्या तत्त्वाला दोन बाजू आहेत. संपूर्ण देश जर अमेरिकेसारखा एकाच विचारप्रणालीचा असेल तर राज्यांची स्वायत्तता देशाला भरभराट आणू शकते आणि केन्द्राला अधिक बळकट करू शकते. पण परस्परविरोधी विचारप्रणालींनी व्यापलेली राज्ये एका ढिल्या फेडरेशनमध्ये कशी टिकून राहणार? थोडी संधी

मिळताच ती फुटून निघतील.

गेल्या आठवड्यात सर्वात जास्त मथळे मिळविणारे राज्य अर्थातच उत्तर प्रदेश. या प्रचंड राज्यातील राजकीय अस्थिरता हा एक चिंतेचा विषय आहे. भारतीय क्रांति-दलाच्या चरणसिंगांची महत्त्वाकांक्षा व उत्तरप्रदेश खिशात घालण्याची ईर्षा यातील संघर्षामुळेच या राज्यातील राजकारणाला धार चढली आहे. अर्थात या गलिच्छ राजकारणामुळे राज्यातील लोकांचे काय मातेरे होत असेल याची कल्पनाच नको.

तनखे-विधेयकावरील मतदानामुळे नवी काँग्रेस आणि भा. क्रां. द. च्या मधु-चंद्रावर कायमचा पडदा पडला. त्याआधी तर भा. क्रां. द. नव्या काँग्रेसमध्ये विसर्जित करण्यासाठी बोलणी चालू होती. नवी काँग्रेस विशेषत: त्या पक्षाचे केंद्रीय नेते—मुख्यत: इंदिराबाई—तर यासाठी खूपच आसुसली होती—पण चरणसिंगांची महत्त्वाकांक्षा अपार. ते मूळचे काँग्रेसचेच. पण १९६२ मध्ये राज्यातील काँग्रेस पुढाऱ्यांशी मतभेद होऊन त्यांनी तो पक्ष सोडला. काँग्रेसमधील दुफळीनंतर त्यांना आपल्या जुन्या पक्षात यावेसे वाटत होते. पण परत यायचे म्हणजे नुसतेच नाही. राज्यांचे मुख्यमंत्रिपद तर त्यांना सोडायचे नव्हतेच. पण परत आल्यास उ. प्र. प्रदेश काँग्रेसवरही आपलीच पकड बसविण्याची त्यांची मनीषा होती. त्यासाठी कमलापती त्रिपाठींनी बाजूला व्हावे असे त्यांचे प्रयत्न होते. प्रदेश काँग्रेसवर तर त्यांना सर्वदूर आपली माणसे पेरून ठेवायची होती.

कमलापतींना हे सहन होणे शक्य नाही. ते राज्य आपल्या मुठीत आणण्यासाठी इंदिराबाई वाटेल ती किंमत देतील. पण कमलापतींना अर्थातच हे धोक्याचे आहे—त्यामुळे विसर्जनाचा कार्यक्रम फसला.

त्यानंतरच्या तनखे—विधेयकामुळे हे दोन पक्ष आणखीच दूर गेले. आता नव्या काँग्रेसने भा. क्रां. द. शी पूर्ण काडीमोड घेण्याचा निर्णय केला आहे. याचा अर्थ उ. प्र. मंत्रिमंडळातील नव्या काँग्रेसचे मंत्री राजीनामे देतील असा नव्हे. नव्या काँग्रेसचे प्रयत्न असे आहेत की चरणसिंगांनीच राजीनामा द्यावा. कोणीही राजीनामा देवो, उ. प्र. चे संयुक्त सरकार आता संपत आले आहे.

पण या प्रकारामुळे भा. क्रां. द. पेक्षा नव्या काँग्रेसचाच अधिक तोटा होईल. नवी काँग्रेस झाल्या झाल्या चरणसिंग सरकारला पाठिंबा द्यायला जुनी काँग्रेस आणि जनसंघ उत्सुक आहेत. नवी काँग्रेस बाजूला होण्याचीच ते वाट पहात आहेत. चरणसिंगांचे सरकार कोसळण्याऐवजी ते या पक्षांच्या जोरावर अधिक रुबाब करून नव्या काँग्रेसचे नाक खाजवतील.

दरम्यान नव्या काँग्रेसच्या पुढाऱ्यांचे भा. क्रां. द. आमदार फोडण्याचे प्रयत्न चालू आहेत. उत्तर प्रदेशात राजकारणामध्ये जातींना महत्त्वाचे स्थान आहे. चरणसिंगाचा गट पक्का आहे याचे कारण जातीय निष्ठाच. नव्या कांग्रेसला या नव्या उद्योगात किती यश येते हे तो प्रश्न हा जातींचा प्रश्न कसा सोडवितो यावर बव्हंशी अवलंबून आहे.

—अरुण गोसावी

# कात्रणे । कातरणे

## चर्चिल यांचा भीषण पराभव

भारताला स्वातंत्र्य देण्याचा प्रस्ताव ब्रिटिश पार्लमेंटपुढे जेव्हा अॅटली यांनी मांडला तेव्हा त्याला विरोध करताना विन्स्टन चर्चिल म्हणाले होते–

'Liberty is man's birthright. However to give reins of Govt. to Congress is to hand over destiny of hungry millions into the hands of rascals, rogues & free-booters.

'Not a bottle of water or a loaf of bread will escape taxation; only the air will be free !

'India will be lost in political squabbles. It will take a thousand years for them to enter the periphery of philosophy or politics.

'Today we hand over Govt. to men of straw of whom no trace will be found after a few years.'

या उताऱ्याचे संपूर्ण भाषांतर करून आम्ही आमची लेखणी अपवित्र करू इच्छित नाही. कांग्रेसवाले हे हरामखोर, डँबिस व मिळेल ते खाणारे असल्यामुळे, भारताची दुर्दशा होईल आणि ज्या भुसभुशीत-डरपोक माणसांच्या हातात भारताचे शासन देत आहोत, त्यांची नावनिशाणी काही वर्षातच नाहीशी होईल, असे चर्चिल यांचे हे २३ वर्षापूर्वीचे भाकीत होते. हे भाकीत तंतोतंत खरे ठरले तरी गुलामगिरी इथे अखंडपणे ठेवण्याचे हे काही समर्थन असू शकत नाही. मुद्दा तो नाही. इतिहासात माणसे अनेक कारणांनी अजरामर होतात. नवा देश शोधून काढल्यामुळे कोलंबस, इतर देश पादाक्रांत केल्यामुळे अलेक्झांडर, नेपोलियन यासारखी माणसे अजरामर होतात. स्वतःच्याच देशाच्या फाळण्या करूनही अजरामर होता येते ! महात्माजींच्या फाळणीविरोधाला धुडकावून आणि मुसलमानांच्या मुस्लीम लीगच्या गुंडगिरीला आणि भोसकाभोसकीला शरण जाऊन कांग्रेसवाल्यांनी देशाची अभूतपूर्व फाळणी केली–ज्या उध्वस्त विश्वातून बंगालमध्ये आज २३ वर्षे झोपडपट्टीखेरीज चांगला निवारा न लाभलेले तरुण विध्वंसवादाकडे वळले आहेत. या सर्व अनर्थांचे जनक म्हणून इतिहासात कांग्रेसवाले अजरामर झालेले आहेतच.

इंदिरा कांग्रेसवाले आता देशाच्या दुसऱ्या फाळणीच्या व्यवस्थेत आहेत. केरळात ज्या मुस्लीम लीगच्या निशाणावरील हिंदू स्त्री-पुरुषांच्या आणि अर्भकांच्या रक्ताचे

डागही अजून वाळलेले नाहीत, त्या निशाणाबरोबर इंदिरा काँग्रेसचे निशाण फड-फडत आहे. मुस्लीम लीगशी लांगूलचालन करता करता जेव्हा देशाचे पुन: तुकडे होण्याचा प्रसंग येईल व तुमच्या आमच्या भावी पिढ्यांच्या निरपराध रक्तांचे पाट पुन: एकदा वाहतील, तेव्हा इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण व बाबू जगजीवनराम ही माणसे इतिहासात अजरामर होतीलच होतील याबद्दल आम्हाला मुळीच शंका नाही.

विन्स्टन चर्चिल यांचा काँग्रेसवाल्यांकडून होऊ घातलेला हा दुसरा भीषण पराभव लवकर होईलच होईल. काँग्रेसवाल्यांचाच तो वारसा आहे! यशवंतराव 'मुस्लीम लीग' किती चांगली आहे की नाही?

## कुंकू आणि टिळा

'इंडोनेशियाचे दिवंगत पदभ्रष्ट अध्यक्ष सुकार्नो यांची जपानी पत्नी रत्नसारी देवी यांनी असे जाहीर केले की, इंडोनेशियाच्या लोकसभेसाठी त्या उभ्या रहाणार आहेत. वृत्तपत्रकारांशी बोलताना देवी रत्ना म्हणाल्या– 'मी देशात अतिशय लोकप्रिय आहे व सर्व मंडळींचा मी निवडणूक लढवावी असा आग्रह आहे. मी यासाठी सप्टेंबरात पुन: जकार्तीला येईन.' एवढे बोलून रत्नसारी देवी टोकियोला रवाना झाल्या.'

ही बातमी वाचून आम्हालाही आनंद झाला. दिवंगत पुढाऱ्याच्या विधवेला राजकारणात ओढून, पक्षाची जागा पक्षाकडेच ठेवण्याचा हा रामबाण उपाय, भारतात चांगलाच लोकप्रिय झालेला आहे. कुंकवाची जागा पक्षाच्या टिळ्या-साठीच मोकळी होत असावी! इंडोनेशियाच्या विलासी हुकूमशहाने असे एकंदर किती भरंवशाचे 'उमेदवार' मागे ठेवले आहेत, याचा नक्की आकडा उपलब्ध नाही. एकदा मोजणी केली तेव्हा सात लग्नांचा हिशोब लागला होता. एवढा आंतरराष्ट्रीय पुरुष इतिहासात झालेला नाही! बायकांची यादी–

| | |
|---|---|
| १. फातिमावती देवी | साधी इंडोनेशियन बायको |
| २. हर्तिनी देवी | डावीकडे झुकलेली इंडोनेशियन बायको |
| ३. रत्नसारी देवी | अॅडिशनल जपानी बायको |
| ४. हरियाती देवी | ,, मलेशियन ,, |
| ५. ज्युरिका देवी | ,, मेंडोनिझ ,, |
| ६. हिलदा देवी | ,, बोर्नियोन ,, |
| ७. लोरी इस्माइल देवी | ,, कालिमांतन ,, |

एक हात उजव्या फातिमादेवीच्या गळ्यात आणि एक डाव्या धार्जिण्या हर्तिनीच्या गळ्यात टाकून सुकर्णाने बराच काळ कंठला. बाकी व्हरायटी एंटरटेनमेंट

त्याने हळूहळू गोळा केली. असो. मुद्दा असा की सात लोकसभेच्या जागा सुकार्नोच्या पक्षालाच मिळण्याची शक्यता आहे. आपल्या हयातीत पक्ष वाढवणे वा बळकट करणे जरी समजा जमले नाही, तरी आपल्या पश्चात पक्ष बळकट करण्यासाठी पुढाऱ्याने अनेक संबंध करणे इष्ट होय, असे आमचे मत आहे. हल्ली पुढाऱ्यांचे 'संबंध' असतात परंतु प्रत्यक्ष लग्न होत नसल्याने पक्षकार्याची उगाचच किती बरे हानी होते ?

पक्षकार्याआड येणारा द्विभार्या प्रतिबंधक कायदा यासाठी रद्द झालाच पाहिजे !

## नको तेव्हा बाधले !

राज्यसभेचे एक सभासद द्र. मु. कळघमचे श्री. राजेंद्रन हे 'हगवणीने' आजारी असल्यामुळे संस्थानिकांचे तनखेबंदीचे विधेयक एका मताने कोसळले. श्री. राजेंद्रन यांना राज्यसभेत आणण्यासाठी गेलेले गृहस्थ एरा झेझियन म्हणाले–

'राज्यसभेत येण्यासाठी आम्ही निघालो. परंतु श्री. राजेंद्रन यांना पुन: घाईचा 'कॉल' आल्याने ते संडासाकडे गेले. पाच मिनिटे यात गेली. आम्ही राज्यसभेशी पोचलो तेव्हा मतदानासाठी दरवाजे बंद झालेले होते.'

श्री. राजेंद्रन हे एक तामिळ चित्रपटातील विख्यात नट आहेत. पण हे काही खोटे ॲक्टींग नव्हते. द्र. मु. कळघम यांचा इंदिराजींना पाठिंबा असल्यामुळे, त्यांनी हे सर्व नाटक केले असे कुणाला म्हणता येणार नाही. राज्यसभेचे दरवाजे बंद दिसताच, ते पुन: 'टॉयलेट रूम'कडेच धावत गेल्याचे इतरांनी पाहिले.

यावरून असे दिसते की महत्त्वाचे विधेयक लोकसभेत वा राज्यसभेत यावयाचे असेल, तेव्हा इंदिराजी व त्यांच्या पाठिराख्यांना नुसता 'व्हिप' काढून यापुढे भागणार नाही. तर मतदानाच्या दिवसांपूर्वीचे आठ दिवस सभासदांनी काय खावे व काय खाऊ नये, हे देखील सर्वांना बजावले पाहिजे. भजी वर्ज. केळी वर्ज. नुसता साधा मऊ भात आणि लोणचे चालेल.

श्री. राजेंद्रन यांना जेव्हा नंतर कळले की तनखा बंदी विधेयक केवळ एका मताने पडले तेव्हा ते देखील म्हणाले–

'अरेरे, काय वाटेल ते तिथे झाले असते तरी चालले असते, पण मी पाच मिनिटे उशीर करायला नको होता !'

राजू ! 'काहीतरी खाल्ले आणि नको तेव्हा बाधले' असे यापुढे मात्र होता कामा नये – हो !! तुझ्यामुळे वटहुकूम काढायला लागला.

– सेना महाराज

# संघराज्याच्या दिशेने वाटचाल

महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्ह्याच्या अर्ध्याइतके क्षेत्रफळ व लोकसंख्या असलेल्या केन्द्रशासित गोव्याची घटक राज्याच्या दिशेने वेगाने वाटचाल सुरू आहे. आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीशी तादात्म्य पावलेल्या येथील मराठी जनतेने उरीपोटी जतन करुन ठेवलेलें—गोमंतकाच्या महाराष्ट्रातील विलिनीकरणाचे स्वप्न पुसट पुसट होत चालले आहे. आणि मणिपूर, त्रिपुरा याप्रमाणेच गोव्याला स्वायत्त घटक राज्याचा दर्जा देण्याची घोषणा दिल्लीहून कोणत्याही क्षणी होण्याची शक्यता आहे.

देशातील केन्द्रशासित प्रदेशांचे हळूहळू राज्यात रूपांतर करण्याचा केन्द्राचा निर्णय तूर्त येथे सर्वत्र चर्चिला जात आहे. आणि सत्ताधारी महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष सोडल्यास विरोधी युनायटेड गोवन्स व काँग्रेस हें पक्ष सुरवातीपासूनच घटक राज्याची मागणी करत आहेत. ही गोष्ट ध्यानात ठेवण्याजोगी. अर्थात असे राज्य निर्माण झाल्यास ते आर्थिकदृष्टया कितपत स्वाश्रयी होऊ शकेल याचा विचार करण्याचे या लोकांनी सोयीस्कररीत्या टाळले असावे असे वाटते. परंतु या देशात कोणतीच समस्या एखाद्या निकषावरती सोडविली जात नसल्याने येथेही हा प्रश्न अप्रस्तुतच ठरेल. 'आमच्या इतकीच लोकसंख्या असलेल्या मणिपूरला व आमच्याहून कमी क्षेत्रफळ असलेल्या पाँडिचेरीला घटक राज्याचा दर्जा मिळणार असेल तर तो आम्हालाच का मिळू नये' हा येथला सवाल. मात्र एक गोष्ट या बाबतीत थोडी आश्चर्यकारक वाटावी अशी आहे. साधारणतः वार्षिक आठ कोटी रुपयांचा आमचा अर्थसंकल्प. यातील सुमारे पाच कोटी रुपये केन्द्राकडून अनुदान मिळत असते. घटक राज्य झाल्यास मिळणारी ही अनुदानाची रक्कम नाममात्र राहील. या प्रदेशातील जनतेवर करांचा मोठा बोजा टाकावा लागेल. ही भीती सर्वांनाच वाटत आहे. गोमंतकीय जनतेच्या हिताशी सोयरसुतक नसलेल्या गोवा प्रदेश काँग्रेस अध्यक्षांनी या घटक राज्याचा सारखा धोशा चालविला असला तरी बाकीच्यांचे म्हणणे केंद्राकडून मिळणारी मदत पदरात पाडून घ्यावी, गोव्याचा भरपूर विकास करावा. आणि नंतरच हे स्वाश्रयी राज्य यावे.

बांदोडकर गटाला मिळालेल्या यु. गो. प्रागतिक गटाचे श्री. ओलींद सिकेरा लोंवो म्हणतात की 'घटक राज्याचा दर्जा मिळताच केंद्र अनुदान देणे बंद करील आणि अगोदरच करांच्या ओझ्याखाली दडपलेल्या या प्रदेशातील जनतेवर जादा कर बसवावे लागतील.' म. गो. पक्षाचे नेते व मुख्यमंत्री श्री. दयानंद बांदोडकर

यांना गोवा विलीन व्हावा असे वाटते ते याचसाठी. गोव्यातून परदेशी जाणाऱ्या लोहखनिजाच्या निर्यातीने मिळणारा पैसा गोव्याला देण्यात यावा अशी मागणी येथे अनेकांनी केली. पण केंद्राची ही मालमत्ता अशी सुखासुखी गोव्याच्या पदरात पडली तर इतर राज्येही तीच मागणी करतील अशी विचारसरणी येथील बुद्धीवंतांच्या गोटात आहे.

खुद्द श्री. बांदोडकर यांनी अजून याबाबत कोणतेच विधान केले नाही. त्यांची परिस्थिती थोडीशी विचित्र झाल्यासारखी वाटते. १९६७ साली विलिनीकरण का केन्द्रशासन या प्रश्नावर येथे 'ओपिनियन पोल' घेण्यात आला. आणि हा कौल विलिनीकरणाच्या विरुद्ध गेला. १९६३ साली म. गो. हा पक्ष स्थापन झाला त्यासाठी आणि पोलच्या वेळी याच विलिनीकरणाच्या ईर्षेने मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा श्री. बांदोडकरांनी दिला होता. परंतु सारेच पारडे फिरले. आणि गोव्यावर लादला गेलेला हा कौल निर्णायक ठरला.

लोकशाहीचा निर्णय म्हणून श्री. बांदोडकरांनी हे स्वीकारले. त्यांच्या मते 'एकदा त्यासाठी आम्ही कौलाला मान्यता दिल्यानंतर आता निर्णय आमच्या विरुद्ध गेला म्हणून तो न मानणे चुकीचे ठरेल. शिवाय विलिनीकरणाचा हा प्रश्न सतत जळता ठेवून त्यावर लोकांची शक्ती खर्च करण्याची माझी इच्छा नाही.'

तरीपण श्री. बांदोडकरांनी विलिनीकरण सोडले आणि तेच आता घटक राज्याचा 'मंगल कलश' आणतील; त्यांचे सारे राजकारण सत्तेसाठी चालले आहे; ज्यांच्या हाती विलिनीकरणासाठी सत्तासूत्रे दिली ते फसवणूक करीत आहेत, वगैरे टीका तर येथे खूप होते आहे.

याच संदर्भात बोलताना बांदोडकर एकदा मला म्हणाले, 'मी विलिनीकरणविरोधी असल्याची ओरड करण्यात येते. परंतु पोलच्या वेळी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. विधानसभेत विलिनीकरणाचा ठराव संमत करून घेतला. आणि महत्त्वाचे म्हणजे गेल्या वर्षी सर्व केंद्रशासित प्रदेशांचे राज्यपाल व मुख्यमंत्री यांची दिल्लीत एक बैठक भरली होती आणि त्या बैठकीत सर्वच मुख्यमंत्र्यांनी घटक राज्याची मागणी केली होती, परंतु फक्त मी एकट्याने विलिनीकरण मागितले.'

'आणखी मी काय करावे अशी यांची अपेक्षा आहे का सीमाप्रश्नासारखा हा प्रश्न जळता ठेवून पुढाऱ्यांची पोटे भरू? विकासही नाही व विलिनीकरणही नाही अशी स्थिती करून घेऊ?'

यावर भाष्य नको.

सात लाख लोकसंख्येच्या या प्रदेशाचे दमण दीवसह क्षेत्रफळ आहे १,४३१ चौरस मैल आणि सुरतेनजीकचे 'दमण' व सौराष्ट्रातील १३ हजार लोकसंख्या असलेले 'दीव' हे दोन्ही गुजराती संस्कृतीत वाढलेले भाग अनैसर्गिकरीत्या गोव्याशी संलग्न आहेत.

मणिपूरचे क्षेत्रफळ ८,६२८ चौरस मैल, त्रिपुराचे ४,११६, तर पांडिचेरीचे फक्त १८५ चौरस मैल इतके आहे

काही असले तरी येणाऱ्या बातम्या व परिस्थिती यांचा विचार करता संघराज्याच्या दिशेने गोमंतक पुढे पुढे सरकत आहे असे निश्चितपणे म्हणावेसे वाटते.

## उत्सव झाला पण उत्साह ?

गणेशचतुर्थी हा गोमंतकीयांचा सर्वात मोठा सण. येथे दिवाळीपेक्षा याला महत्त्व अधिक. मुलांसाठी दारूसामानाबरोबरच थोरांसाठी करंज्या पक्वान्नेही जोरात होत रहातात. महाराष्ट्रात दिवाळीच्या फराळासाठी पाहुणा येतो तर इथे तो गणेशचतुर्थीला येतो. इतकेच नव्हे तर जावई दिवाळीसणाला येण्याऐवजी इथे गणपतीला येतो.

असा हा उत्सव वर्षपद्धतीनुसार यंदाही साजरा झाला. वाढत्या महागाईची झळ अर्थातच गणपतीलासुद्धा पोचली. दारूसामानाची विक्री कमी झाली. या दिवसात तरी सर्वत्र आर्थिक मंदी मोठ्या प्रमाणावर जाणवत होती.

या आर्थिक मंदीची कारणे शोधू लागलो तेव्हा काही विचित्र गोष्टी ऐकावयास मिळाल्या. सावई वेऱ्यासारख्या एका खेडेगावात एक वृद्ध कळवळून सांगत होता,

'काय सांगू बाबा ? मटका ! या मटका-जुगाराने गावोगावी हैदोसहुल्ला चालविला आहे. काही ठिकाणी बाजारातून तर मुले, बायकासुद्धा आकडा खेळतात' खाऊसाठी अगर किरकोळ खर्चासाठी हाती आलेला पैसा मटक्यावर जातो. माशेलसारख्या एका छोटया गावात रोज सुमारे ३ हजार रुपयांची उलाढाल होते. मग मौजमजेसाठी पैसा रहाणार कुठला ? स्वातंत्र्याने आणलेले हे फळ !'

'गोव्याच्या अनेक खेडेगावातून मटक्यासाठी व त्यामुळे वर्तमानपत्रांचा खप वाढलेला आहे हे तुम्हाला माहीत आहे का ? अशाच एका गावातील वृत्तपत्रविक्रेत्याने माहिती दिली. काही विशेष वाचता न येणारी पोरे थोरे वर्तमानपत्रे घेतात.'

असा हा आकडयात हरवलेला गणपती शोधत मी चालत रहातो.

गोव्यात सार्वजनिक गणपती असे नाहीतच. परंतु घराघरांतून आरास, भाषणे, भजने, गाणी हे कार्यक्रम चालतात.

मंगेशी येथे श्री. जितेंद्र अभिषेकी या ख्यातनाम गायकाने स्वतःच्या घरीच गणपतीसमोर हजेरी लावली. श्री. रामनाथ मठकर, श्री. मनोहर शिरगावकर आदी स्थानिक गायकांसमवेत सुमारे तीन तास त्यांनी संगीतकला पेश केली. आपल्या या लाडक्या सुपुत्राचे गाणे ऐकण्यासाठी आलेल्या शेजार पाजारच्या श्रोतृवृंदात मीही कुठेतरी स्वतःला हरवून बसलो होतो. स्वतःच्या जुन्या वाडयासारख्या या घरात श्री. अभिषेकींनी केलेला हा पहिलाच कार्यक्रम होता म्हणे. गणपतीचे विसर्जन झाले. त्या वृद्धाचे मटक्यासंबंधीचे बोल व अभिषेकींचे गाणे एवढेच स्मरणात राहिले.

— विनायक बार्देशकार

# लुसाका

## अलिप्त राष्ट्र शिखर परिषद

दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक राष्ट्रं स्वतंत्र झाली. अनेक वर्षं पारतंत्र्याच्या जोखडाखाली राहिलेल्या या राष्ट्रांपुढं स्वातंत्र्य टिकविणं व आर्थिक विकास करणं ही ध्येयं होती. युद्धोत्तर काळात दोन सत्तागट निर्माण झाले होते. नवोदित स्वतंत्र राष्ट्र या गटां-कडं वळणं तसं साहजिक होतं. पण त्याही परिस्थितीत दूरदृष्टीनं भारताचे प्रधानमंत्री कै. नेहरूंनी कोणत्याही गटात सामील न होता अलिप्ततेचं धोरण अंगिकारलं. अमेरिका व सोव्हिएत युनियन दोन्हीही राष्ट्रांनी हे धोरण आवडणारं नव्हतं, नव्हे आवडलं नाही; कालांतरानं हळूहळू अनेक राष्ट्रं याच धोरणाची कास धरू लागली. टिटोंचा युगोस्लाव्हिया (साम्यवादी असूनही स्टॅलिनचं वर्चस्व झुगारून देऊन त्यांनी स्वतंत्र धोरणाचा स्वीकार केला) व कर्नल नासेर यांचं इजिप्तही याच धोरणाकडे वाटचाल करीत होतं. इतरही अनेक राष्ट्रं येऊन मिळाली. १९६१ साली बेलग्रेड (युगोस्लाव्हिया) येथे पहिली अलिप्त राष्ट्र परिषद झाली तर दुसरी परिषद ६२ साली कायरो येथे भरली होती. कायरो परिषदेनंतर अनेक महत्त्वाच्या जागतिक घडामोडी घडल्या. आफ्रिका, लॅटिन अमेरिका येथील अनेक छोटी छोटी राष्ट्रे स्वतंत्र झाली व त्यांनीही अलिप्तता वादाचंच धोरणं स्वीकारलं. एक काळ असा होता की अलिप्त राष्ट्रं ही एक फार मोठी शक्ती होती.

अलिप्त राष्ट्रांची तिसरी परिषद घेण्यासंबंधी विचार-विनिमय चालू झाला आणि परिषदेच्या तयारीच्या दृष्टीनं एप्रिलमध्ये टान्झानियाची राजधानी दार ए-सलाम येथे परराष्ट्रमंत्र्यांची परिषद भरून सप्टेंबरमध्ये झांबियाची राजधानी लुसाका येथे ही शिखर परिषद घेण्याचं ठरलं. गेल्या मंगळवारी झांबियाचे अध्यक्ष डॉ. केनेथ कौंडा यांनी या परिषदेचं उद्घाटन केलं. एकूण ६० देश परिषदेला उपस्थित होते, त्यात १७ राष्ट्रप्रमुख व १२ पंतप्रधानांनी भाग घेतला.

युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष टिटो यांनी परिषदेसाठी अधिक परिश्रम घेतले. श्रीमती इंदिरा गांधी व इतर काही वडया नेत्यांची उपस्थितीही जाणवत होती तर संयुक्त

अरब प्रजासत्ताकाचे अध्यक्ष नासेर व ब्रह्मदेशच्या क्रान्तिकारी मंडळाचे अध्यक्ष जनरल ने विन यांची अनुपस्थितीही जाणवली. अंतर्गत प्रश्नांमुळे श्री. नासेर परिषदेला उपस्थित नव्हते तर ब्रह्मदेशानं परिषदेत भाग घेतला नाही. पाकिस्ताननं परिषदेत भाग घेण्यासाठी खूप प्रयत्न केले पण ते जमू शकलं नाही; तर त्रिनिदादला व दक्षिण व्हिएतनामच्या तात्पुरत्या क्रांतिकारी सरकारच्या परराष्ट्रमंत्री मादाम बिन्ह यांना निरीक्षक म्हणून दर्जा देण्यात आला. कंबोडियाच्या प्रिन्स सिहनोक यांच्या निर्वासित सरकारचे व सध्याच्या नॉमपेन राजवटीचे यापैकी कोणतेही प्रतिनिधी मंडळ परिषदेत सहभागी होऊ शकले नाही, कारण काही मूठभर मंडळी सोडता यावर काही बोलून त्या गुतांगुतीत भाग घेण्याची कोणाचीच इच्छा नव्हती.

डॉ. कौंडा यांनी उद्‌घाटनाच्या भाषणात ‘ बडी राष्ट्रे कोणतीही फूट पाडण्याची संधी सोडत नसल्याचे ’ सांगून त्यापासून अलिप्त राष्ट्रांनी योग्य बोध घेऊन ‘ एकी टिकवण्यावर ’ भर दिला.

परिषदेनं आर्थिक व राजकीय बाबतीत नियमीत विचारविनिमय करून कार्यरत रहाण्याचा व अलिप्त राष्ट्रांच्या अध्यक्षांना मूर्तरूप देण्यासाठी यंत्रणा उभारण्याचा मनोदय व्यक्त केला. अलिप्त राष्ट्रांनी आपलं ऐक्य टिकवणंही अत्यंत महत्त्वाचं असल्याचं काही वक्त्यांनी सांगितलं.

मादाम बिन्ह यांची उपस्थिती महत्त्वपूर्ण होती. त्यांनी भाषणात त्यांचं सरकार आंतरराष्ट्रीय राजकारणात अलिप्त राहू इच्छित असल्याचा निर्वाळा दिला. सर्वात महत्त्व दिलं गेलं ते दक्षिण अफ्रिकेच्या वंशभेदाच्या धोरणावर टीका करण्याला. कडक भाषेतील अनेक ठराव परराष्ट्रमंत्र्यांच्या बैठकीपुढे ठेवण्यात आले होते. द. अफ्रिकेला शस्त्र पुरविण्याच्या इंग्लंडच्या धोरणावरही टीका करण्यात आली. अंगोला, मोझांबिक इत्यादी ठिकाणच्या स्वातंत्र्यचळवळीबद्दलही परिषदेनं आस्था दाखवून पोर्तुगालचा निषेध केला.

१९६२ सालच्या चिनी आक्रमणानंतर झालेल्या कायरो परिषदेवर भारताला आपली छाप टाकता आली नव्हती. पण यावेळी मात्र भारताने महत्त्वाची कामगिरी बजावली. अर्थातच भारतातील कटकटीमुळे काही प्रमाणात प्रधानमंत्री गांधी यांना थोडा सेट बॅक होता. पण परिषदेत पुढे पुढे न करता निरनिराळ्या प्रतिनिधींशी विचारविनिमयाचं तंत्र अवलंबून त्यांनी त्यांची प्रतिमा उभी केली आणि परिषदेवर छाप टाकली. ‘ हिन्दी महासागर टापूत ’ कोणत्याही लष्करी हालचाली होऊ नयेत व हे क्षेत्र कटकटींपासून दूर रहावं यावर बहुतेकांनी भर दिला.

यापुढं अलिप्त राष्ट्र एकमेकांतील सहकार्याकरिता काय उपाययोजना करतात व त्यांच्यातील ऐक्य टिकविण्यासाठी कसा प्रयत्न करतात ते दिसेलच. पण परिषदेत तरी बहुतेक सर्वच गोष्टीत सर्वसाधारण एकमत दिसून आलं खरं.

□ □ □

विजय वैद्य

# रोगांपेक्षा किंमतीच अधिक जीवघेण्या असतात !

जीवनातील सुखाचा, आनंदाचा, जास्तीतजास्त उपभोग घेण्याकडे आपला नेहमीच कल असतो. नट्टापट्टा करणं, जमल्यास दररोज नवीन नवीन हॉटेल्समध्ये जाऊन जिभेचे चोचले पुरविणं कोणाला आवडत नाही ? चौपाटीच्या भेळ-कुल्फीचा आस्वाद काही आगळा वेगळाच असतो. जॉर्ज रेस्टॅरॉमधील किंवा बेरीजमधील बिर्याणी लाजवाब असते.

जीवनातील हिरवेपणा, टवटवीतपणा टिकावा व हे सर्व उपभोगण्यासाठी दीर्घायुष्य प्राप्त व्हावं असंच जवळजवळ प्रत्येकाला वाटत असतं.

निरनिराळ्या कारणांमुळे मानवाच्या आयुर्मर्यादेत वाढ झाली आहे, पण या निरनिराळ्या कारणांमध्ये सर्वात महत्त्वाचं कारण कोणतं असेल तर ते म्हणजे शास्त्रीय संशोधनामुळे निरनिराळ्या उपयुक्त, गुणकारी औषधांचा शोध लागून, आपलं स्वास्थ्य टिकविण्याकरिता ही सर्व औषधं आपल्या सेवेस हजर आहेत. काही वर्षांपूर्वीची गोष्ट; क्षयरोग असाध्य समजला जात असे. आता मात्र तो तसा वाटत नाही कारण औषधं घेऊन क्षयरोगी आता पूर्वीच्या मानाने दीर्घकाळ जगू शकतो, एवढंच नव्हे तर काही केसेसमध्ये क्षयरोगी पूर्णपणे बरा होऊ शकतो. वैद्यकशास्त्रातील प्रगतीमुळे, संशोधनामुळे हृदयविकार असणाऱ्यांवर हृदयारोपणाच्या शस्त्रक्रिया हाती घेण्यात येऊन या नाजूक शस्त्रक्रियेनंतर माणसं अनेक महिने जगल्याचंही आपण वाचलं आहे. असाध्य अशा कर्करोगाशीसुद्धा पूर्वीपेक्षा अधिक चांगल्याप्रकारे आता

क्षुंजता येऊ लागले आहे. म्हणजेच आता तसं पाहता असाध्य, अशक्य असं विशेष काही राहिलेलं नाही. वैद्यकशास्त्रातील प्रगतीचा, निरनिराळ्या रोगांवरील संशोधनांचा व रोग बरे करणाऱ्या विविध औषधांचा हा सर्व परिणाम. म्हणूनच आपण आता पूर्वीपेक्षा जीवनातील आनंद दीर्घकाळ उपभोगू शकतो. आस्वाद घेऊ शकतो..

मात्र जिभेचे चोचले म्हणून आपण कॅडबरी जेम्स्, लेमन ड्रॉप्स वा तत्सम गोळ्या खाव्यात वा कोकाकोला, गोल्डस्पॉट आदी पेयं प्यावीत त्याप्रमाणे अॅस्प्रोच्या गोळ्या वा औषधांचे डोस घेत नसतो. औषधं ही काही मजा म्हणून घेतली जात नाहीत. भेळीची वा कुल्फीची मजा आपण एक वेळ चुकवू पण आजारी असताना औषधं घेण्याबाबत टाळाटाळ करणं कसं शक्य आहे ? पण प्रश्न असा आहे, औषधं सामान्य माणसाच्या खिशाला कितपत परवडतात आणि याचं उत्तर सर्वांनाच ठाऊक आहे.

एखादा छोटा आजार वा बडं दुखणं येतं आणि आपल्याला डॉक्टरकडे जावं लागतं. उपचार चालू होतात, डॉक्टर मजकूर त्यांच्या ' दिव्य अक्षरात ' आपल्याला बरं वाटण्याकरिता काही औषधं लिहून देतात. अर्थातच ही सर्व औषधं घेणं आवश्यक असतं, म्हणून केमिस्टकडे जाऊन यादीनुसार ती घेतली जातात, पण त्यानंतर जेव्हा बिल पुढे येतं तेव्हाच आपल्याला त्या औषधांची खरी ' किंमत ' कळते. छोट्या आजाराचं राहू दे बाजूला, बडा आजार म्हटला की सालटंच निघायचं.

औषधं फारच महाग असतात, औषधउत्पादक खूप नफा मिळवतात याची कोणे एके काळी सरकारला जाणीव झाली आणि दीनदुबळ्या जनतेचे कैवारी अशा समाजवादी सरकारनं त्यावर नियंत्रण आणण्याचा विचार केला, एवढंच नव्हे तशा-प्रकारचा हुकूमही निघाला, पण प्रत्यक्षात प्रकार असा झाला की, किंमती खाली येण्याऐवजी वर गेल्या, सरकार गोंधळून गेलं आणि पुन्हा एकवार किंमती नियंत्रण करणारा हुकूम काढावा लागला. आज या महागड्या औषधांवर नियंत्रण आलं आहे, किंमती १५ मेच्या पातळीवर गोठविण्यात आल्या आहेत, पण याचा तरी परिणाम अपेक्षित असा झाला आहे काय, नसल्यास का नाही, किंमती का वाढतात, या उद्योगधंद्यात कोण किती नफा मिळवतं, सरकारचं धोरण आपल्या देशात सध्या बाल्यावस्थेत असलेल्या औषध उद्योगधंद्याची प्रगती कशी झाली, या उद्योगाशी संबंधीत असलेल्यांच्या, डॉक्टरांच्या या प्रश्नासंबंधी प्रतिक्रिया काय, सरकारचं धोरण व त्याची अंमलबजावणी, केमिस्टांची व सर्वात महत्त्वाचं म्हणजे ग्राहकांची मतं काय, एवढ्या महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी ग्राहक किती जागरूक असतात वगैरे वगैरे सर्व गोष्टींचा विचार या निमित्ताने करणे आवश्यक आहे.

सरकारी नोकरीत प्रविष्ट होण्यापेक्षा, एखाद्या बँकेत व खाजगी कंपनीत नोकरी करणं आज कोणीही पसंत करतं. त्यातही जर औषधी कारखाना असेल तर अधिक चांगलं. शास्त्रशाखेच्या पदवीधरांच्या तर अशा ठिकाणी उड्या पडतात, याचं सर्वात महत्त्वाचं कारण म्हणजे चांगला पगार. औषधी कंपनीच्या आवारात प्रवेश

करताच तेथील वातावरणातील भपका जाणवतो, त्या कंपन्यांचे हाती बॅग घेतलेले रुबाबदार प्रतिनिधी रस्त्यातून जाताना दिसतात व त्यावरूनही त्यांना मिळणाऱ्या चांगल्या पगाराची कल्पना येऊ शकते. हे सर्व औषधी कंपन्यांना कसं शक्य होतं ? हे शक्य होतं भरपूर नफा मिळाल्यानं.

सप्टेंबरच्या १ तारखेपूर्वीच्या २० दिवसात एकूण ४२४ औषधांच्या किमती वाढल्या. त्यातील ११४ औषधं तर घरातील नेहमीच्याच वापरातील होती. त्या २० दिवसात औषधांच्या किमतीत जी वाढ झाली ती किती होती याचा वरवरचा सरकारी अंदाज आहे ६२ लाख रुपये. यावरून औषधी कंपन्या किती नफा मिळवत असतील याची चांगलीच कल्पना करता येते.

इतर सर्वच वस्तूंबरोबर औषधांचेही भाव दिवसे दिवस वर्षानुवर्ष सारखे वाढतच चाललेले होते ही वस्तुस्थिती होती. १९६३ साली सरकारनं औषधांच्या किमती गोठविल्या. एवढंच नव्हे तर ६६ साली सरकारनं औषधांच्या रास्त किमती ठरविण्याकरिता टॅरिफ कॅमिशनही नेमलं. औषधांच्या किमती ठरविणं साधीसुधी गोष्ट नव्हती, कारण सुमारे १० हजारांपेक्षा अधिक औषधं बाजारात आहेत. त्यामुळे गुंतागुंतीचा मामला ठरवायला दोन वर्षे लागली. पण त्यानंतरही कमिशनच्या अहवालाची अंमलबजावणी झाली नाही व भाव वर चढतच राहिले. याबाबत ओरड झाली, लोकसभेत प्रश्न आला, अशा परिस्थितीत सरकारला काहीतरी करणं आवश्यक होतं. या पार्श्वभूमीवर १६ मे रोजी १७ मूलभूत (बेसिक) औषधांच्या किमती ठरवून देणारा व किमती नियंत्रित करणारा ठराव लोकसभेपुढे ठेवला गेला व हा प्रस्ताव १७ मे ला मंजूरही झाला. सरकारने औषधी कंपन्यांना किमती गोठविण्याबाबत हुकूम दिला व सरकारच्या पूर्ण अनुमतीशिवाय त्यात बदल न करण्याचा आदेश दिला. हा आदेश देताना किमती खाली येण्यासंबंधीचे सरकारने काही आराखडे बांधले होते, पण ते चुकीचे ठरले आणि दिसून आला तो फक्त उलट परिणाम. रोजच्या उपयोगाच्या औषधांच्या—ज्यांना कॉमन ड्रग्ज असं म्हणतात—किमती बेसुमार वाढल्या. १ ऑगस्ट रोजी भाव खाली आणण्याची मुदत होती. त्या तारखेस काही महागड्या व नेहमी न लागणाऱ्या औषधांच्या किमती खाली आल्या पण इतर औषधं महाग झाली होती. सरकारनं कंपन्यांनी किती नफा घ्यायचा यासंबंधी फॉर्म्युला दिला होता त्याचा मोठ्या खुबीनं वापर करून औषध कंपन्यांनी डाव साधला. त्यामुळे अनेक औषधांचे भाव कडाडले होते. पुन्हा एकदा लोकसभेत गरमागरम चर्चा झाली.

पुनश्च काहीतरी कारवाई करणं आवश्यक होतं म्हणून १८ ऑगस्ट रोजी पुन्हा एकदा लोकसभेत प्रस्ताव येऊन सरकारनं औषधउत्पादकांना आदेश दिला की १ ऑगस्ट रोजी खाली आलेल्या किमती तशाच ठेऊन बाकीच्या औषधांच्या किमती १५ मे रोजी ज्या पातळीवर होत्या त्या पातळीवर ठेऊन औषधांच्या किमती घेतल्या पाहिजेत.




२२ ऑगस्ट रोजी मुंबईत औषधउत्पादकांची एक बैठक सरकारनं घेतली पण त्या सभेला १२ बड्या उत्पादकांचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते. अर्थातच सरकारनं त्याची गंभीर दखल घेतल्याचं आरोग्य मंत्र्यांनी सांगितलं. रसायन खात्याचे मंत्री डॉ. त्रिगुण सेन यांनी (डॉक्टर साहेबांना त्रिगुण सिन–Sin–असंही गमतीनं म्हटलं जातं) वाजवी किमतीचा आदेश न पाळणाऱ्या, कृत्रिम टंचाई, कमी पुरवठा आदी करणाऱ्या कंपन्या ताब्यात घेण्याचा इषाराही दिला. लोकांना स्वस्त दरात औषधं मिळावीत म्हणून सरकारी रुग्णालयातच स्वस्त औषधांची दुकानं सुरू करण्याचाही केंद्रिय आरोग्य मंत्रालयाचा विचार आहे.


औषधं वाजवी भावानं मिळावित असे प्रयत्न सरकार करीत हे जरी आहे खरं असलं तरी त्यात अजून तरी सरकारच्या पदरात यश पडल्याचं दिसत नाही. सर्वत्र सावळा गोंधळच चालू आहे. पूर्वी मिळणाऱ्या किमतींपेक्षा चढ्या किमतीतच औषधं विकत घ्यावी लागत आहेत. 'उत्पादकाकडून अजूनही किमतीची सूची (Price list) आली नाही' असं केमिस्ट लोक सांगत आहेत, त्यामुळे ते घेतील ती किंमत मोजावी लागते. पूर्वीच्या व आताच्या भावात कशी तफावत आहे ते उदाहरणासह पुढे येणारच आहे. औषधदुकानदारांची काही गाऱ्हाणी रास्त असावीत असं वाटतय्, पण त्यातही अनेक मंडळी या गोंधळाचा फायदा घेत असावीत असा संशय घ्यायला जागा आहे. उत्पादकांचा असा दावा आहे की त्यांनी 'किंमत सूची' पाठवलेली आहे. यात खरे खोटे कोण हे तेच जाणोत, पण सामान्य नागरिकाला अजूनही कुठेतरी अधिक पैसे मोजावे लागतच आहेत. किंबहुना प्रकार असा आहे की काही औषधांच्या किमती कमी झाल्या आहेत पण त्या

औषधांबरोबर घ्याव्या लागणाऱ्या दुसऱ्या काही औषधांच्या किंमती वाढल्या आहेत, म्हणजे एका हाताने देऊन दुसऱ्या हाताने तेच काढून घेण्यातलाच हा प्रकार.

ब्रॉड स्पेक्ट्रम अॅन्टीबायोटिक्स, टेट्रासायक्लिन, क्लोरोमफेनिकल, टेरामायसिन आदी औषधांच्या किमती बऱ्याच खाली आल्या. तापावर क्लोरोमाफेनिकल वापरलं जातं. त्याची पूर्वीची किंमत होती ८ रुपये, आता ती ४ रु. २५ पैसे एवढी खाली आली आहे. टेरामायसिनची पूर्वीची किंमत होती ३·८५ पैसे, आता ती २ रुपये झाली आहे. ब्रॉड स्पेक्ट्रम अॅन्टीबायोटिक्सचा वापर टायफॉइड, पॅराटायफॉइड व इतर मोठ्या आजारांकरिता केला जातो. त्यामुळे त्याचा खप नेहमीच मोठा नसतो. एरवी साध्या तापावर सल्फा वगैरे दिलं जातं. या औषधांचे भाव खाली आले खरे पण मल्टी व्हिटॅमिनचे भाव वाढले. कदाचित आपल्या मनात असा विचार येईल की जी मंडळी व्हिटॅमिन्स व टॉनिक्स घेतील त्यांच्यावर त्याचा परिणाम होईल. मलाही प्रथम तसंच वाटलं म्हणून अधिक चौकशी करता कळलं की, अॅन्टोबायोटिक्स व व्हिटॅमिन्स बरोबर घ्यावी लागतात. म्हणजे त्याचं असं आहे की अॅन्टीबायोटिक्स घेतल्यामुळे आपल्या शरीरातील बॅक्टेरिअल फ्लोरा काही प्रमाणात नष्ट होतो. त्यामुळे आपल्या शरीराला अत्यंत आवश्यक असणारं बी कॉम्प्लेक्स शोषून घेण्यास मदत करणारे वा बी कॉम्प्लेक्स काही प्रमाणात तयार करणारे काही महत्त्वाचे बॅक्टेरिया नष्ट होतात व बी कॉम्प्लेक्सची शरीरात कमतरता निर्माण होते ती भरून काढण्यासाठी ब्रॉड स्पेक्ट्रम अॅन्टीबायोटिक्स बरोबरच बी कॉम्प्लेक्सची औषधं घ्यावी लागतात. ही बी कॉम्प्लेक्स निर्माण करणारी व्हिटॅमिन्स व टॉनिक्स यांचे भाव वाढले आहेत. म्हणजेच एकीकडे अॅन्टीबायोटिक्स औषधांच्या किमती उतरल्या असल्या तरी व्हिटॅमिन्सच्या बाबतीत त्या पैशानी अधिक चढल्याने फायदा काहीच नाही.

सरकारनं भाव १५ मे च्या पातळीवर गोठविले असले तरी दुसऱ्या एका कारणामुळेही भाव चढले आहेत. सरकारनं उत्पादकांना जास्तीत जास्त १५ टक्के फायदा घेण्याची मुभा दिली आहे व औषधं किरकोळीनं विकणाऱ्या औषधं विक्रेत्यांना (केमिस्ट व ड्रगीस्ट) पूर्वी २० टक्के पर्यंत फायदा घेता येत असे, आता तो १२ टक्क्यांवर आला आहे. पूर्वी उत्पादकांकडून विक्रेत्यांना अधिक मार्जिन मिळायची, आता ती कमी मिळते. याबाबतचेही एक उदाहरण घेतल्यास हे स्पष्ट होईल. ग्लॅक्सोचं बेडॅडेक्स ह्या औषधाची छापील किमत रु. ३·९६ होती (१५ मे रोजी) पण दुकानदाराला उत्पादकाकडून ते रु. ३·३० ला मिळायचं, तो हे औषध रु. ३·९६ ला विकू शकत असे, पण स्पर्धेत टिकण्यासाठी तो ते औषध रु. ३·६० किंवा रु. ३·६५ पर्यंत विकायचा व तसं करून सुद्धा त्याला फायदा व्हायचा. आज जरी किंमती १५ मे च्या पातळीवर नियंत्रित केल्या असल्या तरी तेच औषधं विक्रेत्याला सध्या ३ रु. ५१ पैशांना मिळतं, कारण उत्पादक—त्याला कमी मार्जिन

देतात त्यावर त्याचा १२ टक्के नफा व कर वगैरे धरून ते ग्राहकाला आता रु. ३.६० किंवा ६५ पैशांपेक्षा अधिक किंमतीला मिळतं. ग्राहकालाहो यामुळे बुचकळ्यात पडल्यागत होतं की जे औषध पूर्वी त्याला कमी किंमतीत पडायचं तेच, किंमती नियंत्रित होऊनही चढ्या भावात का? त्यातच काही दुकानदार या परिस्थितीचा फायदा घेतात. असा हा सारा गोंधळ अजूनही चालू आहेच. अनेक औषधं बाजारात उपलब्ध नाहीत वा ती नसल्याचं विक्रेते सांगतात. एका विक्रेत्यानं सांगितलं की नियंत्रण छापील किंमतीवर म्हणजे ३ रुपये ९६ पैशांवर करण्याऐवजी विक्रेत्याला ते मिळणाऱ्या किंमतीवर म्हणजे ३ रुपये ३० पैसे यावर करायला पाहिजे होतं तर ग्राहकाला पूर्वीच्याच किंमतीत औषध देता आलं असतं. त्यातच अनेक कंपन्यांनी




त्यांची प्राइस लिस्टस् न पाठविल्यानं कोणते भाव उतरले आहेत वा चढले आहेत हे कळत नाही. छोटया विक्रेत्यांना किंमत नियंत्रणाची विशेष झळ लागणार नाही पण अकबर अलीज् वा साहेबसिंग आदी मोठे विक्रेते जे आधीच संपूर्ण छापील किंमती आकारत असत त्यांच्यावर पूर्वीपेक्षा मार्जिन कमी झाल्यानें खूप परिणाम होईल.

उत्पादकांचं म्हणणं असं की नियंत्रण आणणं आवश्यक नव्हतं. त्यांनी स्वखुशीनं किंमती २० ते २५ टक्के कमी करायचं मान्य केलं होतं. शिवाय हेच एक क्षेत्र असं की तेथे किंमती खूपच कमी आहेत. अन्नधान्य व इतर आवश्यक वस्तूंच्या किंमती खाली येणं खरे आवश्यक आहे. इतर आवश्यक वस्तूंचे भाव जवळजवळ २०० टक्के वाढले आहेत. तर औषधांच्या किंमती फक्त २० टक्क्यांनीच वाढल्या आहेत. इतर कोणत्याही देशांपेक्षा येथे औषधांवर कर अधिक आहेत. आजारीपणाचं येथील प्रमाण १ ते २ टक्केच आहे. अजून बाल्यावस्थेत असलेल्या या उद्योगात कच्च्या मालाची आयात करावी लागते व येथील उत्पादनखर्चही अधिक, शिवाय औषधी कारखाने चालविण्यासाठी लागणारे लोक वा मालाला बाजारपेठ मिळवून देणारे प्रतिनिधी हे त्या त्या क्षेत्रातील तज्ञ असावे लागतात व

त्यांना तसं शिक्षण द्यावं लागतं. हे खर्चाचं असतं. औषधं निर्मितीपासून एका ठराविक मुदतीत ती न संपल्यास नष्ट करावी लागतात. त्यातही नुकसान सोसावं लागतं व निरनिराळ्या करांमुळे २२ टक्के उत्पादनाचा खर्च वाढतो. सरकारला जर हे सर्वसामान्य माणसासाठी करायचं असेल तर हे कर कमी केल्यास किमतीही आपोआपच खाली येतील.

यातही गंमत अशी परकीय औषधीकंपन्या वा त्यांच्या येथील शाखा प्रचंड नफा मिळवतात, तर भारतीय कंपन्या कमी नफा मिळवतात. साधारणपणे १९३० साली भारतीय औषधनिर्मिती क्षेत्रात उतरले. बेंगॉल केमिकल्स व अॅलेंबिक वगैरे काही कंपन्या स्थापन झाल्या. त्या सेमी–फिनिश औषधं जी परदेशातून येत त्यावर काही प्रोसेस करून विकत. सिंगोना भारतातून परदेशी जायचं व तेथे त्याचं क्विनाइन तयार होऊन ते भारतात येत असे, म्हणजे पुन्हा पैसे अधिक. दुसऱ्या महायुद्ध काळात आणखी काही कंपन्या पुढे आल्या पण तरीही परिस्थिती कायम होती. ज्या औषधांचा दर्जा संशयातीत नव्हता अशी औषधं परकीय कंपन्या येथे पाठवीत. १९४० साली मात्र औषध नियंत्रण कायदा आला पण तो अंमलात यायला ७ वर्षं जावी लागली पण त्यामुळे सर्वच औषधांच्या सारख्या दर्जाबाबत जागरूकता दाखविली जाऊ लागली. गेल्या १५ ते २० वर्षांत भारतीय औषधी कंपन्यांची वाढ होऊ लागली. आहे. देशातील एकूण ६०% कंपन्या महाराष्ट्र-गुजरात म्हणजे पश्चिम विभागात आहेत व त्याच्याही ६० टक्के मुंबईत आहेत. आज साधारणपणे ३ हजाराच्यावर छोट्या मोठ्या कंपन्या येथे आहेत. देशात ८० मोठ्या कंपन्या आहेत. परकीय कंपन्या येथे भांडवल गुंतवण्यापासून २ ते ५ वर्षांच्या काळात सर्व मुद्दल वसूल करू शकतात यावरून त्यांच्या नफ्याची कल्पना येईल.

अनेक वेळा एखादं मूलभूत औषध एकच असतं. त्यावर काही प्रक्रिया करायच्या असतात पण असं असूनही परकीय व भारतीय उत्पादकांच्या किमतीत फारच तफावत असते. उदा० ब्रॉड स्पेक्ट्रम अन्टीबायोटिक्स असलेलं एक औषध पाहू. त्या औषधाचं एका भारतीय कंपनीचं नाव आहे क्लेमायझिन तर परकीय कंपनीचं नाव आहे टेरेमायसिन. त्यांच्या अनुक्रमे किमती होत्या ३·५० व ४·५०. आता ही दोन्ही औषधं ३·५० या पातळीवर आली आहेत पण त्यामुळेच भारतीय कंपन्या मार खाणार आहेत. कारण आपलं मानसशास्त्रच असं आहे की ज्याची ज्याची निर्मिती परदेशी झाली आहे ते ते चांगलं, मग भारतीय माल कितीही चांगला असो. म्हणजेच स्पर्धेत टिकवण्यासाठी भारतीय कंपनीला तेच औषध २·२० एवढ्या किमतीला विकावं लागणार. (यातही कंपनीला फायदा होईलच पण परकीय कंपनी अधिक फायदा मिळवू शकेल) यामुळे अनेक भारतीय उत्पादने बंद पडण्याची वा स्पर्धेत टिकण्यासाठी भेसळ करून निकृष्ट दर्जाची औषधं निर्माण करण्याची शक्यता दूर करता येत नाही. स्पर्धेत टिकाव धरण्यासाठी काही औषधांच्या किमती कमी केल्या जातात पण ज्यांना लाइफ सेव्हींग ड्रग्ज म्हणतात व जी घेणे अत्यंत आवश्यक

असतात त्यावर उत्पादक १०० ते ३५० टक्के नफा मिळवतात. क्षयरोग्याच्या रुग्णाला काही गोळ्या आयुष्यभर घ्याव्या लागतात. त्या महागल्या आहेत त्यामुळे तर त्यांना सर्वात अधिक झळ लागेल. परकीय कंपन्या किंमती फार ठेवतात पण सरकारी क्षेत्रातील I. D. P. L. नेही वरताण केली आहे. त्याच्या औषधांच्या किंमती भरमसाठ वाढल्या आहेत.

औषधी कंपन्यांचा खर्च अनेक कारणांमुळे वाढतो तो कमी करणं शक्य असतं. उदाहरणार्थ – डॉक्टर्सना सँम्पल्स दिली जातात. नवं उत्पादन असेल तर ठीक आहे पण जुन्या औषधांचीही सॅम्पल्स दिली जातात, खरं म्हणजे त्याची आवश्यकता नसते. शिवाय कॅलेंडर्स वा इतर अनेक वस्तूही भेट म्हणून दिल्या जातात. काही वेळा 'अधिक बिझनेस देऊ शकणाऱ्या डॉक्टरला' स्टेथॅस्कोप वा ब्लड प्रेशर मोजणारं यंत्र अशा किंमती वस्तू दिल्या जातात. गेल्या वर्षी तर एका परकीय कंपनीनं पॅरिसहून अतिशय सुंदर व फार महाग असे टी सेटस् विमानाने आणून काही डॉक्टर्सना भेट दिले. हा सर्व भार शेवटी ग्राहकावर पडतो. काही ठिकाणी औषधांच्या किंमती ५० टक्केही कमी करणं शक्य आहे पण असे हे खर्च केले जातात. एक डॉक्टर म्हणाले, 'हे सर्व प्रकार लाच देण्यासारखेच आहेत. आम्हाला सॅम्पल्स देऊन त्याचे व्यक्तिगत रिझल्टस् पहाणं शक्य नसे तेव्हा कंपन्यानी हॉस्पिटल्सना ती देऊन १०० पैकी किती रोग्यांच्या बाबतीत काय फरक पडतो ते पाहिलं पाहिजे.'

लोकांच्या यावर काय प्रतिक्रिया आहेत – 'औषधाचं महत्त्व असतं वेळेला. रोग हाताबाहेर गेल्यावर औषधं मिळण्यात काय उपयोग ? माझा अनुभवच सांगतो. माझा मुलगा आजारी होता, एक औषधं घेणं आवश्यक होतं. एका दुकानदारानं ते नसल्याचं सांगितलं, दुसऱ्यानं ते दिलं पण किंमत अधिक सांगितली. नंतर तो म्हणतो, 'दोन दिवसांनी आलात तर किंमत कमी होईल.' पण रोगी दगावल्यावर काय औषध घ्यायचं आहे ?' – एक प्रतिक्रिया. दुसरे एक गृहस्थ म्हणाले, वैद्यकीय उपचार शक्य तितक्या स्वस्तात उपलब्ध होणं आवश्यक आहे.' तिसरे एक गृहस्थ म्हणाले – 'धान्याप्रमाणे औषधांच्या किंमती फळ्यावर प्रांतिक भाषेत लिहिणं आवश्यक आहे. त्यामुळे सामान्य माणसाला किंमती कळू शकतील. निरनिराळ्या भागात स्वस्त किंमतीची औषधी दुकानं सरकारनं सुरू करावीत. आयुर्वेदिक औषधं-

---

डॉक्टरांचं दिव्य अक्षर पाहून तात्काळ आपल्याला हवं असलेलं औषध देणाऱ्या केमिस्टच्या हालचाली अगदी यांत्रिक असतात. प्रिस्क्रिप्शनचा कागद हातात पडताच त्याचा हात यांत्रिकपणे योग्य त्याच शेल्फवर जातो व योग्य तीच बाटली तो काढून देतो. यात चुका होत नाहीत. छोट्या दुकानात ५०० पर्यंत निरनिराळी औषधं असतात, तर मोठ्या दुकानात १० हजारपर्यंतही ती असतात. ही सर्व औषधं त्यांची तोंडपाठ असतात.

---

विक्रेत्यांप्रमाणे कॅटलॉग व प्राइस लिस्ट ग्राहकासाठी उपलब्ध असावी. 'व्यापारी मागितल्याशिवाय पावती देत नाहीत. ती मिळालीच पाहिजे.' 'अन्नधान्याप्रमाणेच औषधांवर कर नसावेत किंवा असल्यास कमी असावेत—' एक महिला. दोन प्रतिक्रिया फारच मासलेवाईक वाटल्या. अन्न खाऊन जिवंत रहायचं की औषधं घेऊन उपासमार करायची, 'मिळालेल्या पगारात ७५ ते १०० रुपये औषधांवर खर्च झाले तर मग असाच प्रश्न उभा रहातो.' 'रोगांपेक्षा औषधांच्या किंमतीच जीवघेण्या असतात.' पण या प्रतिक्रिया अजमावत असताना मला असं आढळलं की दुर्दैवाने या महत्त्वाच्या प्रश्नावर लोकजागृती नाही. गरीब बिचारा सामान्य माणूस फक्त एकच जाणतो किंमती चढचा आहेत. किंवा औषधं बाजारात उपलब्ध नाहीत पण स्वतःला बुद्धिवादी समजणाऱ्यांचं काय? 'आम्ही औषधं वापरत नाही म्हणून आम्हाला याबद्दल काही सांगता यायचं नाही,' 'आपला हा विषय नसल्यानं याबद्दल काही वाचलेलं नाही' ऑफिसात गप्पा मारीत बसलेल्या एका ग्रूपची प्रतिक्रिया अजमावण्यासाठी त्यांना त्यांची मतं सांगण्याची विनंती करताच उत्तर आले 'आता वेळ नाही, दोन दिवसांनी या.'

या सर्वांवर एका सॉलिसिटर महाशयांनी वरताण केली. 'ग्राहक म्हणून या प्रश्नावर आपली प्रतिक्रिया काय?' असं विचारताच, 'डोन्ट हॅरॅश मी, आय् ॲम् नॉट ड्रग्ज कंट्रोलर, यू कॅन गो' अशी बोळवण केली.

इतकी ही आपली आस्था.

प्राइस लिस्टबाबत ग्राहकांनीच विक्रेत्यांकडे जागरूकपणे विचारणा करायला पाहिजे, पण जिथे घेतलेल्या मालाची पावतीही मागितली जात नाही तिथे अशी अपेक्षा काय करायची!

सरकारी अधिकाऱ्यांकडे खरं म्हणजे सांगण्यासारखं काहीच नाही या प्रश्नावर, पण त्यांचा असा दावा की सरकारचं धोरण यशस्वी झालं असून ते जागरूकपणे व डोळयात तेल घालून अंमलबजावणी करीत आहेत. लोकांनी त्यांची गाऱ्हाणी, तक्रारी त्वरित सरकारकडे द्याव्यात. तेव्हा वाचकहो, याबाबत काही तक्रारी असल्यास आपण त्या ड्रॅग्ज कंट्रोलर वा त्या खात्यातील अधिकाऱ्यांच्या नजरेला आणू शकता.

एकूण काय, असा आहे हा औषधांच्या किंमतीबाबतचा घोळ. □ □ □

---

देशात एकूण ७० हजार केमिस्टची दुकानं आहेत. मुंबईत साधारणपणे ती ६०० आहेत, तर त्यापैकी १५ ते २० डे ॲन्ड नाईट केमिस्ट आहेत.

औषधांच्या खपाचं प्रमाण पुढीलप्रमाणे असतं.

४० टक्के ॲन्टीबायोटिक्स
३० „ व्हिटॅमिन्स, टॉनिक्स.
१० „ लाईफ सेव्हींग ड्रग्ज.
२० „ इतर औषधं.

---

सकाळचे १० वाजायला १ मिनिट कमी होतं, आणि मी नारायण पेठेतील 'जोशी भवन' मध्ये प्रवेश केला.

'नमस्कार'! 'गुड् मॉर्निंग.'

मी हसतच हॉलमध्ये प्रवेश केला. मित्रमंडळी वाटच पहात होती.

'बोला. आम्ही आपल्याला काय काय माहिती देऊ ?'– एक प्रश्न.

'आपण असं करूं या. आपण मला वाटेल ते प्रश्न विचारायचे आणि जाता जाता माझ्या शंकांना पण उत्तरं द्यायची. कबूल !

मी – 'मला सांगा, आपण एवढे सगळेजण भारतात कशाकरता आलात ?'

माझ्या प्रश्नाचा रोख ओळखून घाऱ्या डोळ्याची कॅट्रीन (Catrin) पुढे सरसावली.

'आम्हाला भारतीय संस्कृती व जीवन या विषयी बरीच माहिती वाचायला

---

फ्रान्स मित्रमंडळाचे वतीने ऑगस्ट महिन्यात १४० फ्रेंच मध्यमवर्गीय नागरिकांनी भारतामध्ये मुक्काम केला होता. त्यातल्या काहींचे वास्तव्य पुण्यात व इतरांचे नाशिक, गोवा, मुंबई, कोल्हापूर या ठिकाणी होते. पुण्यातल्या फ्रेंच मित्रांशी विलास जोशी यांनी केलेल्या या मनमोकळ्या गप्पा...

# नवे मित्र - नव्या ओळखी

---

मिळाली. त्यामुळे एकदा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा अशी तीव्र इच्छा होती त्यामुळे 'पुणे मित्र मंडळा'तर्फे संधी मिळाल्यावर आम्ही लगेच तयार झालो'

'छान ! मग अनुभव काय म्हणतोय ? येथील मुक्काम कसा काय वाटला ? '

'अगदी अपेक्षित, आम्हाला भारतीय कुटुंबात अगदी मोकळेपणानं वागायला मिळाले; आणि वैशिष्टच वाटलं ते कुटुंबातील एकमेकांचे असलेले जिव्हाळ्याचे संबंध पाहून !'

मी हा धागा पकडून प्रश्न फेकला,

'अस्स्. तुमच्या देशात या बाबत काय परिस्थिती आहे ?'

'मॅथेमॅटिक्स्' घेऊन पदवी मिळवलेला ल्युक ब्रेबिअन् सांगू लागला,

'तुम्ही वर्तमानपत्रातून व इतरत्र जे वाचले असेल किंवा जे ऐकले असेल ते सत्य आहे. आज आमच्या देशात वैयक्तिक स्वातंत्र्याचे स्वैराचारात रूपांतर होत आहे.

त्याच्या जोडीला समृद्धी व यांत्रिक जीवन यामुळे आमच्याकडे कुटुंबव्यवस्था पार कोसळून गेली आहे.'

मी त्याला मध्येच थांबवीत डोक्यात घोळत असलेला 'स्टँडर्ड' प्रश्न टाकला,

'आजकाल प्रसिद्ध असलेल्या हिप्पी पंथाची ही पार्श्वभूमी तर नाही?'

तेव्हा काहीसे गंभीर होत कॅट्रीन म्हणाली,

'बरोबर आहे तुझा अंदाज. या विचित्र परिस्थितीला तरुण पिढी वैतागली आहे. आणि त्याचा परिपाक म्हणजे हिप्पी पंथ. आणि त्यामुळेच शांत जीवन जगत असलेल्या भारतीयांचे आम्हाला आकर्षण आहे.'

या चोघांमध्ये कॅट्रीन फ्रॅन्सिस ही इंग्लिश विषय घेऊन पदवी मिळवलेली होती. त्यामुळे आमच्या संभाषणात तिला दुभाष्याचे काम करावे लागे.

मी लगेच त्यांच्या तेलपाणी न केलेल्या, मोठ्या केसांकडे, व दरिद्री दिसणाऱ्या व बोटभर वाढलेल्या दाढीमिशांकडे बघून म्हटले,

'हे असे केस वाढवणे ही फॅशन आहे की सर्वसाधारणपणे सर्वच असा 'अवतार' करतात?'

तसा तो 'स्वातंत्र्यभक्त' फ्रेंच थोड्या घुश्शातच उद्गारला,

'नाही नाही, ही आमची वैयक्तिक आवड आहे. आम्ही वाटेल तो वेष करू शकतो. कोणतेही बंधन नाही आमच्यावर!'

'रागावू नकोस ल्यूक, मी आपली शंका व्यक्त केली.' लगेच त्याची कळी खुलली. मी तो विषय तेवढ्यावरच सोडला.

तेवढ्यात मला हार्वे मॅस्कीलिअरच्या गळ्यात रुद्राक्षाच्या माळा दिसल्या, मनात म्हटले, याला जरा बोलता करावा.

'अरे हार्वे, तू या माळा का घातल्या आहेस, सहज का काही...'

'छे, छे, आम्हाला भारतात येण्यापूर्वी असे सांगितले आहे की या माळा घातल्या की भारतीय लोक दारू पीत नाहीत आणि आम्ही भारतात असेपर्यंत 'ड्रिंक्स्' घेणार नाही हे लक्षात रहावे म्हणून.'

तेव्हा कॅट्रीन मला म्हणाली, 'तुझे नाव ज्योश्यी (जोशी) मग तू 'ब्राह्मीन' आहेस.' मी 'हो' म्हटले. मग लक्षात आले की यांचे पुण्यातील यजमान 'जोशी'च असल्याने पाहुण्यांनी ही माहिती गोळा केली होती.

'मग तू दारू पीत नाहीस का? मांसाहारी नसशीलच.'

तेव्हा मी त्याची खरीखुरी उत्तरे दिली. अर्थात तसा मी 'सोवळा' आहेच.

'पण तुम्ही एवढ्या चिकीत्सकपणे हे का विचारता?'

'सांगते' कॅट्रीन म्हणाली, 'या ल्यूकने संस्कृतचा अभ्यास सुरू केला आहे. त्यातील काही शंका आहेत. सांगशील?' मनात म्हटले, 'आता आले का गंडांतर मुळावर, 'हे बघ! मी शक्यतो प्रयत्न करीन उत्तरे देण्याचा.'

'संस्कृत शिकणाऱ्याला मांस व दारू वर्ज का?'

'त्याचे असे आहे, दारू व मांसभक्षणाने आपली जीभ जड होते व त्यामुळे जोडशब्दाचा स्पष्ट उच्चार करणे जड होते.'

'पण संस्कृतमध्ये उच्चाराला एवढे महत्त्व का?'

'कारण जेव्हा मनुष्याला लेखनकला अवगत नव्हती किंबहुना चांगली लेखन-सामग्री उपलब्ध नव्हती त्या प्राचीन काळी संस्कृत भाषा जन्माला आली आणि त्यामुळे एका पिढीतून दुसऱ्या पिढीला ज्ञान देण्याला फक्त पाठांतर हा एकच मार्ग होता. शिवाय उच्चारात थोडा फरक झाला की संस्कृतमध्ये अर्थाचा अनर्थ होतो त्यामुळे तर एवढे महत्त्व...'

आणि मग मी त्यांना आपण सहलीच्या वेळी खेळ खेळतो त्या एकमेकांना वाक्य 'पास' करण्याच्या खेळाचे उदाहरण दिले आणि गंमत म्हणजे फ्रान्समध्ये आपण तो खेळ 'मित्रात' खेळत असल्याचे त्याने सांगितले व त्यामुळे शब्दोच्चाराचे उदाहरण फारच चांगले पटले.

'म्हणजे आपण मांस खाणे वर्ज करावे असेच तुला वाटते ना!'

'हो, कारण बघ, मनुष्याची शारीरिक घडण व जंगलातील मांसभक्षक प्राण्याची घडण याची तुलना कर. आपल्याला रात्री दिसत नाही, मांस खायला सुळे नाहीत, नख्या नाहीत, त्यामुळे निसर्गाने आपल्याला मूलत: शाकाहारी बनवले आहे!'

'पण आपण काटे चमचे वापरून ही सोय करतो ही गोष्ट वेगळी.'

ल्यूक आता विचारात पडला, 'म्हणजे मला हे कायमचे बंद केलें पाहिजे?'

'जरूर तुझा फायदा होईल आणि तुझे तुलाच उत्तर मिळेल.'

'मी जरूर प्रयत्न करीन' ल्यूक आत्मविश्वासाने म्हणाला.

तेवढ्यात कॉफी व सँडविचेस् आल्याने खंड पडला व माझा जीव जरासा भांड्यात पडल्यासारखा वाटला; एवढ्यात कॅट्रीनने आठवल्यासारखे करीत एक डायरी काढली व त्यात पाहून म्हणाली,

'तुमचे वेद परमेश्वराने लिहिले म्हणजे कसे रे? आणि सोमरस म्हणजे काय? तू कधी प्यायला आहेस का?'

हा बॉम्बगोळा अनपेक्षित असल्याने माझ्या कॉफीचा कप हातातच राहिला. कारण यांच्याकडून असे प्रश्न अपेक्षित नव्हते. पण नशीबाने याच विषयावर पूर्वी कधीतरी वाचले होते नाहीतर 'विकेट' गेली असती.

'तुला अगदी खरे सांगतो. आजपर्यंत कोणत्याही देवानं प्रत्यक्ष लेखन केलेल्याला पुरावा नाही. पण आमची एक भारतीय रूढी आहे की कोणत्याही चांगल्या पवित्र व श्रेष्ठ कार्याचे श्रेय परमेश्वराला द्यायचे, आपण घ्यायचे नाही. शिवाय वेद हे अतिप्राचीन असल्याने मूळ लेखक कोण वा किती हे कळायला मार्ग नाही म्हणून ते मनुष्याने लिहिले नाहीत असे म्हटले जाते.'

'आता सोमरसाविषयी म्हणशील तर आजकाल तरी तो उपलब्ध नाही. असे म्हणतात की हिमालयातील योग्यांजवळ तो असू शकेल.'

पण एवढ्या उत्तराने त्यांचे भागणार नव्हते म्हणूनच की काय 'तू म्हणालास की संस्कृतचा अभ्यास करणारे दारू पित नाहीत मग वेदात सोमरस कसा चालतो ?'–एक आणखी बाँबगोळा.

'हे बघ तू चहा घेतेस ना ? त्याने तुला उत्साह वाटतो, हो ना ? आणि 'वाईन' पण घेतेस. त्याने पण 'उत्साह' येतो पण चहा पिऊन तू बेताल (Sensationless) तर होत नाहीस ना ? तसेच सोमरसाचे आहे. ते वनस्पतिपासून बनवलेले अतिसौम्य उत्तेजक पेय होते. पूर्वी यज्ञाचे वेळी ३-३ तास मंत्र म्हटल्यावर येणारा थकवा जाण्याकरता सोमरस प्राशन केला जाई. त्यावेळी चहा नव्हता. आता सोमरस नाही.' आम्ही सर्व एकदम हसलो आणि मी सुटलो.

आता मी विषयाचा सांधा बदलला. विचाराची गाडी धावू लागली. 'बरं ल्यूक, तुला येथील तरुणवर्ग कसा काय वाटला ?

'विलास, तू रागावणार नाहीस ना, मी येथील तरुणांना भेटायचा प्रयत्न केला पण मोकळेपणाने बोलणारे कमी भेटले. बहुतेकांना politics मध्ये इंटरेस्ट नाही. जरा थंडच वाटला.'

'जरा चुकत असेल कदाचित कारण आमचा मुक्काम फार थोडा आहे पण आमचा अजूनही विश्वास आहे की भारतीय लोक आपल्या परंपरागत रूढी (Traditional Customs) राखून सुद्धा नवीन जीवन जगताहेत; पण आताचे येथील तरुण पाहून अशी भिती वाटते की आज तुम्ही पाश्चात्य जीवनाचे जे कौतुक करीत आहात त्यामुळे जीवनावश्यक म्हणून जी मूल्ये आहेत त्याला तुम्ही मुकत आहात; तर मग आमचे समाजशास्त्रज्ञ म्हणतात की, युरोपिअन वा अमेरिकन विद्यार्थ्यांपेक्षा भारतीय विद्यार्थी अधिक इहवादी (Materialistic) आहेत त्यात काय चूक ?'

मला मात्र या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण गेले.

'मात्र एकंदर वागणुकीत ते नम्र व मदत करण्यास उत्सुक दिसले.'

'मग या बाबतीत आमचे वेगळेपण नक्कीच जाणवले असेल !'–मी

'निश्चित' कॅट्रीन शांतपणे म्हणाली. 'पण भारतीय तरुणी कमालीची लाजाळू व आत्मकेन्द्रित दिसली, ती अजून रूढीबंधनात अडकून पडली आहे.'

'कारण आमची भारतीय संस्कृती स्त्रियांच्या या वागणुकीतच सामावली आहे.' मी अभिमानाने सांगितले.

'पाश्चात्य स्त्रियांसारखे स्वैर वागणे शक्य होणार नाही.' मी टोमणा उलटवला.

'भारतीय कुटुंबाबद्दल काय वाटले ? पाहुणचार कसा वाटला ?'

'उत्तम, फारच उत्तम, खरंच आणखी एक महिना रहावेसे वाटते, पण जेवण फारच तिखट वाटले, पण आदरातिथ्य फारच झाले.'

'पण काही काही 'होस्ट' आपल्याला फ्रान्सला कसे जाता येईल किंवा

काही मौल्यवान वस्तू भेट म्हणून कशा मिळतील याचाच विचार करताना दिसत." कॅट्रिन नाक मुरडत म्हणाली.

'पण ही मनुष्यवृत्ती सर्वत्र आहे. खरं की नाही?'

'बरोबर,' 'पण जे दिसले ते सांगितले.'

'मला तुमची भारतीय साडी, कुंकू, वेण्या, व लाल रंगाचे पॉलीश (मेंदी) आवडले. घेऊन जाणार आहे मी.'

तेवढ्यात ल्यूक म्हणाला, 'विलाश, आम्ही येथे नेहरू-शर्ट वापरतो पण तुम्ही तर पाश्चिमात्य पोशाखात कसे? धोतर का वापरत नाही?'

'कारण आम्ही शहरवासी हा भारतीय पोशाख समारंभातच वापरतो. आता तूच सांग, माझ्यासारख्या सिव्हील इंजिनिअरला हे धोतर नेसून काम करणे कसे जमेल? हा Convinience चा प्रश्न आहे! खेडोपाडी व उत्तर हिंदुस्तानात मात्र सर्वत्र वापरतात.'

इतर गप्पात त्यांनी अजंठा-वेरूळची लेणी, बत्तीस शिराळचाचा नागमहोत्सव, मंगळागौरीचा समारंभ आवडल्याचे सांगितले. पाहुणे पुण्यावर फारच खूष दिसले.

खोलीत इकडे तिकडे वातावरण मात्र अत्यंत गैरशिस्तीचे होते. त्यांचे कपडे, सिगरेटचे थोटके, सकाळी प्यालेल्या चहाचे कप तसेच पडलेले दिसत होते. माझे हे निरीक्षण ल्यूकच्या ध्यानात आले. तो हळूच म्हणाला, 'ही शिस्त आम्हाला जमत नाही, काहीही असो.' मला त्याच्या मोकळेपणाचे कौतुक वाटले.

तेवढ्यात कॅट्रीनला साडी नेसायची हुक्की आली आणि तिने तो कार्यक्रम तिथेच लगेच सुरू केला. मला मात्र विचित्र वाटू लागले, कारण नाही म्हटले तरी भारतीय संस्कृतीचा पगडा सुटू शकत नाही. त्यामुळे ही संधी पकडली व ल्यूकला म्हटले,

'अरे, जरा पडदा ओढून घे बघू.' त्या बिचाऱ्याच्या काय लक्षात येणार?'

शेवटी मी स्वतःच ते काम केले आणि त्यांच्या डोक्यात 'प्रकाश' पडला.

'अरे ओ, आमच्या लक्षातच आले नाही, माफ कर, आम्ही हिंदुस्थानात आहोत, आले लक्षात.'

'पण काय रे, असा नियम वगैरे आहे का?'—ल्यूक.

'नाही,' मी म्हटले. 'पण तुमच्या आमच्या संस्कृतीतील हा फरक आहे, आणि तुला तो समजला आहे. परत वेगळे उत्तर नकोच.'

अर्थात यामुळे सर्वच जण प्रभावित झाले ही गोष्ट वेगळी. शेवटी जाता जाता मी विनंती केली.

'आपण बऱ्याच चांगल्या वाईट गोष्टी बोललो, समजावून घेतले. आता शेवटची विनंती आहे की जेव्हा फ्रान्सला परत जाल तेव्हा येथील ज्या चांगल्या गोष्टी समजल्या तेवढ्याच सांगा. आपण गैरसमज पसरवणार नाही, अशी खात्री वाटते!"

'अच्छा,' 'नमस्कार,' 'मर्सी, मर्सी.' ◻ ◻ ◻

# एंजॉयमेंट

**मोहन जोशी**

पाच वाजायला आले तसं विभावरीने पुढ्यातील मशिन बाजूला सारलं. ट्रे पुढं सरकविला. रुमालानें कपाळावरचा घाम पुसून दीर्घ निःश्वास टाकला. ट्रे टायपिंगच्या कागदांनी भरला होता. रोजचीच ही स्थिती असायची. ऑफिस सुरू झाल्याबरोबर, एकही ड्राफ्ट शिल्लक ठेवायचा नाही या प्रतिज्ञेनं ती टायपिंगला सुरुवात करायची. आदल्या दिवशीचे काम उरकता उरकता चहाची वेळ होऊन जायची. ट्रे हळूहळू रिकामा होत जायचा आणि चार वाजले न वाजले तोच, सगळ्या टेबलाकडून अर्जंट, एक्स्प्रेस, टॉप प्रॉयर्टी अशी लेबलं लावलेल्या ड्राफ्टचा ओघ लागायचा. सगळ्यांनाच आपल्या कामाची घाई. "बाई, आमची लेटर्स तेवढी अगोदर टाईप करून द्या; जरा अर्जंट आहेत !" हे प्रत्येकाचेच बोलणे. मग हेडक्लार्क जागेवरून उठायचे–त्यांनी सारा ट्रे चाळायचा नि त्यातली काही लेटर्स मंदा देशपांडेच्या पुढ्यात टाकायची. खरोखरीच अर्जंट असणारी पत्रं निवडून विभावरीला तेवढी अगोदर टाईप करायला सांगायचे. आपल्याला काम लागलं म्हणून, मंदा देशपांडे कुत्सित नजरेनं विभावरीकडं कटाक्ष टाकायची हे नेहमीचंच ठरलेलं !

विभावरीनं पाहिलं मंदाने आपले काम केव्हाच गुंडाळून ठेवलं होतं. पर्समधून आरसा काढून, टेबलाआड धरून, ओठावरून रुमाल फिरविण्यात ती दंग झाली होती. विभावरीच्या मनात रागाची सूक्ष्म लाट उसळून गेली आपल्या रूपाचा तोरा मिरवायची मंदाला भारीच हौस होती. बघावं तेव्हा पर्समध्ये लिपस्टिक, नेल पॉलिश, पावडर नि स्नो ही सौंदर्यप्रसाधनं भरलेली असायचीच ! जरा कुठं वेळ मिळाला की, झालं हिचं सुरू सौंदर्यप्रसाधन नि मेकप् !

विभावरी टक लावून बघत होती तोच मंदाचं तिच्याकडं लक्ष गेलं. विभावरीला उगीचंच ओशाळल्यागत झालं. मंदाचं कुत्सितपणाचं स्मित तिला झोंबून गेलं. मंदानं



पर्स मिटली नि ड्रॉवरमध्ये टाकून दिली. घड्याळाकडं बघत ती जागेवरून उठली. पेंडशे केव्हाचा तिच्याकडं नजर लावून होता. ती सरळ त्याच्या टेबलाशी गेली. नेहमीप्रमाणं कुजबूज, हसणं–खिदळणं सुरू झालं. दिभावरीला हे सारं असह्य होत होतं. राहून राहून तिला मंदाचा हेवा वाटायला लागला. आपण इतकं मर मर मरतो, प्रत्येकाची कामं म्हणतील त्यावेळी देतो, पण कामाव्यतिरिक्त कोणी आपणाशी बोलतसुद्धा नाहीत. नाहीतर ही मंदा...साहेबाच्या वशिल्याचं प्यादं ! टायपिंग येत नाही. स्पीड धड पस्तीससुद्धा नाही. टाईप केलेल्या ड्राफ्टमध्ये हजार चुका. पण डौल केवढा ! साऱ्या ऑफिसात नि बाहेर टेंभा मिरवत असते सदान्‌कदा !

पुन्हा एकवार जळफळणाऱ्या नजरेनं विभावरीनं पाठमोऱ्या मंदाकडं नजर फेकली. पेंडशे नि ती एकमेकांकडं बघून खिदळत होती. तिला कससंच झालं. पुढ्यात कामाचा ढीग पडलेला असला तरी, ह्या मंदाला काहीच कसं वाटत नाही ? गप्पा मारायला तर कोणीही कसा चालतो हिला ! पेंडशे आला बडबड...कुलकर्णीशी वटवट...करकरेशी तर रोज अर्धा तास तरी जातोच ! पुरुषांबरोबर गप्पा मारताना ती रंगून जाते कशी, ह्याचं विभावरीला राहून राहून आश्चर्य वाटायचं.

दीर्घ जांभई देऊन तिनं आळस झाडला. दोन्ही हात नि पाठण दुखत होतं. तोंड सुकून गेलं होतं–शिपायाकडून पाणी मागून घेतलं. खवखवलेल्या पोटात गार पाणी गेलं तसं, तिला जरा तरतरी आली. ऑफीसची उद्यापर्यंतची कटकट संपली ह्या विचारानं तिला जरा हलकं वाटू लागलं. पण लागलीच घरची व्यवधानं सुरू झाली. आज तरी आई उठली असेल का अंथरुणावरून ? नाही तर तांदूळ-डाळ निवडण्यापासून सगळा स्वयंपाक करण्यापर्यंत...छे छे ! असं असेल तर चहाचं पाणीसुद्धा करून घेणं नको ! नुसत्या विचारानंच तिचा जीव आंबून गेला. ऑफि-सात कामानं मरायचं. घरात कामानं मरायचं. जीवनात कुठं म्हणून कुठं ओलावा नाही...प्रेमाचा शब्द नाही. प्रकाशला मागेल त्यावेळी पैसे पाहिजेत, का तर कॉले-जात जातोय ना ! घरभाड्याचे पैसे एक तारखेला पाहिजेत...दुधाचं बिल... किराणा–भाजी...आणि त्यात भर आईच्या औषधांची नि डॉक्टरच्या बिलाची ! वर्षांतून दोन पातळं घ्यायची म्हटलं तर मुष्किल. पावडर, लिपस्टिकचं तर नाव नको ! विभावरी आपल्याच कर्मावर राहून राहून चिडत होती. खिदळणाऱ्या मंदा नि पेंडशाकडं बघून तिची तगमग आणखीन वाढत होती.

ह्या मंदासारखं हवं होतं. नोकरी का करायची, तर म्हणे चैन म्हणून ! बाप मोठा कॉंट्रॅक्टर. घरात फियाट आहे. गडी-माणूस आहे. आई क्लबात जाते–मग घरी बसून करायचं काय ? तेवढेच अडीच तीनशे रुपये वरखर्चाला झाले ! विभावरीचं चित्त शहारून गेलं. अडीच–तीनशे रुपये नि वरखर्चाला !!

दरमहिन्याला मंदा नव्यानव्या साड्या दाखवायची. कुणी घेतल्या ? तर म्हणे पपांनी ! म्हणाले, "मंदे, तुझे पैसे खर्च करू नकोस. तसेच ठेवून दे !" मग ते तिला काय हवं ते घेऊन द्यायचे. आज तात्या असते तर ? तर आपणही अशीच मजा केली असती. एवढी नाही, पण खूप मोकळेपणानं वागता आलं असतं. तो कुलकर्णी, पेंडशे, सारीजण आपणाला कुढ्या वृत्तीची म्हणतात–बाई मोकळेपणानं बोलतच नाहीत, आपल्याच विचारात असतात अशी नावं ठेवतात. पेंडशे एवढा मोकळ्या मनाचा माणूस तर, तो म्हणतो, "बाई, तुमच्याशी बोलायला भीती वाटते आपणाला !" असं भीती वाटण्याजोगं आहे तरी काय आपणात ?

पेंडशेच्या हसऱ्या घाऱ्या डोळ्याबरोबर तासन्तास बोलत बसावं, असं तिला वाटून गेलं, पण एवढं धाडस आपल्या हातून व्हायचं नाही, ह्या जाणीवेनं ती

स्वतःशीच निराश झाली. हेडक्लार्क मात्र आपणाकडे सहानुभूतीनं बघतात, हा विचार तिला सुखावून गेला. त्यांचे नेहमीचे शब्द मनात घोळून गेले, "बाई, परिस्थितीनं तुम्हाला अबोल केलंय्, मला माहीत आहे !"

आपण एकटे होतो त्यावेळी एकदा ते म्हणाले होते, "ही छचोर पोरगी कुणाच्या तरी हातात हात घालूनच निघून जायची !" हेड्क्लार्कनी केलेली मंदाची पारख बरोबरच आहे. आपणाकडून असे अविचारी कृत्य व्हायचं नाही, हे तिला मनोमन पटलं. नी त्याबरोबर सुकलेल्या चेहऱ्यावर समाधानाची सूक्ष्म छटा उमटून गेली.

"बाई, तो 'इंडोस्वीस्' कंपनीचा ड्राफ्ट टाईप झाला नाही?" हेड्क्लार्क टेबलाशी येऊन विचारत होते.

"नाही केला !"

"हवाय् तो ! साहेब म्हणताहेत आजच्या आज डिस्पॅच करा !"

सुटले, म्हणून निःश्वास टाकून बसलेल्या विभावरीला कुणीतरी मणामणाचं ओझं डोकीवर ठेवतंय् असं वाटलं. नाराजीनं चेहरा झाकळून गेला. हेड्क्लार्क चष्म्याच्या कोपऱ्यातून तिच्या तोंडाकडं नजर लावून होते. तिच्या नाराज झालेल्या चेहऱ्याकडं बघून ते टेबलाशी रेलत म्हणाले, "बाई, खूप ताण पडलाय् मान्य आहे मला. पण..." आणि कानाशी तोंड आणत हळू आवाजात ते पुटपुटले, "पण...ही बाई व्यवस्थित टाईप करायची नाही. नी पुन्हा पुन्हा तुम्हालाच त्रास देत बसायचं आम्ही ! प्लीज...!" त्यांच्या ह्या वाक्यावर विभावरी जरा खुश झाली. ट्रेमधील कागदातून इंडोस्वीसचा अॅड्रेस केलेला ड्रॉफ्ट शोधून काढला. पुढ्यात मशिन ओढून घेतलं.

साहेब उठले तसं मंदा नी विभावरी एकदमच बाहेर पडल्या. गेटपर्यंत जातात न जातात तो पेंडशे नी करकरे पाठोमागून सायकली हातात घेऊन आले. दोघींनाही पेंडश्यानं गाठलं. विभावरीनं सहज नजर टाकली. तो पेंडशे तिच्याकडं येत होता. "बाई, वेळ आहे तुम्हाला ?"

"का ?"

"काम नाही काही ! गीतामध्ये चहा घेऊ जरा !" विभावरीने अभावितपणे होकार दिला. आज कित्येक दिवसांनी पेंडशेनं आपण होऊन विचारलं होतं. खरं म्हणजे घरच्या ओढीनं तिचं पाऊल वेग घेत होतं. पण तोच वेग कमी झाला.

मंदाचा चेहरा मात्र उतरला होता. चहाची ऑफर विभावरीला करावी. ते सुद्धा आपण बरोबर असताना ! तिला पेंडश्याचा नी विभावरीचाही राग आला. कुत्सित नजरेनं तिनं तिच्याकडं कटाक्ष टाकला. उघडपणे न बोलता आल्यानं क्षणभर ती मनातच कुढत राहिली. ह्या अपमानाचं उट्टं कधीतरी काढू असाही विचार तिच्या डोक्यात घुमून गेला. पण फार वेळ मंदाला त्या कुबट विचारात

गुंतून राहवं लागलं नाही. पेंडशेनं नी करकरेनं तिला बोलतं केल्यावर लगेच तिची कळी खुलली.

अशीच रोज कुणीतरी कंपनी द्यावी, चार घटका मनमोकळ्या गप्पा माराव्यात, हास्यविनोद करावा. रोजची तीच तीच रखरख, त्याच समस्या, त्याच चिंता ह्यावर क्षणभराच्या अशा ह्या सहवासाने; दिवसभर आंबलेल्या मनाला विसावा मिळावा; असं विभावरीला राहून राहून वाटत होतं. तेवढ्याश्या सहवासानं तिच्या मनात हिरवळ फुलून आली होती.

चौघेही रेंगाळत रेंगाळत गीता कॅफेत पोहोचले. विभावरीतर स्वतःला विसरून, मनमुराद मुक्तानंद लुटत होती. पेंडशे नी करकरे ऑफिसातल्या बाई ह्याच काय; ह्या नजरेनं तिच्याकडं पहात होते. इतके मोकळे बोलणे त्यांना प्रथमच जाणवत होते. चहा घेऊन बाहेर आल्यावर मंदाने सर्वांकडं नजर फिरवीत प्रश्न केला, "फिरायला जाऊया का?" "बाईंना वेळ आहे का?" पेंडशेनं प्रश्न केला. त्याच्या या वाक्यानं मोकळेपणानं वागणारी विभावरी एकदम गंभीर झाली. घड्याळात पाहिलं. साडेसहा वाजून गेले होते. इथून बस गाठायची...आई अंथरुणावर असेल तर...प्रकाशला स्टडीरूमला जायचं असणार...नी तिचं सारं चित्र विस्कटून गेलं. चहाला येऊन कुठल्याकुठं वेळ घालविला असा तिला पश्चात्ताप होऊन गेला. पेंडशे ती येईल म्हणून आशाळभूत नजरेनं बघत होता. क्षणभर तिनं स्वतःला सावरून घेतलं. मोठ्या कष्टानं आवंढा गिळत ती म्हणाली, "एक्स्यूज् पेंडशे, जायला हवं मला घरी लवकर–आई बेडवर आहे!"

प्रतिस्पर्धी विनासायास दूर झाल्याचा आनंद मंदाच्या चाणाक्ष डोळ्यात चमकून गेला. पेंडशे किंचित ओशाळला. पण लगेच स्वतःला सावरून घेतलं, "सॉरी हं बाई, मला माहीत नव्हतं हे! तरीपण चहाला कंपनी दिलीत याबद्दल...!" त्याचे पुढले शब्द ऐकायला विभावरी तिथं नव्हती.

दारातून पाऊल टाकता तिनं कानोसा घेतला. आई भिंतीशी टेकून खोकत होती. अनावर आलेल्या उबळीनं ती घामाघूम होऊन गेली होती. जातेवेळी झाडून व्यवस्थित अंथरलेल्या गादीचं विस्कटून लक्तर झालं होतं. गादीवर एका बाजूला अर्धवट निवडलेल्या तांदळाचं ताट ठेवलं होतं. खोकल्याची उबळ आल्यावर ते तिनं बाजूला सारलं होतं.

हातातली पर्स टाकून विभावरीनं स्वयंपाकघरात डोकावलं. प्रकाश स्टोव्ह पेटवून चहा करत होता. पुढ्यात कागदात गुंडाळलेला पाव पडला होता.

घरातलं हे वातावरण बघून विभावरीचं मन एकदम उदास झालं. खोकून खोकून घामाघूम, नि घाबऱ्या झालेल्या आईकडं बघून तिची कीव आली. तशाही परिस्थितीत तांदूळ निवडून स्वयंपाक करायची तिची धडपड बघून, आपण चहा घेत बाहेरच वेळ काढला याचं तिला वाईट वाटलं. स्वयंपाक तयार नाही म्हणून, चहा-पाव

ढोसून प्रकाश स्टडीरूमला चाललाय् हे बघून ती शरमिंदी झाली.

तिनं पुढं होऊन प्रकाशला चहा दिला नी लगोलग भाताला ठेवलं. भात होईतो थांबायचं प्रकाशनं कबूल केलं, तसं तिचा जीव शांत झाला — स्वयंपाकाचं मार्गी लावून ती आईकडं आली. सकाळी आणलेल्या औषधाचा डोस द्यायचा होता. बाटली हलवून तिनं डोस दिला. पुडीतली टॅबलेट नी पाण्याचं भांडं आईच्या हाती दिलं. आईच्या कृश देहाकडं बघून तिला भडभडून आल्यागत झालं. झटकन ती तिथून उठली नी स्वयंपाकघरात आली.

कढ येणाऱ्या भाताचे बुडबुडे मोठे होत वरवर येत होते नी फुटत होते—त्याकडं बघता बघता विभावरी आपल्या जीवनाच्या सुखदुःखांची बेरीज—वजाबाकी करीत होती. सारं आयुष्य असंच गेले. वैराण वाळवंटागत. बघावं तिकडं रखरख नी ऊन !

काजळलेल्या मनानं ती तशीच बसून राहिली. नाही तर त्या मंदाचं भाग्य !

एकदम तिच्या मनात मघाचची घटना चमकून गेली. आपण इथं कुढत बसलोय्. तिकडं मंदा किती मजेत फिरत असेल ? पेंडशे—करकरेबरोबर गप्पा, विनोद, हसणं—खिदळणं ...... नी तो हवाहवासा वाटणारा पुरुषी सहवासाचा मुक्त आनंद ! किती अर्थपूर्ण जीवन जगतेय् ती ! सुखाचा प्याला पुरेपूर भरून पुढं केलाय् देवानं तिच्यासाठी; नाहीतर आपलंही आयुष्य आहेच ......!

पाणी संपलं तसे भाताच्या पातेल्यातील बुडबुडे बंद झाले. विभावरीचे विचार-चक्र हळूहळू गतिशून्य होत गेले.

जेवण झालं तसं प्रकाश स्टडीरूमला निघून गेला. विनवण्या करूनही आई जेवायला तयार नव्हती. अगदीच हट्ट धरला तसं तिनं चहा करून मागितला. विभावरीला मात्र आईच्या तब्बेतीची उगीचच रुखरुख लागून राहिली.

रात्रभर विभावरी अंथरुणावर तळमळत होती. दिवसभर मशिन तडकून हाताचे सांधे ढिले झाले होते. पाठण ठणकत होतं. घरच्या कामाच्या ताणानं मन पुरतं आंबून गेलं होतं — ह्या सगळ्यात भर म्हणजे, दिवसभर मनात घर करून बसलेले विचार उगीचंच डोकं तापवित होते.

मंदाचं भाग्य तिच्या नजरेसमोर उभारलं. कितीदातरी ती तिच्या घरी गेली होती. बंगल्यात पोर्चमध्ये लागलेली तिची फिकट निळी फियाट, मन मोहून रमवून टाकणारी छोटीच पण सुंदर बाग. प्रेमळ नी उत्साही आई—बापांचे पाठीवरून फिरणारे हात — दैवानं लाभलेलं लावण्य, लाघवी बोलण्याने कुठल्याही तरुणाला ओढून घ्यायची तिची असीम जादू. खरोखरंच बघावं तिकडून सुख लाळ घोटवून, वाळ घरत होतं तिच्याभोवती ! आणि आपली स्थिती...? नुसत्या आठवणीनंही विभावरीचं चित्त शहारून गेलं. जीवनातील सगळी दुःखं, सगळ्या यातना नी चिंता हात धुवून आपल्याच मागं......आपल्याच पाठीशी लागल्या आहेत असं तिला

वाटायला लागलं. झोपेऐवजी अर्धीअधिक रात्र सुखदु:खाची बेरीज वजाबाकी करण्यात घालविली तिनं.

दिवसाचे रहाटगाडगे सुरू झाले. आजही आईनं अंथरूण सोडलं नव्हतं. विभावरी विजेच्या चपळाईनं सारी कामं हातावेगळी करीत होती. रात्री न आलेल्या झोपेनं मन पिंजून गेलं होतं. त्याच यातना अजून मनाच्या तळाशी रेंगाळत होत्या. आपल्या परिस्थितीची नी मानसिक ताणाची कुतरओढ यानं तिचं मन पिचून गेलं होतं. दहा वाजले तसं सारी कामं जिथल्या तिथं टाकून तिनं आवराआवरी केली.

रेंगाळत्या दुःखानीच तिचं ऑफिसवर्क चाललं होतं. रोजच्यासारखं आजही मंदा पेंडश्याकडं बघून स्मित करीत होती. कामाची टाळाटाळही नेहमीसारखीच. एखादा ड्राफ्ट दिला तर नाखुषीनं टाईप करीत होती. तिला कोणी बोलत नव्हतं. बॉदरेशन नावाची चीज तिच्या शब्दकोशात नव्हती. उलट पेंडशेला बारीक नजरेनं चोरटा कटाक्ष टाकायला ती साथ देत होती...ओठ विलगून मंद स्मित करीत होती.

ह्या साऱ्या प्रकारानं विभावरी अंतर्बाह्य ढवळून निघत होती. अस्वस्थ होत होती.

ऑफीस सुटल्यावर नेहमीप्रमाणं दोघी जोडीनंच बाहेर पडल्या. आज पेंडशे, करकरे यांनी त्यांना अडविलं नाही. मंदाची नेहमीप्रमाणं सारखी वटवट चालली होती. मधून मधून खिदळतही होती ती–विभावरी मात्र गंभीर चेहऱ्यानं अंतर्मुख होऊन कसल्यातरी विचारात गुंग होऊन गेली होती.

"ए, कसला विचार करतेस एवढा ?" मंदानं तिला डिवचलं.

"अं...काही नाही...कसला नाही !" विभावरी एकदम गोंधळून गेली.

"कोणी बघायला येणार आहे वाटतं ?" पुन्हा मंदानं कोपरखळी दिली.

"अं हं !" तिनं नकारार्थी मान हलविली. मनानं मात्र पलटी खाल्ली. खरंच आज तात्या हयात असते तर ? तर आपल्याला बघायला न्यायचे सोहळे झाले असते. आपल्या भाग्यावर कदाचित चटकन् पसंतही करून गेला असता कोणी पामर ! तात्यांच्या पश्चात् आईनं एकदा कुठल्याशा मुलाला आणलं होतं–त्यावेळी आपण तुटकपणानं वागलो. प्रकाश ग्रॅज्युएट होऊन त्याला नोकरी लागल्याशिवाय आपण लग्न करायला तयार नाही, असं निक्षून सांगून टाकलं. त्याची जणू जाहीरात झाली नी आपण वाळीत टाकल्यागत झालो आहोत.

पुन्हा तिचं मन खोल गर्तेत फिरत राहिलं. ती अधिकच अंतर्मुख झाली. चेहऱ्यावरचं गांभीर्य आणखीन वाढलं. जीवनातली सारी निराशा चेहऱ्यावर साकळून आली. ती काहीच बोलत नाही हे पाहून पुन्हा मंदानं तिला डिवचलं, "ए विभा, तुला एक गंमत सांगायची राहिलीच !"

"काय ?"

"उद्या कॅज्युअल टाकणार आहे मी !"

" म्हणजे कामाचा ताण पुन्हा आपल्यावरच !"

ती स्वतःशीच पुटपुटली.

" कशासाठी माहीत आहे ?"

" अं हूं !"

" एंजॉयमेंट ! फुल एंजॉयमेंट उद्या !" मंदा अत्यानंदानं तिच्यापुढं हात नाचवून सांगत होती.

" म्हणजे ?"

" अय्या ! मी मागं सांगितलं होतं ना की, कारखानीसांबरोबर मॅरेज सेटल् होतंय् म्हणून, ते येणार आहेत उद्या. किती खेळकर आहेत म्हणून सांगू ! त्यांच्याबरोबर खूप हिंडणार आहे उद्या. किती चांगले आहेत कारखानीस ! आणि आम्ही दोघांनीही पार्टी अॅरेंज केलीय्. कसली माहीत आहे ?" आणि मंदा हळूच विभावरीच्या कानात काहीसं पुटपुटली. एकदम विजेचा शॉक बसावा, तशी विभावरी शहारून गेली. झटकन ती दोन पावलं मागं सरकून उभी राहिली. पायाच्या नखापासून सर्वांग थरथर कंपायमान होऊन उठलं. सारं गांभीर्य क्षणार्धात नाहीसं होऊन चेहरा तुच्छतेनं भरून गेला. एक ओंगळ शिसारीची उबळ अंतःकरणात दाटून आली.

" शीः ऽ "

त्या आवेगातच तिच्या तोंडून शब्द गेला. आणि मग स्वतःलाच ओशाळल्यागत झालं. तरीही मंदा खदखदा हसत होती.

" मग त्यात काय ! नाहीतरी उद्या मॅरेज होणार आहेच की आमचं !" बेफिकिरीनं मंदा बोलून गेली.

आणि त्याचवेळी विभावरीचं मन चिंतून गेलं–समजा नाहीच झालं हे लग्न तर ?? ती उगीचच शहारून गेली. वाईट चिंतू नये. पण विचार आले ते काय आवरता येतात ! नाही त्या चिंता उगीचंच आपल्याला ग्रासतात, डोकं भडकावून सोडतात.

मंदाच्या भाग्याचा हेवा करणारी विभावरी एका क्षणात बदलून गेली. हे भाग्याचं जीवन का स्वैराचारी भोगवाद ? छे छे ! असल्या श्रीमंती थाटाचा टेंभा मिरवून, भोगाकरिता जीवन जगायचं ? कुमारी असताना, उद्या त्या कारखानीसाबरोबर लग्न होणार या शाब्दिक आधारावर अॅजॉयमेंट् म्हणून, त्याला सर्वस्व अर्पण करायला निघालेल्या मंदाच्या श्रीमंतीचा, तिच्या सौंदर्याचा हेवा वाटणाऱ्या विभावरीला एकदम तिची शिसारी आली. हा श्रीमंतीचा उपभोग नव्हता. ह्यापेक्षा त्या मंदानं सरळ नरकात लोळून यावं !

चैन म्हणून नोकरी...महिन्याला नवनवीन साडया...पावडर नि लिपस्टीकचा

सोस...नेल पॉलिशची हौस...पुरुषांबरोबर खिदळत स्वतःला हरवून जाणं... वागण्यातला हा भोंगळपणा...आणि आता..."

मंदाच्या या ध्येयशून्य जीवनाची तिला एकदम शिसारी आली. ह्यापेक्षा भिकारड्या खोल्या कशाबशा सजवून, गिऱ्हाईकांची वाट बघत बसणाऱ्या वेश्या बऱ्या! आपल्याला श्रम पडतात. चिंता नि काळज्या विंचवासारख्या पाठीशी डसून आहेत—जबाबदारीचं ओझं न पेलवणारं आहे—त्यातच लग्नाचं वय होऊन चाललंय ह्या चिंतेची भर! नव्हे लग्न व्हायचं ही एक गहन समस्या आहे—असू दे. तरी आपल्या जगण्यात अर्थ आहे असं ती स्वतःशीच आक्रोशत राहिली.

मंदाचं हे स्वैराचारी, श्रीमंती डौलाचं आयुष्य नि आपलं जीवन! दोन्हींची तुलना करता करता मध्ये केवढी खोल दरी आहे ह्याची तिला जाणीव झाली.

आजारी आईची आपल्याला सेवा करायची आहे. प्रकाशला निदान ग्रॅज्युएटपर्यंत शिक्षण द्यायचं आहे. घर चालवायचं आहे. स्वतः संयमीत राहून, शुद्ध राहून. मग लोक वाटेल तेवढी नावं ठेवू देत! साऱ्या घराचाच कायापालट करायचा आहे.

माझ्या जीवनाला अर्थ आहे!!

मरगळलेल्या मनाच्या विभावरीचं अंगांग उत्साहानं फुलून गेलं. एका अज्ञात शक्तीनं ती भारली गेली. विस्कटलेल्या चित्राची संगती लागत होती. तिच्या मनाला पूर्णतया जाणीव होती की, जायचंय प्रवाहाविरुद्ध! पण कसोटी त्यातच आहे—नि एंजॉयमेंटही आहे. अगदी खऱ्या अर्थानं! ती आपल्याशीच हसली. आपल्या अंगात एकदम सहस्र हत्तींचं बळ संचारलंय असं तिला वाटायला लागलं. आपल्या या आनंदी जीवनापुढं मंदाच्या त्या एंजॉयमेंटची काय किंमत!!

ती हसली!

आणि उद्याची सुखस्वप्नं रंगवीत मंदाही आपल्याशीच हसत होती!!

□ □ □

---

## नामी उपाय!

कदाचित् खरे वाटणार नाही, पण खरोखरच अमेरिकेतील डग्लस येथील न्यायमूर्तींनी जोसेफ सिल्स या गुन्हेगारास एक हजार वर्षाची सक्त मजुरीची जगावेगळी शिक्षा फर्माविली आहे.

अत्याचार करून ७३ डॉलर्सची चोरी केल्याचा आरोप सिद्ध झाल्याने ही शिक्षा ठोठावण्यात आली. याच न्यायमूर्तींनी यापूर्वी निरनिराळ्या आरोपाखाली जोसेफला एकोणीस वेळा तुरुंगात पाठवले होते. एक हजार वर्षाच्या सक्त मजुरीची शिक्षा फर्मावण्यामागे पुन्हा हा प्राणी आपल्यासमोर आरोपी म्हणून येऊ नये हा उद्देश असावा.

चोरीसाठी हजार वर्षे तर बलात्कार किंवा खुनासाठी किती?

—एस्.

---



# पेरलेल्या बंदुका उठलेली जनता

**अनिल बर्वे** **लेखांक : पाच**

आदीवासी व शेतकरी, नक्षलवाद्यांना सहकार्य करीत असल्याने माथे फिरलेल्या सरकारी पोलिसांनी ग्रामीण जनतेवर अनन्वित अत्याचार केले. या सर्वांची तपशीलवार यादी डाव्या कम्युनिस्ट पक्षाने ' रेज युवर व्हॉइस अगेन्स्ट लॅण्डलॉर्ड, पोलीस टेरर इन् आंध्र प्रदेश ' या पुस्तिकेत दिलेली आहे. सुरुवातीस अतिरेकी पक्षप्रचार म्हणून त्या पुस्तिकेकडे मी दुर्लक्ष केलें. परंतु जेव्हा ग्रामीण विभागात

मी प्रत्यक्ष हिंडलो तेव्हा पुस्तिकेत नमूद केलेले पाशवी अत्याचार प्रत्यक्षात घडले असल्याचे लक्षात आले.

घनपूर व पालमपेठ येथे पी. रामनरसय्याचा पत्ता काढण्यासाठी पोलिसांनी गावातील प्रत्येक माणसास अमानुष मारहाण केलेली आहे. उलटे टांगणे, मिरचीची धुरी देणे, लॉकअप्मध्ये टाकून चार-चार पोलीसांनी एकेकास झोडपणे हे प्रकार 'नित्याच्या पोलीस तपासातीलच' होऊन बसले आहेत. ज्या गावात येथील पोलिसांनी तळ ठोकले आहेत तेथे गावकऱ्यांचे यमदूतच आले आहेत. गोविंदराव पेठ येथे पोलिसांची एक तुकडी गवताने शाकारलेल्या झोपडीत दोन महिने ठाण मांडून आहे. मी पत्रकार आहे हे समजताच त्यानी मला आदराने जेवू घातले. एक धोबी त्या तुकडीचे स्वैपाकपाणी, कपडे धुलाई व इतर सेवा अक्षरश: वेठबिगारीवर करतो. दोन वेळा उरेल ते खाणे आणि काही चुकल्यास आईबहिणीवरून अचकट विचकट शिव्या खाणे हेच त्याचे जीवन झाले आहे.

सालुर येथील 'रादा' हा शेतकरी मला म्हणाला – माझ्याकडे चार कोंबड्या होत्या. त्यातल्या दोन पोलीस 'उचलून' घेऊन गेले. त्या अर्धपोटी शेतकऱ्याला त्याच्या कोंबड्या म्हणजे एक आधारच होता. गावातील पोरासोरांना फुकटचे राबवणे हे गैर आहे हे पोलिसांच्या ध्यानातच नसते. खुद्द डी. एस्. पी. गोपाळ रेड्डी बसमधून मुलुगला येताना ड्रायव्हरच्या अंगावर सारखा असभ्य भाषेत ओरडत होता. पसरा येथील पोलीस अत्यंत स्वस्ताईच्या जमान्यातील भावाने गावकऱ्यांकडून दूध 'खरेदी' करतात.

चेचेया हा स्टेट रिझर्व पोलिसमधला लान्सनायक माझ्याकडे तक्रार करीत होता – 'गुरासारखे झोडपले तरी हे निगरगट्ट गावकरी बातम्या देत नाहीत.' 'पसराचा डेप्युटी रेंजर आर. महंमद दंडेवाला म्हणाला – 'गावातील प्रत्येक माणसाला गुराढोरासारखे पोलिसांनी झोडपले आहे. तेव्हा तुमच्याशी कोणीही मनमोकळेपणाने बोलणार नाही.' आणि याची प्रचीती मला प्रत्येक गावात येत होती. सर्वत्र दबलेले आणि उदास वातावरण असायचे.

पोलिसांनी लुटालूट केली, मारहाण केली आणि स्त्रियांवर बलात्कार केले हे खरे काय, असे मी डी. एस्. पी. महाशयांना विचारताच त्यांनी स्पष्ट शब्दात इन्कार केला. परंतु जेव्हा मी सविस्तर आणि तारीखवार माहिती देऊ लागलो तेव्हा सर्व दोष सी. आर. पी.च्या पोलिसांवर टाकून डी. एस. पी. मोकळे झाले.

नंतर मात्र, त्यांनी मारहाण ही करावीच लागते, त्यात कित्येकदा निरपराध मारले जातात हे कबूल करावयास सुरुवात केली. लुटालूटही 'माफक' प्रमाणात होणे साहजिकच असल्याचे सांगून, घरापासून बराच काळ लांब असल्याने 'भुकेले' पोलीस 'बलात्कार' करतात हे कबूल केले गेले. परंतु पोलीस हे बलात्कार 'तारतम्याने'

करतात, घरंदाज स्त्रियांवर करत नाहीत असे विशेष वर्णनही डी. एस. पी. करते झालें. अर्थात बाजारात जंगली वस्तू विकावयास आणणाऱ्या, अंगावर धड कपडे नसणाऱ्या आणि झोपड्यातून राहणाऱ्या गरीब आदीवासी स्त्रिया या घरंदाज नसल्याने त्यांच्यावरच्या बलात्कारांचा मी एवढा 'बाऊ' करून घेणे योग्य नव्हे, अशीही माझी समजूत घातली गेली. पोलिसांच्या सर्व अत्याचारांची या डी. एस. पी. नी – 'चलता है – होता है' अशा दोन वाक्यात विल्हेवाट लावली.

जमीनदार सरकारचे हे पोलीस 'जमीनदार-सावकार' आदी गावातील 'प्रतिष्ठितांचे' संरक्षण करण्यास बांधलेले असतात. सर्व बडे सरकारी अधिकारी गावातील बड्या जमीनदारांकडे जेवायला – राह्यला जातात, त्यांच्या प्रत्येक कामात 'जातीने' लक्ष घालतात हे खरे काय असा मी प्रश्न केला, तेव्हा श्रीकाकुलमचे एस्. पी. मला सांगते झाले, 'जर गावातील जमीनदाराने आम्हास 'प्रेमाने जेवायला बोलावले तर जावे लागते याचा अर्थ आम्ही त्यांच्या दोषांवर पांघरूण घालतो असा नाही' अर्थात या खुलाशाने माझे समाधान झाले नाही.

गेल्या दोन वर्षात केवळ नलगोडा, वरंगळ आणि खम्मम या तीन जिल्ह्यात डाव्या कम्युनिस्ट पक्षाच्या चार हजार कार्यकर्त्यांवर खोटे खटले पोलिसांनी भरले. खटला भरला की तो वर्षानुवर्षे रेंगाळतो आणि गरीब शेतकरी–कार्यकर्ते खेटे घालता घालता जेरीस येतात. केवळ खम्मम जिल्ह्यात अशा बाराशे श्याण्णव केसेस आदिवासी–शेतकऱ्यांवर भरण्यात आल्या. पैकी आठशे तेवीस खटल्यांचा निकाल लागून सारे निर्दोष सुटले आणि चारशे त्र्याहत्तर खटले अजून निकालापर्यंत यायचे आहेत. पोलिसांनी हे जे हजारोंनी खोटे खटले भरले ते लढवण्याकरता उजव्या कम्युनिस्ट पक्षाने बावन्न वकिलांची कमिटी नेमून आदिवासी–शेतकऱ्यांवरचे हे खोटे खटले मोफत लढवण्याची व्यवस्था केली. अर्थात केवळ खोटे खटले भरूनच पोलीस थांबतात असे नाही –

१९६५ च्या मध्यावधी निवडणुकीत वरंगळ जिल्ह्यातील नरसमपेठ तालुक्यातील 'चंद्रगोंडा' खेड्यातील गावकऱ्यांनी डाव्या कम्युनिस्ट पक्षाला भरघोस मतदान केले. तेव्हा तेथील डाव्या कम्युनिस्ट पक्षाचा कार्यकर्ता 'बोदा बिक्या' याच्यावर स्थानिक जमीनदार सावकारांच्या गुंडांनी हल्ला करून त्याचे हातपाय मोडले, त्याचे घर पेटवून दिले आणि त्याच्या 'राजा' या सात वर्षाच्या मुलाला जिवंत जाळले. कॉंग्रेसी गुंडांच्या या टोळीचे नेतृत्व 'वाग्यानाईक' या 'राष्ट्रभक्त' गुंडाने केले होते, ज्याने १९६२ मध्ये 'इकय्या' या कम्युनिस्ट कार्यकर्त्याला भोसकले होते. आणि हे सर्व घडताना पोलीस अधिकारी जमीनदार–सावकारांकडे 'प्रेमाने' जेवायला गेले होते.

याच तालुक्यात ऑगस्ट ६५ मध्ये 'महेश्वरपुरम्' येथे गावकरी व जमीनदारांचे भांडण उद्भवले तेव्हा पोलिसांनी 'चेन्ना रेड्डी' याला गोळीबारात ठार मारले.

नंतर रिझर्व पोलिसांची एक फलटणच गावात येऊन ठाणबंद झाली. १००० च्या वर इसमांना मारझोड करण्यात आली. २६ स्त्रियांवर बलत्कार करण्यात आले.

मुलुग तालुक्यात रोम्पुर या खेड्यात ऐंशी आदिवासी गेले चाळीस वर्षे साठ एकर जमीन कसत आहेत. यांना जमिनीवरून हाकलण्याचा प्रयत्न करण्यात आला— आदिवासींनी मजुरी वाढावी म्हणून आंदोलन सुरू केले तेव्हा संतोष चक्रवर्ती या जमीनदाराच्या गुंडांनी टी. भास्कर रेड्डी या तरुण कार्यकर्त्यास वेंकटपुरमच्या बस-स्टँडवर भोसकले. मेडीकोंडा येथील वेंकेटेय्या या शेतकऱ्याचे गुंडांनी हात मोडले. पोलीसांनी त्यालाच अटक करून नेले. १३ ऑक्टो. १९६७ ला वेंकटापुरम येथील हरिजन वस्तीवर हल्ला चढवून लुटालूट करण्यात आली व राघ्या या कम्युनिस्ट कार्यकर्त्यास भीषण मारपीट करण्यात आली. पोलिसांनी गुंडांच्याऐवजी या हरिजनांनाच अटकेत टाकले.

वरंगळ व खम्मम या दोन जिल्ह्यातच गेल्या दोन वर्षात जमीनदार—सावकारांनी, शेतकरी—आदिवासींना संघटीत करणाऱ्या डाव्या कम्युनिस्ट पक्षाच्या दहा प्रमुख कार्यकर्त्यांचे खून पाडले. घनपूर येथील माल्यूर ऊर्फ रामस्वामी या डाव्या कम्यु-निस्ट कार्यकर्त्याचा एप्रिल १९६८ ला खून करण्यात आला.

डाव्या कम्युनिस्ट पक्षाच्या पुस्तिकेत जे आरोप केले आहेत त्यातील वरील आरोपांची मला खात्री पटली—इतरत्र मी जाऊ शकलो नाही. परंतु मी जो तेथील परिस्थितीचा कानोसा घेतला त्यावरून अतिशयोक्तीचा भाग सोडला तरीही डाव्या कम्युनिस्ट पक्षाने केलेले आरोप खरे आहेत असे वाटते. डाव्या कम्युनिस्ट पक्षाने आपल्या ४२ पानी पुस्तिकेत म्हटले आहे—

डाव्या कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते हे जमीनदार—सावकारांचें खास भक्ष्य असून १९५२ च्या निवडणुकानंतर काँग्रेसच्या ‘ शांततामय राजवटीत ’ आमच्या पक्षाच्या सत्तर प्रमुख आणि क्रियाशील कार्यकर्त्यांचे खून पाडण्यात आले आहेत. ’

जमीनदारांच्या गुंडगिरीला सरकारी संरक्षण पूर्वी सरदार वल्लभभाई पटेल यांनी दिले. आणि आता ब्रह्मानंद रेड्डी सरकार देत आहे. अन्याय व शोषणाविरुद्ध आवाज उठविणाऱ्या शेतकऱ्यांवर जमीनदार—सावकारांचे भाडोत्री गुंड अमानुष हल्ले चढवू लागले, त्यांच्या वाड्यांना जाळणे—मालमत्ता लुटणे हे प्रकार सुरू झाले, तेव्हा जून १९६८ मध्ये डाव्या कम्युनिस्ट पक्षाच्या कमिटीने मुख्यमंत्र्याना पाठविलेल्या पत्रात म्हटले—

‘ आम्ही विनंती करतो की, त्वरित पोलीसअधिकाऱ्यांना व या विभागात पाठवलेल्या खास पोलिसांना खालील हुकूम पाठवावेत—

१ : जमीनदार-सावकारांच्या गुंड टोळ्यांशी सहकार्य करून खेड्यांवर वा कम्युनिस्ट कार्यकर्त्यांवर हल्ले करू नयेत.

२ : रात्री अपरात्री केव्हाही छापे घालू नयेत व चौकशीकरता अटक केलेल्यांना जमीनदारांच्या गुंडांच्या ताब्यात देऊ नये.

३ : पकडलेल्यांना पोलीस-लॉकअप् मध्ये व कॅम्पमध्ये मारहाण करण्यात येऊ नये. त्यांच्याकडून खोटे कबूलीजबाब घेऊ नयेत.

४ : केवळ संशय घेऊन कम्युनिस्टांच्या सहानुभूतिदारांवर जे हजारो खटले भरले जात आहेत ते खोटे खटले भरू नयेत.

५ : लोकांना त्वरित भाडोत्री गुंडांच्या टोळ्यांपासून व त्यांच्या दहशतीपासून संरक्षण द्यावे.

६ : गुंडांनी चालवलेल्या जाळपोळी, खून, लुटालूट, बलात्कार यांचा त्वरित बंदोबस्त करण्यात यावा.

७ : जमीनदार – सावकार व त्यांचे भाडोत्री गुंड यांच्याकडून शस्त्रास्त्रे काढून घ्यावीत व त्यांच्यावर आजपर्यंत केलेल्या गुन्ह्यांबद्दल खटले भरावेत.

८ : आदिवासी शेतकरी कार्यकर्ते व कम्युनिस्ट पक्षाचे सहानुभूतिदार यांना दुय्यम नागरिकत्वाची वागणूक दिली जात आहे ती त्वरित थांबवावी.

परंतु ब्रह्मानंद रेड्डी सरकारने या सूचनांची दखल घेतली नाही. तेव्हा डाव्या कम्युनिस्ट पक्षाचे सेक्रेटरी पी. सुंदरय्या यांनी २५ जुलै ६८ ला या प्रकारांची दखल घ्यावी असे सविस्तर पत्र इंदिरा गांधींना पाठवले. त्यालाही केराची टोपली दाखवण्यात आली. कम्युनिस्ट आमदारांनी विधानसभेत या अत्याचारांना वाचा फोडली. परंतु 'बडया लोकांच्या' हाती असलेल्या वृत्तपत्रांतून या बातम्यांकरता जागा नव्हती.

नक्षलवादी क्रांतिकारक जमीनदार-सावकारांवर हल्ले चढवतात तेव्हा गावकरी त्यांना सहकार्य का करतात ते यावरून स्पष्ट होईल. नक्षलवाद्यांवर मात्र, कोणाला विनाकारण मारहाण केल्याची, लुटालूट केल्याची किंवा बलात्काराचे आरोप, जनता तर सोडाच पोलीस अधिकारीही करत नाहीत. पोलीस अधिकाऱ्यांनी माझ्याशी बोलताना म्हटले –

'नक्षलवादी नेते जरी सुशिक्षित असले तरी त्यांचे अनुयायी स्थानिक आदीवासीच आहेत. आदीवासींवर नक्षलवादी इतकी हुकमत गाजवतात की आदीवासींच्या हातून अनैतिक कृत्ये होत नाहीत. परंतु आम्हाला मात्र वेल ट्रेंड असलेल्या पोलीसांवरही वचक ठेवता येत नाही. आमच्याकडे सदोदीत अत्याचार झाल्याच्या तक्रारी येतात.'

–

स्वातंत्र्यापूर्वी अमेरिकन पत्रकार लुई फिशर याला मुलाखत देताना गांधीजी म्हणाले होते – "जो स्वतः शेतीवर कष्ट करतो तो शेतकरी. स्वतंत्र भारतात शेती त्याच्याकडे राहील. मोठे जमीनमालक स्वतः त्याला शेती देतील. सरकारही त्यासाठी कायदे करेल.' भारतीय भांडवलदारांनाही गांधीजींनी बजावले होते, "दिल्लीतील गगनचुंबी टोलेजंग महाल व गरिबांच्या सुदाम झोपडया यातील दरी

सहा महिन्यांच्या आत बुजण्याला सुरुवात झाली नाही तर या देशात खुनी क्रांतीला तोंड फुटेल."

देशाला स्वातंत्र्य मिळाले, प्रत्यक्षात मात्र ते केवळ सत्तांतरच ठरले. ईस्ट इंडिया कंपनी सरकारच्या गुलामीत जगलेले भारतीय शेतकरी व कामगार पंचाहत्तर मक्तेदार कुटुंबांच्या 'मॅनेजिंग एजन्सी'खाली जगू लागले. आणि याच सुमारास तेलंगणात म्हणजेच आजच्या नक्षलवादी क्रांतीक्षेत्रात १९४९ साली भूमिहीन मजुरांनी संघटित होऊन लाल झेंड्याखाली सशस्त्र उठाव केले. जमीनदारांना पिटाळून शेतीचे वाटप केले. दोन वर्षं ही आग धुमसत होती. शेवटी हजारो पोलीस व जवान पाठवून, बारा कोट रुपये खर्च करून गांधीजींच्या शिष्यांनी, शेतकऱ्यांच्या रक्ताने ही आग तात्पुरती विझवली. जमीनदार–सावकारांना अभयदान मिळाले. विनोबांनी तेव्हा घोषित केले – 'बंदुकीनें वाघाची शिकार करता येते. कम्युनिस्ट काही वाघ नव्हेत, त्यांच्याजवळ विचार आहेत. विचारांशी विचारानेच सामना करता येईल.' आणि विचारांची वर्तुळे करून, तत्त्वांच्या भिंगऱ्या फिरवीत नंतरचा वीस वर्षांचा काळ लोटण्यात आला. शोषण चालूच राहिले. अन्याय चालूच राहिले. मतपेटीच्या सापळ्यात कम्युनिस्टांना अडकवून संसदीय प्रतिष्ठेच्या तालावर क्रांतिकारकांना डुलवण्यात आले. भूमिसमस्या दूर झाली नाही की देशासमोरील सामाजिक विषमतेचे, आर्थिक शोषणाचे, सत्तेच्या केंद्रीकरणाचे, व बेकारांचे प्रश्न सुटले नाहीत. परिस्थितीने पुन्हा पेट घेतला.

पीपल्स डेलीने आपल्या अग्रलेखात म्हटले –

'आज हिंदुस्थानात काँग्रेसची राजवट एवढी बदनाम झाली की हिंदी प्रतिगाम्यांना जनतेच्या डोळ्यात धूळ फेकण्यासाठी काही नवीन क्लृप्त्या करून पहाणे भाग होते. काही राज्यातल्या दगलबाजांना आणि तत्त्वभ्रष्टांना लाच देऊन तथाकथित 'बिगर-काँग्रेस' सरकार स्थापन करणे ही असलीच एक क्लृप्ती.'

'पश्चिम बंगालमधील तथाकथित 'बिगर–काँग्रेस' सरकार हे दार्जिलिंगच्या क्रांतिकारक शेतकऱ्यांचा लढा रक्तात बुडवून टाकण्याच्या कामी प्रतिगामी भारत सरकारला उघड साथ देत आहे. हे तत्त्वद्रोही आणि दुरुस्तीवादी लोक अमेरिकन साम्राज्यशाहीचे व सोविएत दुरुस्तीवादाचे गुलाम असून बड्या हिंदी जमीनदारांचे व भांडवलदारांचे हुजरे आहेत. ज्याला बिगर काँग्रेस सरकार म्हणतात ते केवळ या जमीनदार व भांडवलदारांचे हत्यार आहे.'

पीपल्स डेलीच्या अग्रलेखातील ही भाषा जरी उग्र व कठोर असली तरी वास्तविक परिस्थितीचे तिने योग्य तेच निदान केले होते असे म्हणावे लागेल. परिस्थिती अशा रीतीने क्रांतिकारक उठावांना अनुकूल होऊ लागल्याने संसदीय मार्गाला कंटाळलेले व त्यातला फोलपणा जाणलेले कम्युनिस्ट 'माओ'च्या विचाराखाली संघटित होऊ लागले.

'शेतकीप्रधान देशात क्रांतीचा बहुमान शेतकरीच घेतील. चीनमध्ये तेच झाले व आशिया–आफ्रिका खंडात तेच होणार आहे हे सत्य माओने ओळखले. त्याने आपल्या क्रांतीची व्यूहरचना शेतकऱ्यांच्या व खेड्यांच्या आधारावरच बनवली. एकदा ग्रामीण भारतात ही क्रांती झाली की शहरी भारतात ती व्हायला काहीच अवधी लागणार नाही हे ओळखून, तरुण भारतीय क्रांतिकारक माओचे विचार व चे गुव्हेराचे गुरीला वॉरफेअरचे तत्त्वज्ञान घेऊन बंगाल–बिहार–आंध्र–केरळ–पंजाबातील जंगलात व खेड्यात जाऊन संघटित होऊ लागले. परंतु नवीन कार्यक्रम व अनुभवशून्य असल्याने त्यांच्यात वेगवेगळे विचारप्रवाह निर्माण झाले. वरंगळ व खम्मम येथे नागीरेड्डी ग्रूपने उठाव केले. नागीरेड्डी ग्रूपने, चारु मुजुमदार ग्रूपच्या 'कम्युनिस्ट पार्टी मार्क्सिस्ट लेनिनिस्टशी' वितुष्ट आल्यानंतर बंगालमधील असीत सेनच्या 'माओइस्ट कम्युनिस्ट सेंटरशी' हातमिळवणी केली. ही फाटाफूट पुढेही वाढत गेली.

तेलंगणच्या उठावाशी तुलना केली तर आजचे नक्षलवादी उठाव हे लहान-सहान वाटतात. मुलुगमधला 'खाणावळवाला' महमंद इब्राहीम मला म्हणाला–

'तेलंगण चळवळीच्या काळात कम्युनिस्टांनी युद्धच पुकारले होते. आजची नक्षलवादी चळवळ त्यापुढे काहीच नाही. त्या काळी मी तेहसील ऑफीसमध्ये प्यून होतो. तीन हजाराची सरकारी रक्कम घेऊन मी जात असताना बावीस जणांच्या टोळीने मला पकडले व गावाबाहेर नेले. तेथे पुढारी, सावकार, अधिकाऱ्यांना पकडून ठेवले होते. माझ्याकडून सर्व रक्कम काढून घेऊन ती ऑफीसमध्ये द्यायला सांगण्यात आले. कम्युनिस्टांच्या शिक्क्याची नंबरवार नोटांची पावती त्यांनी मला दिली. आताचे नक्षलवादी जंगलात लढतात. परंतु तेव्हा कम्युनिस्ट रस्त्यावर लढत होते. परंतु आजदेखील नक्षलवाद्यांना गरीब लोक मदत करतात म्हणून ते टिकून राहतील.'

मुलुग-पसरा-पालमपेठ-गोविंदपेठ-हानपूर-सालूर येथे अनेक लोकांशी मी बोललो. सर्वत्र पोलीस व जमीनदार यांच्याविषयी द्वेष व नक्षलवाद्यांविषयी सहानुभूती आढळली. परिस्थितीने व धार्मिक–वैचारिक प्रभावाने भेकड बनलेले भारतीय, क्रांतिकारकांविषयी मात्र सदैव सहानभूतीच दाखवत आले आहेत. म्हणूनच भगतसिंग-राजगुरूंचे गुणगान गाणारे हे लोक आता विरुद्ध विषारी प्रचाराची पर्वा न करता चारू मुझुमदार, कनु संन्याल, नागीरेड्डी, सुरी, अजिता यांच्याविषयी हळूहळू सहानुभूतिपूर्वक व आदराने बोलू लागले आहेत.

वरंगळच्या जंगलाचा परिसर पाहून मी वरंगळला परतलो. डोके भणभणून गेले होते. झोप अगदी उशिरा आली आणि पहाटे अडीच तीनच्या सुमारास खोलीचा दरवाजा जोरात ठोठावला गेला. मला वाटले नक्षलवादी आले. फार आनंद झाला. त्यांना भेटायला मी उत्सुक होतो पण दरवाजा उघडला तर समोर दोन पोलीस.

झाडी कसून चौकशी करून व सामान धुंडाळून ते निघून गेले. त्यांचे उर्मट व असभ्य वर्तन पाहून ते आदीवासी व शेतकऱ्यांबरोबर कसे वागत असतील याची कल्पना आली. झोपेचा अगदी विचका झाला. सकाळ झाली आणि एक कॉलेज-विद्यार्थी माझ्याकडे आला. त्याने माझ्या हातात 'इमिजीएट प्रोग्रामची' पुस्तिका दिली.

नक्षलवाद्यांनी १२ मे ६९ ला जो अयशस्वी परंतु अत्यंत जोरदार हल्ला पेरुर पोलीस स्टेशनवर केला तेव्हापासून आणि होमगार्ड–पोलीस पटेल यांच्या खुना-नंतर, पोलिसांचे नीतिधैर्य संपूर्ण खचले आहे. म्हणूनच पोलीस नुसता संशय आला तरी झडत्या घेणे किंवा त्रास देणे आदी प्रकार करतात. माझ्या स्वतःच्या बाबतीत-सुद्धा हैद्राबादचे डी. आय. जी; सी. आय. डी. सोडले तर बाकी सर्व पोलीस अधिकारी अत्यंत उर्मटपणेच वागले. परंतु हेच पोलीस अधिकारी नक्षलवाद्यांना मात्र फार घाबरतात.

खम्मममधील 'पेरुर' पोलीस स्टेशनवर जो नक्षलवादी हल्ला झाला त्या मागे S. T. व H. C. यांना ठार मारण्याचा प्रमुख हेतू होता. परंतु त्या दिवशी दोन्ही अधिकारी बाहेर गेले होते म्हणून हा हल्ला अयशस्वी झाला. नाही म्हणायला एक रायफल नक्षलवादी घेऊन गेले. या हल्ल्यात व्हरांड्यात झोपलेले दोन गावकरी मात्र हकनाक मारले गेले. पेरूर पोलीस स्टेशन हे महत्त्वाचे असल्याने व त्यावरच नक्षलवाद्यांनी धाडसी हल्ला केल्याने, पोलिसांचे नीतिधैर्य पार खचले. म्हणनच घनपूर पोलीस चौकीभोवती वाळूच्या पोत्यांचा तट उभा केला होता.

जेव्हा पोलिसांना नक्षलवादी चळवळ आवरता येईना तेव्हा प्रत्येक खेड्यातून व्हिलेज डिफेन्स व्हॉलंटीअर फोर्स उभा करून त्यांना लष्करी प्रशिक्षण द्यायचे ठरले. असा 'व्हिलेज डिफेन्स फोर्स' उभा करण्यास स्वतंत्र व जनसंघ पक्षाने संपूर्ण सहकार्य द्यायचे घोषीत केले. पण दोन-चार अपवाद सोडल्यास ही योजना यशस्वी झाली नाही. कारण गावकरी या सरकारी सेनेत सामीलच होईनात.

जे दोन-चार 'व्हिलेज डिफेन्स व्हॉलंटीअर फोर्स' उभे केले होते त्यांना वरंगळ जिल्ह्यातील धर्मरावपेठ या गावात लष्करी प्रशिक्षणासाठी आणले गेले. त्यांचा कँप एका शाळेत भरला होता व शहरातून आणलेले 'होमगार्डस्' त्यांना शिक्षण देत होते. परंतु तेरा सप्टेंबरच्या मध्यरात्री नक्षलवादी क्रांतिकारकांनी या कँपवर जोरदार हल्ला चढवला. शाळेच्या आवारात गावठी बाँबसूचा वर्षाव झाला. होमगार्डस् व नक्षलवादी यांच्यामध्ये चकमक उडून त्यात एक होमगार्ड मारला गेला. नक्षलवादी जंगलात पळाले. ही योजनाच नंतर बारगळली.

पोलीसपटेल हा पोलिसांचा मुख्य आधार. परंतु नक्षलवाद्यांच्या धाकाने पोलीस-पटेल गावकऱ्यांना व आदीवासींना छळण्याचे धाडस करेनात. ज्या पोलीस पटेलांनी हे धाडस केले ते स्वर्गात जाते झाले. २८ ऑक्टोबरच्या मध्यरात्री गोविंदपेठ येथील

रघुनाथराव या पोलीस पाटलाचा खून करण्यात आला. २८ डिसेंबरला करीमनगर जिल्ह्यातील पानकेना गावातील पोलिसपाटलाला–अझमखान याला–पळवण्यात आले. दोन दिवसांनी त्याचे प्रेत गावालगतच्या ओढयात पडलेले आढळून आले.

नक्षलवाद्यांचा पोलिसांनी किती धसका घेतला आहे याचा किस्सा मला नरसमपेठ तालुक्यातील खेडुतांकडून ऐकायला मिळाला. नरसमपेठ येथे नक्षलवादी चळवळी वाढल्यावर तो भाग 'डीस्टर्ब एरीआ' म्हणून घोषीत करण्यात आला. गुंडेगा या खेडयात पोलीस कँप ठेवण्यात आला. रात्री गावालगत गस्त घालणे हे पोलिसांचे काम. परंतु घाबरलेले पोलीस पोलिसपाटलाला पुढे घालून स्वत: मागून चालत. असे एकदा लिंगगिरी खेडयातील मामेडी रामलू या पोलिसपाटलाला पुढे घालून पोलीस गस्त घालीत असताना रस्त्यालगतच्या खबदाडातील कोल्ह्याने गवतात उडी मारून जंगलचा रस्ता धरला. परंतु गवतातून आवाज येत आहे हे पाहताच पोलीस सुसाट धावत सुटले व कँपात दाखल झाले.

वरंगळच्या सी. आय. डी. ऑफीसमधील रामरेड्डी या स्पेशल ब्रँचच्या इन्स्पेक्टरना भेटलो. तेव्हा त्यांनी प्रथम माझीच चौकशी केली. कारण त्यापूर्वी पंधरा दिवस आधी एक असाच 'पत्रकार' चौकशी करून गेला आणि तो 'नक्षलवादी' होता हे पोलिसांना नंतर समजले. या इन्स्पेक्टर महाशयांनी मला नक्षलवादी नेत्यांचे फोटो दाखवले. व्यवस्थित माहितीही पुरवली. त्यांच्या माहितीचा व डी. एस्. पी. च्या माहितीचा बऱ्याच जागी मेळ बसत नव्हता.


वरंगळ जेलमध्ये मी सुरीला भेटावयास गेलो. परंतु नक्षलवादी नेत्यांची इतरांना भेट घेता येत नाही असे सांगून जेलरने मला वाटाण्याच्या अक्षता लावल्या. पोटासाठी सायकलवाला रिक्षा ओढत होता, जेलच्या रुक्ष भिंती हळूहळू मागे जात होत्या, सुरी त्या जेलमध्ये होता. इतरही अनेक क्रांतिकारक त्या जेलमध्ये होते. मी पाहिलेल्या वरंगळ जेलच्या भिंती फार ठेंगण्या होत्या. त्या उंचीत आत्म्यांना डांबण्याचे सामर्थ्य नव्हते.–

क्रमशः

---

पुढील लेखांक : बुधवार दिनांक ३० सप्टेंबर अंकात

---



# एका माणसाचा भारत

श्री. लुई मॅलेंचे 'ओ ! कलकत्ता', बी. बी. सी. वरील 'भारत दर्शन' कार्यक्रमाच्या निमित्ताने भारतात एक मोठेच वादळ घडून गेले. फटक्यात बी. बी. सी. ची भारतीय कचेरी बंद पडली. या घटनेच्या बऱ्या वाईटाची चर्चाही चालू आहेच. 'मदर इंडिया' या मिस मेयोबाईंच्या गटर इन्स्पेक्शन रिपोर्ट पासून सुरू झालेल्या या विकृत चित्रणाला स्वातंत्र्योत्तर वीस वर्षांनी सुद्धा बहरच आलेला दिसतो. 'इन सर्च ऑफ ए योगी' हा सुद्धा त्यातलाच प्रकार.

अर्थात हे खरे नाही की सर्वच पाश्चात्य लेखक हाच भारतविरोधी सूर लावण्यात धन्यता मानतात. सर्वसाधारण पाश्चिमात्य व भारतीय जीवनमानात खूपच तफावत आहे. त्यातून भारताचे प्राचीनत्व, त्याची भौगोलिक विशालता व विविधता आणि पाश्चात्य भौतिक दृष्टिकोनातून त्यांनी केलेल्या अपेक्षा यामधूनच बऱ्हंशी गैरसमज उद्भवत असावेत व मग काहीशा कलात्मकतेने वा काहीशा उद्वेगाने त्यांचे गुणावगुणन करण्याचा मोहही टाकता येत नसावा. विशेषत: अवगुणांचा!

परंतु स्पष्टच आहे की 'भारत' या विषयाचे परकीयांना आकर्षण फार. विशेषत: लेखकांना. अगदी ह्यू एनत् संग, अल्बेरुणी, मार्कोपोलो ते अद्ययावत श्री. लुई मॅलेपर्यंत खूपच जणांनी प्रवासोत्तर 'यथामती' लिहिले आहे व ते सगळेच काही वाईट नाही. निंदास्पद नाही. कधी कधी तर खूपच अतिशयोक्तीने चांगले लिहिलेले आढळते. म्हणजे निंदा व स्तुती ही दोन्ही टोके गाठणारे पाश्चिमात्य लेखक आढळतात. आपल्या इलस्ट्रेटेड विकलीचे संपादक श्री. खुशवंतसिंग बराच काळ परदेशात होते. त्यांनी सुद्धा 'India' हे एक असेच खुसखुशीत पुस्तक पश्चिमेतसुद्धा लोकप्रिय केले आहे.

'आहे ते' 'आहे त्या' स्वरूपात आवडून, तसे संयमित स्वरात लिहिणारे जे पाश्चात्य लेखक आहेत अशांपैकी एक म्हणून 'गॉर्जीस ईस्ट' (W. H. Allen Londen 1965) या पुस्तकाचे लेखक श्री. रूपर्ट क्रॉफ्टकुक यांचा निर्देश करता येईल. त्यांचे नाटय, कादंबरी, प्रवाणवर्णने व आत्मचरित्र या विविध प्रकारात

गेल्या महिन्यात बी. बी. सी. नं अचानक वादळ उठवलं. परदेशात 'भारता'वर उलट-सुलट प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागल्या. रूपर्ट क्रॉफ्ट-कुक यांच्या 'गॉजिस इस्ट' या पुस्तकाचीही काही ठिकाणी चर्चा होऊ लागली.

त्यांना भारत कसा दिसला ?

**ज्ञानेश्वर धोंगडे**

---

घोडणारे विपुल वाङ्मय आहे. विशेषतः आत्मचरित्रपर वाङ्मय, त्यातली चौकसदृष्टी, रसरशीत जीवन जगण्याची वृत्ती, हवे ते टिपण्यात कुशल असणारी वस्तुनिष्ठ दृष्टी यामुळे लोकप्रिय झालेले आहे. गेल्या महायुद्धातील लष्करी सेना सोडली तर जीवन वाङ्मय-व्यासंगावरच अवलंबून होते असेच दिसते. त्यांचे वर उल्लेखिलेले 'गॉर्जीस ईस्ट' एकटचा माणसाचा भारत या उपनावाने प्रसिद्ध केलेले आहे व ते यथार्थ आहे. ते भारतात एकटेच खूप खूप भटकले. छोटचा मोठचा भारतीयांना भेटले. पण 'प्रवासी' या भूमिकेतून प्रवास केलेला नाही. इंग्रजी राज्याच्या शेवटी तीन चार वर्षांत (४४ ते ४७ च्या दरम्यान) व पुन्हा ६४ मध्ये असा दोन वेळा भारतभेटीचा योग त्यांना आला. साहजिकच जुन्या नव्या भारताचे दर्शन घडले. ती तुलना करून ब्रिटिश राजवटीच्या बरेवाईटपणावर त्यांना खूप लिहिता आले असते. पण त्यांनी अगदी माफक लिहिले आहे. कुणी एक ललित खोसला व त्याची काश्मिरी बायको यांच्याबरोबर मलबार हिलवरच्या एका उपहारगृहाच्या गच्चीवर चर्चा करताना 'ब्रिटिशांची भारताला देणगी' काय ? या प्रश्नाला 'क्रिकेट व कॉर्नफ्लेक्स' एवढेच उत्तर देऊन त्यांना थांबावेसे वाटते. मग पुन्हा म्हणतात, "न्यायपद्धती – जिच्यामधून दिल्या जाणाऱ्या न्यायाबद्दल माझ्या मनात शंका आहेच, एक लोकशाहीपद्धती जिच्या भवितव्याबद्दल खात्री नाही, राष्ट्रीय-सेना आणि हो, उपयुक्त राष्ट्रभाषा इंग्रजी' ही काही फार मोठी देणगी आहे असही त्यांना वाटत नाही. उलट भारताचे इंग्रजांनी विशेष नुकसान केले नाही याबद्दल त्यांना जरा बरे वाटते. व्हिक्टोरिअन कालात भारतात उद्योग-धंद्यांची उभारणी झाली व तेव्हापासून ते टिकविण्यासाठी तरी ब्रिटिश साम्राज्य-शाहीची भारताला आवश्यकता आहे असं इंग्रज लोक भासवित असत. हा दावा किती चुकीचा होता हे भारतात नव्याने विकसित झालेल्या उद्योगधंद्यांवरून दिसते. हे विचार डेक्कन क्वीनने मुंबईहून पुण्याला जात असताना पाहिलेल्या उद्योगांच्या विस्तारावरून लेखकांच्या मनात येतात.

ललित खोसलासारखी मंडळी त्यांना खूपच भेटतात. पण ती अगदीच छोटी छोटी सामान्य माणसे. हिंदुधर्माची ओळख करून देणारा गुप्ता, वायव्य सरहद्द प्रांतातील याकूब पठाण, मिस फेन्वीक ही अँग्लो इंडियन पुणेकर वृद्धा, तऱ्हेतऱ्हेच्या बिर्याण्या पुलाव बनविणारा स्वामी नावाचा फक्कड स्वयंपाकी, आतिथ्यशील अक्कलकोट संस्थानचे महाराज, बेळगावात भेटलेला जोसेफ नावाचा ख्रिश्चन — ज्याला साहेब मजकुरांनी स्वत:बरोबर सेक्रेटरी म्हणून विलायतेला नेला, तो स्टेनोग्राफी शिकला. साहेबांच्या नोकरीत बरोबर फिरला. विलायतेला गेला. पुन्हा ६४ साली साहेबाबरोबर मायदेशी आला. साहेबांनी त्याचे घरी पाहुणचार घेतला. त्याच्या घरी 'कुट्टीपै कोळंबु' नावाचा अभक्ष तामीळ पदार्थ खाऊन साहेबांनी तृप्तीची पावती दिली. माणसांचा साहेबाला लोभ. त्याचबरोबर भारतीय जेवणावर ते भलतेच खूष. ठिकठिकाणच्या मिलीटरी कॅम्पमधून आळणी जेवणाला कंटाळलेले साहेब सवड मिळाली की लगेच आमटी — माशाची मटणाची कढी — चपाती, बिर्याणी, पुलाव रसिकतेने चापताना दिसतात. दिल्लीला असताना एका सोल्जरने मोर मारून आणला व साहेबांनी त्याचे कालवण आवडीने खाल्ले. (त्यावेळी मोर आपला राष्ट्रीय पक्षी नव्हता!) विविध शहरातील गल्ल्यातून हिंडताना भारतीय मसाल्यांचे वास त्यांच्या रंध्रातून शिरतात. त्यांना ते आवडतात. भारतीय स्वयंपाकघरात दिसणारी स्वच्छता, पाश्चात्य कल्पनांशी जुळत नसली तरी त्यांना आवडते. चर्चगेटचे सुप्रसिद्ध 'पुरोहीत' त्यांच्या आवडीचे. पुन्हा पुन्हा भेट देण्याचे ठिकाण. ती भली मोठी थाळी, आठ दहा भाज्यांचे प्रकार, पुऱ्यांची चवड, गल्ल्यावर शेंडी उडवत बसलेलें व्यवस्थापक, सगळ्यांचे पोटभर कौतुक. खरे रसिक खवय्ये! सतरा वर्षांनंतरच्या दुसऱ्या भारतभेटीत सुद्धा 'पुरोहीत' मध्ये विशेषसा बदल न दिसल्याने साहेबांना समाधान.

आपणापैकी खूप जणांना बी. जी. हॉर्निमन यांचा विसर पडला असेल. लेखकांना भेटलेल्या थोड्याशाच थोर व्यक्तींमध्ये हॉर्निमन यांचा उल्लेख आहे. त्यावेळी ते 'बॉम्बे सेंटिनल' हे सायंदैनिक चालवित असत. त्यांच्या ब्रिटिशद्वेषाचे लेखकाला कौतुक वाटते. इंग्रजांनी खरोखरीच त्यांचा खूप छळ केला, त्यांना दंड केले, हद्पार केले, घाणेरडे आरोप ठेऊन बदनामही केले. त्यांची एक साधी आठवण. त्यांच्या गौरकाय पायावरील शिरा तणावल्याने उठून दिसत. एकदा लेखक त्यांच्याकडे जेवायला गेले असताना आपल्या पायाकडे पाहून हॉर्निमन हळहळतात, 'साऱ्या युरोपमध्ये माझे पाय अतिशय सुंदर आहेत असं ऑस्कर वाईल्ड मला पुन्हा पुन्हा म्हणत.' या हॉर्निमनांचे स्मरणार्थ मुंबईत 'हॉर्निमन सर्कल' आहे असे पाहून रुपर्टसाहेब कृतज्ञतेने सुखावतात.

या भारतभ्रमणात त्यांनी काय पाहिले? पारदर्शी लेखक असल्याने मतलबी असत्यापासून दूर राहून त्यांनी भारताचा शोध केला. आवर्जून पाहिलेली काही

ठिकाणे – वसईचा किल्ला, जुने गोवे, विजापूर, बदामी, पट्टाडकल आणि ऐहोच, बुंदेल खंडातील ओरछा, दातिया, खजुराहो – मिथुन शिल्पामुळे जगभर प्रसिद्ध असलेले. परंतु लेखकाची वृत्ती पहा. किपलिंगच्या Kim ची सुरुवात अशी आहे "He sat in defiance of municipal orders, astride the gun 'Zam – Zammah' on her brick platform opposit the old Ajebghar – the wonder house as the natives call the Lahor Museum. Who hold Zam – Zammah, the fire breathing dragon, hold the Punjab for the great green bronze piece is always first of the conquerer's loot," या वर्णनावर मोहीत होऊन लाहोरमध्ये इतर काहीही न पाहता 'किम'ची 'झमझम' पाहिली. आजही झमझमवर आरूढ झालेला किम त्यांच्या डोळ्या-समोर येतो. शुभ्र चांदण्या रात्री पाहिलेला ताज – ज्याच्या स्फटिक शुभ्र भव्यते-मुळे त्याच्या आसंमतात क्षणभरसुद्धा त्याकडे पाठ फिरवणे अशक्य होते. शेख सलिम चिस्तीची कबर, दरबार हॉल, आँखेमहाल, बुलंद दरवाजा इत्यादी अनेक भव्य वास्तु असूनही अकबर बादशाहची उजाड पडलेली राजधानी फत्तेपूर शिक्री अशी अनेक ठिकाणे त्यांनी टिपली, त्यावर भाष्यही केले.

परंतु या स्थळांचे वर्णन हा या पुस्तकाचा निश्चित हेतू नाहीच. ललित खोसला विचारतो, 'भारताबद्दल असं प्रेम वाटायला काय कारण झालं?' या प्रश्नाला थोडक्यात उत्तर देणे लेखकाला जड झालं व म्हणूनच या पुस्तकाचा जन्म झाला. साहेबांच्या सूक्ष्म दृष्टीचे कौतुक वाटण्यासारखे अनेक प्रसंग पुस्तकात आहेत. बोरी-बंदर ते फाउंटन मार्गावरील पदपथावर रात्री पथारी पसरणाऱ्या हजारो भारती-यांची पोकळ दया त्यांना वाटत नाही. उलट हवामानामुळे ती एक अपरिहार्य गरज असल्याचे त्यांना जाणवते. सरसकट सर्वांना 'तुम्ही आमचे मायबाप' आहात असे म्हणणारे भारतीय खेडूत गुलामी वृत्तीचे आहेत असे नव्हे, तर भारतीयवृत्ती आई-बापांच्या कडेखांद्यावर खेळणाऱ्या लेकरासारखी निर्मळ असते असे त्यांना वाटते. हा प्रचंड देश नुकताच एका जबरदस्त वसाहतवादाच्या शृंखलेतून मुक्त झालेला असावा असे कोणतेच चिन्ह त्यांना दिसले नाही. निरनिराळ्या संस्कृतींच्या छाया या खंडप्राय देशाला झाकाळून गेल्या. त्यातीलच एक आंग्ल संस्कृती. तिचे विशेष असे मूल्य नाही ही त्यांची विचारसरणी. विशेष हे की पहिली यात्रा (४४ ते ४७) मिलिटरी इंटेलिजन्स सेवेत असताना केलेली आहे. अंगावरच्या गणवेशाचे ओझं त्यांना टिकटिकाणी जाणवते पण त्याला न जुमानता 'out of bounds' चालू आहे. पुण्यात एक वर्ष व बेळगावी एक वर्ष राहण्याचा योग आला. पुण्याच्या पहिल्या अनुभवानंतर पुन्हा पुणे कसे वाटले? 'वेलस्ले'साहेबाच्या नावाने धन्य (!) झालेल्या हॉटेलात मुक्काम होता. मिस फेन्विकबाई अजूनही तिच्याच बंगल्यात होती. तिला भेटल्यावर पुण्यात फेरफटका, स्कूटर, रिक्षा हे नवे ओबडधोबड कर्कश

आवाजाचे व टांग्याच्या घोडयांचा टापटाप आवाज बुडवून टाकणारे वाहन, मेन-स्ट्रीटची गर्दी वाढलेली. त्यातच पुणेरी सायकलस्वारांच्या – who seen prepared to risk their lives to prove their right of way – घडका. वीस वर्षापूर्वीचे शांत पुणे – आत्ताचा हा गजबजाट.

याच पुण्यात २७ मे १९६४ च्या रखरखीत दुपारी रुपर्ट साहेब वेलस्ली हॉटेल-मध्ये दुपारची डुलकी काढत होते. पंखा फिरत होता. अर्धवट जाग व गुंगी होती. चारचे सुमारास अचानक जाग आली, पण कानावर कुठलाच परिचित आवाज येईना. जे शहर साधारणपणे नेहमीच गजबजलेले जाणवावे. फेरीवाल्यांची ओरड, वाहनांची वर्दळ कानावर यावी तेथे अक्षरशः शांतता–भयाण भकास शांतता. काय संकट या शहरावर आले असावे? भूकंप, प्लेग, अणुयुद्ध? काही तरी अगम्य भयंकर. अस्वस्थ लेखक उठून बेअराला बोलावतात. तो चहाचा ट्रे घेऊन येतो. मनावरचा ताण ढिला होतो थोडासा. त्याला या स्मशानशांततेचा अर्थ विचारला जातो. उदास हसून व आपले भरलेले डोळे टिपून तो चेअरा सांगतो – नेहरू गेले!

ते वृत्त नुकतेच नभोवाणीवरून सांगितले गेलेले असते. कुठलाही हरताळाचा सरकारी आदेश नसता लोक स्वयंस्फूर्तीने व्यवहार बंद करतात, दुकाने, कारखाने, उपहारगृहे बंद होतात, वाहने थांबतात. हे सारे अद्‌भुत आहे. भावनोद्रेकामुळे हे फक्त भारतात स्वयंस्फूर्तीने घडते. ही क्षमता पाश्चिमात्यात नाही असा खेद रूपर्टना मनाशी वाटतो.

असा आहे 'एका माणसाचा भारत' – मला आवडलेला.

## वाळवंटातील वाट

### सुचित्रा राजूरकर

साहित्य परिषदेच्या सभागृहात 'वाळवंटातील वाट' या कादंबरीच्या प्रकाशनाचा समारंभ श्रीमती दुर्गा भागवत यांच्या हस्ते पार पाडला. 'वाळवंटातील वाट' या कादंबरीचे वैशिष्टय म्हणजे नऊ प्रसिद्ध लेखिकांनी एकत्रितपणे ही कादंबरी लिहिली आहे. कानगोष्टीच्या खेळाप्रमाणे सौ. पद्मा गोळे यांनी सुरुवात केलेल्या या कादंबरीचे एक एक प्रकरण शैलजा राजे, मृणालिनी जोशी, विद्या बाळ, शांता किर्लोस्कर, सरिता पदकी, कमला वाघ, ज्योत्स्ना देवधर. सुधा साठे या लेखिकांनी रंगवले असून कादंबरीचा शेवट पुन्हा पद्मा गोळे यांनी लिहिला आहे. कादंबरीच्या वेगळेपणामुळे त्यावर चर्चा होणे अपरिहार्य होते.

सौ. भावना भार्गवे यांच्या मते या सामुदायिक कादंबरीमध्ये एक लय साधली

## लुई माल यांची भारतविषयक चित्रमालिका

भारतविषयक चित्रपट कोणी काढला किंवा कोणी भारताबद्दल एखादे पुस्तक लिहिले म्हणजे प्रत्येक वेळी भारताची अवस्था उन्मादवायू झाल्यासारखी व्हावी हे पाहून दुःख होते.

आर्थर कोएस्लरच्या 'द लोटस अँड द रोबो' या पुस्तकातील योगाच्या विदारक चिकित्सेमुळे त्या पुस्तकावर भारतात बंदी घालण्यात आली. (झेन बुद्ध संप्रदायावरील या पुस्तकातील टीका अधिक प्रखर असूनही जपानने त्याच्यावर बंदी घातली नाही.) जपानमधील 'एक्स्पो' प्रदर्शनासाठी एका भारतीय दिग्दर्शकाने 'भारत: १९७०' या नावाचा चित्रपट तयार केला होता. तो प्रदर्शित करण्यास अगदी अखेरच्या दिवसापर्यंत मनाई करण्यात आली. डॉम मोराएसने टेलिव्हिजनवर सादर करण्यासाठी अलीकडे लिहिलेल्या एका माहितीपटाने संतापाची अशीच लाट उसळली होती. लुई मालची भारतविषयक चित्रमालिका हे अशा प्रकारचे अगदी ताजे उदाहरण होय. तुमच्या देशाबद्दल एखाद्या डोळस व संवेदनक्षम कलावंताला जे वाटते ते अन्य कोणत्याही लोकांना सांगण्याचे स्वातंत्र्य त्याला असता कामा नये, अशी जणू ही भूमिका आहे.

लुई मालच्या या चित्रमालिकेतील छायाचित्रण सुंदर आहे. इतकेच नव्हे तर तिच्यातून दिग्दर्शकाचे भारतावरील प्रेम यथास्थित व्यक्त झाले आहे. निवेदन साधे आणि तर्कसंगत आहे. लुई माल भारतभर भटकला आणि 'छायाचित्रका (camera) वरच निवडीची जबाबदारी त्याने टाकली.' रस्त्यात आणि वाटेत भेटलेली सीधीसाधी माणसे आणि मनावर परिणाम करून गेलेली दृश्ये त्याने दाखवली. त्यामुळे एखादा भिकारी किंवा देवळातील घाणेरडे पाणी त्याला दिसणे अपरिहार्यच होते. परका असल्यामुळे विसंगती आणि ढोंगीपण तो (सहज) दाखवू शकला. परंतु त्याने ओंगळपणावरच भर दिला आहे, हे खरे नव्हे.

एका संवेदनक्षम निरीक्षकाची वैयक्तिक चित्रमालिका होती ही. टीकाकारांनी–या चित्रमालिकेचे नाव लक्षात घ्यावे: 'लुई मालचा भारत' असे त्या चित्रमालिकेचे नाव आहे; 'भारताचे भारत सरकारला झालेले दर्शन' किंवा '१९६० पुढील दशकातील भारताची प्रगती' हे नव्हे.

पाश्चिमात्य समाजापेक्षा भारतीय समाज अधिक बलवान आहे, असे मत अखेरच्या भागात मालने व्यक्त केले आहे. खरे तर भारतासारख्या सुंदर देशाची बाजू घेणारी सुंदर चित्रमालिका होती ही. भारतात उफाळलेला उन्मादवायू मात्र सुंदर नाही. तो अनावश्यक आहे, अनुदार आहे आणि अंती भारतालाच हानिकारक आहे. —मरे बेल, लंडन, ऑगस्ट २४, १९७०

**[ ७ सप्टेंबर : टाइम्स ऑफ इंडियात प्रसिद्ध झालेले वाचकाचे पत्र ]**

गेली असून अनेकांच्या हस्तक्षेप असतानाही कादंबरी सुसंघटीत वाटते. कादंबरी ही नायिकाप्रधान असून नायक हा गौण वाटतो; तसेच सौ. पद्मा गोळे यांच्या सुरुवातीच्या कल्पनेनुसार शेवट झाला नसावा. (कारण तो 'आकस्मिक' वाटतो) असे यांचे मत. सुरुवातीच्या दोन प्रकरणात लोफर वाटणारा नायक जगदीशची व्यक्तिरेखा तिसऱ्या प्रकरणाच्या मृणालिनी जोशी यांनी उंचावली आहे. तरीही या कादंबरीच्या नायिकेप्रमाणे–गौरीप्रमाणे आपल्या कलावंत प्रियकराबरोबर विवाह न करता आजची तरुणी राहील काय ? असा प्रश्न कादंबरी वाचून त्यांना पडला. ही कादंबरी एकाच्याच प्रतिभेचा विस्तार नाही. वाळूचे कण जवळ आले तरी अलग राहतात. मातीप्रमाणे एकजीव होत नाहीत हे गृहीत धरूनही ही वाळवंटाची वाट त्यांना रंगीबेरंगी तुकडयांचे दुपटे न वाटता अनेक कलाकारांनी एकत्र केलेल्या गालिच्याप्रमाणे वाटली. कादंबरी परीक्षण करून वाचकांना एकदा 'रेगीस्थान'ला भेट द्यायला हरकत नाही असा सल्ला त्यांनी दिला.

समारंभाचे दुसरे सन्माननीय टीकाकार श्री. ज. जोशी यांना मात्र कादंबरी समाधानकारक वाटली नाही.

या कादंबरीच्या लेखिकांना चांगले पुरुष उत्पन्न करता आले नाहीत हा त्यांचा पहिला आरोप आहे. श्री. ज. जोशी यांना कादंबरीचे सामुदायिक लेखन हा प्रकार विकृत वाटतो. आनंदी गोपाळचे हे कर्ते म्हणतात, 'साहित्य ही शृंगारासारखी क्रीडा आहे. कादंबरीची धारणा ही एकानेच करावी. १०।१२ जणांनी नव्हे. अर्थातच साहित्याला श्रृंगाराची उपमा दिल्यावर अनेकजणींनी मिळून एक कादंबरी लिहावी हा प्रकार त्यांना अनैसर्गिक वाटल्यास नवल नाही. अनेकजणींनी लिहिलेल्या कादंबरीत अनेक त्रुटी त्यांना जागोजागी आढळल्या. कुठेकुठे कादंबरी विस्कळीत वाटली, तर कुठे संवाद कमालीचे कृत्रिम, अनैसर्गिक व ओढून ताणून लिहिलेले त्यांना वाटले. स्वतःच्या कादंबरीतील संवादाबद्दल बोलताना ते म्हणतात, 'माझ्या कादंबरीतील संवाद अधिक जीवनाभिमुख, साधे, सजीव वाटतील याची मी काळजी घेतो. व्यवहारात माणसं साधे बोलतात. अलंकारिक भाषणे सहसा करीत नाहीत. या कादंबरीतले संवाद असे कृत्रिम असल्याने कादंबरीला गडकऱ्यांच्या नाटकाची कळा आली आहे असे त्यांना वाटते.

श्री. ज. जोशींचा अजून एक आक्षेप–कादंबरीत जिकडे तिकडे आढळणाऱ्या विवाहबाह्य प्रेमसंबंधावर आहे. (यात विशेषतः स्त्रीलेखिकांनी पुढाकार घ्यावा ही गोष्टही त्यांना आवडली नाही). ते म्हणतात, कादंबरीची नायिका, नायिकेची, आई एवढेच काय नायिकेच्या आत्याचे सुद्धा विवाहबाह्य प्रेमसंबंध आहेत. ही कादंबरी महाराष्ट्राबाहेर वाचली तर महाराष्ट्रात प्रत्येक विवाहिताचे असे प्रेमसंबंध व अशा भानगडी असतात असे महाराष्ट्रीयांबद्दल इतरांचे मत होईल असे त्यांना वाटते.

श्री. ज. जोशींच्या पुरुषीमनाला दुसरा प्रश्न पडता ता हा का, असल 'प्रम' केल्यावर मूल हे झालेच पाहिजे का? इथूनतिथून सगळ्या विवाहबाह्य प्रेम प्रकरणात मूल होणे त्यांना मान्य नाही.

साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या बैठकीत एकत्र येऊन एक वेगळी कादंबरी सादर करणाऱ्या या लेखिकांच्या उपक्रमाकडे महिलामंडळाचे 'अपत्य' या दृष्टीने ते बघतात. एका साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या व्यासपीठावर येऊन महिला मंडळा-वर टीका करण्याचा त्यांचा प्रयत्न धीराचाच म्हणावा लागेल. महिलामंडळे, त्यात होणाऱ्या उचापती वगैरे गमती सांगताना श्री. ज. यांनी एका बंद पडलेल्या साहित्यप्रेमी मंडळाची एक आठवण सांगितली. प्रत्येकजण एकदा प्रेमात पडतो त्याप्रमाणे मंडळ काढतो व कालान्तराने ही मंडळे बंद पडतात असे सांगताना कादंबरीच्या विच्छेदनासाठी जीभ परजून आलेल्या श्री. जं. नी कादंबरी तशी बरी आहे असा अभिप्राय देऊन आपले भाषण आवरते घेतले.

श्री. ज. जोशी यांचे आक्षेप सौ. सरीता पदकी यांनी खोडण्याचा प्रयत्न केला. कादंबरीची कलात्मक पातळी यावर बोलताना त्या म्हणाल्या, या कादंबरीकडे कलात्मकतेपेक्षा एक क्रीडा म्हणून पाहिले जावे. प्रगल्भ मनाने केलेली ही एक क्रीडा आहे. प्रयोग आहे. हे कलात्मक आवाहन नाही असे त्या म्हणतात.

कादंबरीतील 'विवाहबाह्य प्रेम' यावर बोलताना त्या म्हणाल्या, कालीदास-भवभूतींना या विषयाचे आकर्षण वाटले तसेच आजच्या नव्या लेखकांनाही या विषयाचे आवाहन स्वीकारावेसे वाटले. कारण 'स्त्री-पुरुष आकर्षण हे विवाहात मर्यादित नाही' असे त्या म्हणतात. विवाहसंस्थेला समाजस्वास्थ्याची गरज म्हणून मान्यता आहे तसेच या निर्बंधाबरोबर कोणीही कोणावर प्रेम करू शकतो हे व्यक्तिस्वातंत्र्य आहे. व्यक्तिस्वातंत्र्य व विवाह निर्बंधातूनही समाजात अशा गोष्टी घडतात. समाजात जोपर्यंत विवाहसंस्थेचा विरोध व व्यक्तिस्वातंत्र्याचा एक धागा या गोष्टींची गुंतागुंत होत आहे तोपर्यंत साहित्यात जीवनाचे प्रतिबिंब दिसणे स्वाभाविक आहे असे त्यांना वाटते.

सामुदायिक कादंबरीलेखनावरील आक्षेपाला उत्तर देताना त्या म्हणतात, 'वाळवंटातील वाटेच्या या वेगळेपणातच तिचे वैशिष्टच व यश आहे'

एका कादंबरीचा प्रकाशन समारंभ! परंतु विवाहबाह्य प्रेम, समाज वगैरे-सारख्या गंभीर विषयावरील वाद त्यातून निर्माण झाल्याने दुर्गा भागवत यांनी श्री. ज. जोशी यांच्या टीकेला व सौ. पदकी यांच्या प्रतिटीकेला उद्देशून 'समारंभात पुरुषांची बसण्याची व्यवस्था शेवटी केल्याचा राग 'या' पुरुष प्रतिनिधीने (श्री. ज. जोशी) कादंबरीवर काढला तर नाही? असा खेळकर सवाल करून वाद मिटवण्याचा प्रयत्न केला.

विवाहबाह्य प्रेम यासारख्या समस्येवर लिहिण्याचा स्त्रीलेखिकांचा प्रयत्न स्तुत्य आहे असे त्या म्हणतात. निसर्गाने स्त्री-पुरुषात आकर्षण निर्माण केले.

निसर्गाच्या प्रेरणेचा चांगला उपयोग करणे हे संस्कृतीचे कार्य आहे. निसर्गाची प्रेरणा व संस्कृतीचा निर्बंध यातून समाजात अशा गुंतागुंतीच्या समस्या निर्माण होतात. या स्त्री-लेखिकांनी ह्या गुंतागुंतीचा उकल करण्याचा प्रयत्न केला याचा अर्थ या प्रतिष्ठित लेखिकांचा कादंबरीतील विषय हा 'स्वानुभव' आहे असा गैरसमज वाचकांनी करून घेऊ नये असा सल्ला त्यांनी वाचकांना दिला. स्त्री-पुरुष आकर्षणावर बोलताना त्या म्हणाल्या, स्त्री-पुरुषात खरे प्रेम असेल तर गांधर्व विवाह हा सर्वश्रेष्ठ मार्ग आहे. व त्यागाधिष्ठीत असे प्रेम त्यांच्यात नसेल तर त्यांनी लग्न करू नये असे त्यांना वाटते. विवाहबाह्य प्रेम प्रकरणात मूल होऊ नये असे श्री. जं. चे मत ऐकून त्या म्हणतात, मातृत्व हा स्त्रीचा स्वतंत्र हक्क आहे. पुराणानेही स्त्रीचा हा हक्क कुंतीच्या रूपाने मान्य केला आहे. विवाहबाह्य प्रेमातही स्त्री-पुरुष खरे, निष्ठावान, त्यागी प्रेम करू शकतात असे सांगून अंतीम त्यागावर आधारलेले प्रेम विवाहबाह्य असले तरी ते शुद्ध व उच्च ठरते असा निर्वाळा त्यांनी दिला.

समाजातील या समस्येची उकल करण्याच्या या प्रयत्नाचे त्यांनी कौतुक केले.

कादंबरीतील विवाहबाह्य प्रेमासारख्या खळबळजनक विषयावर झालेल्या स्फोटक चर्चेने साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या वाळवंटातील वाटेचा प्रकाशन समारंभ रंगला. ज्या कादंबरीवर अधिक टीका, चर्चा होते ती कादंबरी अधिक खपते हा आजवरचा अनुभव पाहून विवाहबाह्य प्रेमासारखा खळबळजनक विषय हाताळणारी ही कादंबरीही गाजणार असे अनुमान काढायला हरकत नाही.

□ □ □

---

## जाणीव !

कर्मवीर भाऊराव पाटलांना चहा पिताना पाहून त्यांच्या एका जुन्या स्नेह्याने आश्चर्याने विचारले, 'आपण चहा कधीपासून सुरू केलात ?' भाऊराव म्हणाले, 'मुंबईला गेलो असताना एक जुना स्नेही भेटला. प्राथमिक शाळेत शिक्षक असलेल्या त्या गृहस्थाने मोठ्या आस्थेने मला घरी नेले. मी चहा घेत नसल्याने चहाचा कप समोर आल्यावर माझी पंचाईत झाली. माझ्याबरोबर आलेल्या गृहस्थाने 'भाऊराव चहा घेत नाहीत फक्त दूध घेतात' असे सांगितले. तेव्हा शाळामास्तरने पत्नीजवळ ग्लासभर दूध मागितले. तेव्हा ती माऊली संतापून म्हणाली, 'चहा घेत नाही म्हणे – कोण बोकड धरून आणलाय कुणास ठाऊक.' भाऊरावांनी हा संवाद ऐकला आणि तेव्हापासून समोर आलेल्या चहाचा स्वीकार करण्यास सुरवात केली.

– एस्.

---

**डॉ. नरेंद्र दाभोळकर**

# हृदय आणि कॉकटेल पार्टी

डॉक्टर असलेल्या त्या माझ्या मित्राच्या भिवया आश्चर्याने वर गेल्या, ' म्हणजे तू ड्रिंक्स घेतली नाहीस ? अरे हाय कंबख्त ! तूने तो पी ही नही.' मग त्याने मला त्यापासून होणाऱ्या फायद्यावर एक व्याख्यान सुनावून माझ्या वैद्यकीय ज्ञानात भर टाकली.

शिणवटा जाण्यासाठी आणि तरतरी येण्यासाठी सर्व जगात मद्याचा उपयोग केला जातो. पण यापुढेही जाऊन त्याच्यामुळे काही रोग बरे होतात ही विधाने सर्वस्वी अतिशयोक्तीची असतात. या प्रश्नाचा सांगोपांग अभ्यास केलेल्या टेकचंद समितीच्या अभ्यासाप्रमाणे या जगातला एकही रोग मद्यापासून दूर होत नाही.

अनेक चांगले खेळाडू सामन्यापूर्वी पेग मारून जातात, सर्व शरीरात रक्त खेळविणारे हृदयाचे पंपासारखे होणारे काम त्यामुळे अधिक जोमदारपणे होते आणि अधिक रुधिराभिसरणाने तरतरी वाढते असा एक दावा या संदर्भात केला जातो. हृदयाचे काम व रक्ताभिसरणक्रिया याचा नवीन पद्धतीने अभ्यास काही हॉस्पीटलमधून छोट्या गटात केला गेला. काही दिवस मद्यपानाची सवय ज्यांना होती त्यापैकी बहुतेकात हृदयाची कार्यक्षमता कमी झाल्याचे आढळून आले. एका स्पंदनात (Beat) व्यायामाच्यावेळी सर्वसामान्याचे हृदय जेवढे रक्त शरीराबाहेर फेकते (Stroke Volume) त्यापेक्षा या लोकांच्या हृदयातून तेवढ्याच व्यायामातून एका स्पंदनात शरीराला होणारा रक्ताचा पुरवठा निश्चितच कमी असतो.

जेवणापूर्वी अवघी एक औंस व्हिस्की घेतली तर जेवणानंतर सुमारे दोन तासात शरीरातील स्निग्ध पदार्थाचे प्रमाण खूपच वाढलेले आढळते. मुळातच लठ्ठ असलेल्या वा लठ्ठ नसलेल्या दोन्ही व्यक्तींच्यामध्ये हा फरक आढळून येतो. माणूस जसजसा वृद्ध होत जातो तसतसे त्याच्या रक्तवाहिन्यांचा लवचिकपणा कमी होत जातो. रक्तवाहिन्यांचा आतील बाजूचा व्यास कमी होऊन रक्तप्रवाहास त्याप्रमाणात अडथळा येऊ लागतो. या बदलास Atherosclerosis असे संबोधण्यात येते. या रोगाचे निश्चित कारण अजूनही माहीत नाही. पण रक्तवाहिन्यांच्या आतील बाजूस काही पदार्थांचा थर बसतो हे याचे प्रमुख कारण समजण्यात

येते आणि या पदार्थात वरील स्वरूपाचे स्निग्ध (Lipaemic) पदार्थ सगळ्यात अधिक आढळतात. मद्यपानाने Lipemia चे वाढणारे प्रमाण आणि वरील रोगाचे युरोपात अधिक आढळणारे प्रमाण याचा सहज संबंध लावता येतो. Athero-sclersis या रोगाचे नाव आपण सर्वसामान्यपणे फारसे ऐकत नाही. पण वृद्ध माणसात हृदयाला वा मेंदूला अचानकपणे रक्तपुरवठा कमी होऊन जीवाला जो धोका उत्पन्न होतो त्याचे एक मूळ कारण आहे रक्तवाहिन्यांची अंतर्बाह्य परिस्थिती बदलून टाकणारा हा रोग आणि त्याच्या उत्पत्तीचे एक प्रमुख कारण आहे ड्रिंक्स!

पण जेवणापूर्वीच्या कॉकटेल पार्टीत एवढा विचार करायला सवड असते कुठे?

## अन्न साठविण्याची समस्या

अन्न निर्माण करणे हा एक प्रश्न आहे.

निर्माण झालेले अन्न व्यवस्थित टिकविणे ही दुसरी समस्या आहे.

दरवर्षी लाखो टन धान्याचा उंदीर फडशा पाडतात, वाळवी हजारो टनाचा भुगा करते, तपमानातले बदल, अपुरी जंतुनाशके, साठविण्याच्या पद्धतीतले दोष यामुळे अक्षरश: लाखो धान्याची पोती वाया जातात.

कुठल्याही आघाडीवरचा अपव्यय विज्ञानाला नामंजूर आहे. अन्न आघाडीवरचा तर विशेषत्वाने.

'क्ष' किरणाच्या सहाय्याने अन्न टिकवण्याचा प्रयोग आज शास्त्रज्ञ करत आहेत—प्लॅस्टिकच्या पिशवीत बंदिस्त केलेल्या विविध अन्नपदार्थांवर कमी काळ पण तीव्र किरणांचा मारा केला जातो. यानंतर ते अन्न कितीही काळ सुरक्षित राहू शकते. कॅनडामध्ये धान्य, बटाटे, कांदे टिकवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर याचा उपयोग केला जातो.

ही पद्धत जेवढ्या चटकन जगामध्ये पसरली जाईल असे वाटत होते तसे झाले नाही. त्याला काही कारणे आहेत.

पहिले म्हणजे अनेक मांसाहारी पदार्थ निर्जंतुक होऊन दीर्घकाळ टिकण्यासाठी क्ष किरणांचा जेव्हा मारा करावा लागतो तेवढ्याने त्या पदार्थाचा वास आणि चवच बदलून जाते. खाण्याच्या लायकीचे हे पदार्थ रहात नाहीत.

मोठ्या प्रमाणावर ही संपूर्ण यंत्रणा उभी करण्यासाठी जो खर्च येतो ते दुसरे कारण, क्ष किरण निर्मितीची प्रचंड साधने, त्यापासून इतरांना होणारे धोके टाळण्या-साठी सुरक्षिततेचे उपाय, धान्य हलविण्यासाठी लागणारी विशिष्ट यंत्रणा हे सर्व फार खर्चिक असते. अर्थातच छोट्या प्रमाणावर हे प्रयोग करण्यापेक्षा मोठ्या प्रमाणा-वर ही यंत्रणा उभारणे हे तुलनेने कमी खर्चाचे असते. शिवाय एकदा ती उभी केल्यानंतर होणारा नेहमीचा खर्च हा बराच कमी असतो. कारण क्ष किरण

निर्मितीचा स्रोत हा बरीच वर्षे बदलावा लागत नाही.

तिसरे कारण मात्र खरोखरच विचार करावयास लावणारे आहे.

या पद्धतीने साठविलेल्या पदार्थामुळे कॅन्सर निर्माण होण्याची शक्यता बोलून दाखविली गेली. या ना त्या स्वरूपात क्ष किरणाचा कळत न कळत शरीरावर झालेला मारा हें कॅन्सरचे श्रेष्ठ कारण समजण्यात येते आणि त्यात तथ्यही आहे. त्यामुळे अशा स्वरूपाच्या अन्नपदार्थातून कर्क रोग निर्माण होण्याची शक्यता अगदीच नाकारता येणार नाही.

या मुद्यावर निर्णायक मत देणे आज शक्य नाही. शास्त्रीय जगतातल्या वादाचा हा विषय आहे. अनेक प्रयोग होत आहेत.

गाजरे, टॅमेटो आणि इतर काही वनस्पतींच्या पेशी ह्या त्यांच्या वाढीला आवश्यक अशा नारळाचा रस व इतर औषधे यापासून तयार केलेल्या कृत्रिम वातावरणात (Tissue culture) वाढविल्या गेल्या आणि नंतर त्यावर क्ष किरणाचा योग्य तो मारा केला गेला. या सजीवपेशींच्या वाढीची शक्ती एकदम कमी झाली. काही फळांवर वरील प्रकारेच प्रयोग करून त्यावर वाढविलेल्या फळमाशांचा अभ्यास करण्यात आला. त्या माशांच्या पुढील पिढीत अनेक विकृती आढळून आल्या. साखरेवर केलेल्या तीव्र माऱ्यानंतर वाढीला प्रतिबंध करणारे पदार्थ साखरेत निर्माण झालेले आढळून आले.

परंतु लंडन विद्यापीठाचे फार्मसीचे प्रमुख डॉ. कुक आणि चर्चिल हॉस्पीटलचे जीवशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. रॉजेर बेरी यांचे मत यापेक्षा वेगळे आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे कृत्रिम माध्यमात वाढविलेल्या थोड्या पेशींवर क्ष किरणांचा होणारा परिणाम याचा ते पदार्थ पचवल्यानंतर त्याचा मानवी शरीरावर होणारा परिणाम याच्याशी तेवढा सरळ संबंध असत नाही. कृत्रिम वातावरणात प्रत्येक पेशीला तीव्र स्वरूपाचे क्ष किरण सरळ अंगावर घ्यावे लागतात. पण माणसात ही तीव्रता खूपच कमी होते. याचे कारण हे पदार्थ प्रथमत: पचनसंस्थेतून योग्य त्या रासायनिक क्रिया होऊन पचवले जातात आणि त्यानंतर त्या पदार्थाचे संपूर्ण ज्वलन (Metabolism) होईपर्यंत तो अनेक प्रक्रियेतून जातो. या सर्व पद्धतीमुळे क्ष किरणापासून होणाऱ्या घातक परिणामांचा संभव खूपच कमी होतो.

वनस्पतींच्या पेशी व माशा यापेक्षा माणसाशी थोडे साम्य असलेल्या उंदीर, कबुतरे, माकडे या स्वरूपाच्या सस्तन प्राण्यांवर हे प्रयोग केले गेलें. प्राण्यांच्या सुमारे तीन पिढ्यांपर्यंत तरी कोणतीही विकृती वा वाईट परिणाम आढळून आले नाहीत.

जगातील शास्त्रज्ञांचे सर्वसाधारण मत या परिस्थितीचा वापर अधिकाधिक करण्याकडे झुकत आहे.

अर्थात हा खरा खटाटोप आहे अन्न टिकवण्याचा. पैसे टिकवण्याची काळजी करण्यासाठी ते प्रथम मिळवावे लागतात ना ?

□ □ □

# रंगभूमि

## सखी शेजारणी

'काचेचा चंद्र' या नाटकामुळे नाटचरसिकांचे लक्ष श्री. सुरेश खरे या तरुण नाटककाराकडे अपेक्षेने वळले आहे. ६ सप्टेंबर १९७० रोजी, 'स्वरसंवाद' या संस्थेने 'सखी शेजारणी' हे सुरेश खऱ्यांचे नवे, 'काचेचा चंद्र' या नाटकापेक्षा अगदी वेगळे नाटक सादर केले. हे नाटक संपूर्ण स्वतंत्र नाही. 'सेवन इयर इच' या टॉम इवेल–मेरिलिन मन्रो यांच्या भूमिका असलेल्या लोकप्रिय चित्रपटाच्या कथाकल्पनेवर 'सखी शेजारणी' आधारलेले आहे. श्री. खरे यांनी त्यांच्या नाटचलेखनाच्या प्रारंभीच 'फॅनी' या कथेचे रूपांतर 'सागर माझा प्राण' या नावाने केले होते. परंतु या नव्या नाटकात आढळते तसे अकृत्रिम रचनारूप 'सागर माझा प्राण' मध्ये त्यांना साधले नव्हते.

'सखी शेजारणी' या नाटकाचा मूलाधार वर व्यक्त केल्यावर ते विनोदी नाटक आहे हे वेगळे सांगायलाच नको. पण वेगळे आवर्जून सांगायला हवे ते हे की या निर्भर विनोदी कथेला, मराठी रूपांतरात, उपहासिका बनवण्याचा यत्न न करता लेखकाने तिच्या आधारे एक निखळ विनोदी नाटक निर्माण केले आहे; आणि दिग्दर्शकाने फार्सच्या द्रुत गतीचा मोह टाळून लेखकाच्या नर्म विनोदाला साजेल, खुलवेल अशा मोहकपणे ते दिग्दर्शित केले आहे.

तसे पाहिले तर या नाटकाचे कथानक अगदी साधे आहे. माधवराव जोशी (शरद तळवलकर) नावाच्या एका मध्यमवर्गीय, सरळमार्गी गृहस्थाची पत्नी (सौ. मंगला संझगिरी) बऱ्याच वर्षांनी माहेरी जाते; आणि त्याचवेळी एक सुंदर मॉडेल गर्ल (पद्मा चव्हाण) त्याच्या शेजारी राहायला येते. पुढील कथा सांगायला पाहिजे

सौ. पुष्पा भावे

असे नाही, हे कथासूत्र वाचल्यावर वाचकांना, सध्या लोकप्रिय झालेल्या 'प्रीती परि तुजवरती' या नाटकाचे स्मरण होणे साहजिक आहे. परंतु श्री. राजाराम हुमण्यांच्या उपरिनिर्दिष्ट नाटकाचे स्वरूप जितके कृत्रिम आणि अट्टाहासी आहे तितकेच श्री. खऱ्यांच्या नाटकाचे स्वरूप सहजललित आहे. 'प्रीती परि तुजवरती' या नाटकातील पात्रांप्रमाणे 'सखी शेजारणी' नाटकातील माधवरावही प्रेक्षकांशी बोलतात. पण तो खराखुरा सुहृदसंवाद असतो; कृत्रिम व्याख्याने नसतात. 'सखी शेजारणी' या नाटकातील एक सूत्र त्याच्या नर्म विनोदी प्रकृतीला फार उपकारक ठरले आहे. मराठी विनोदी नाटकात, प्रेमत्रिकोणातील 'दुसरी बाई' नेहमी काहीशी गळेपडू दाखवलेली असते. परंतु या नाटकातील मॉडेल गर्ल मोकळी असली तरी तिला तिच्या कारकून शेजाऱ्यात फारसे स्वारस्य नाही. नाटकात प्रत्यक्ष दिसणाऱ्या बऱ्याच घटना हे माधवरावांच्या मनाचेच खेळ आहेत. या नाटकातील घटनांच्या गोंधळात भर टाकणारी दोन पात्रे आहेत. त्यातील कारकून मित्राचे तोतरे पात्र (मधू आपटे) फारसे महत्त्वाचे नाही. मात्र मानसोपचारतज्ञाचे पात्र (सखाराम भावे) विनोदनिर्मितीसाठी अत्यंत प्रयोजक आहे. परंतु अजून भारतीय समाजात मानसोपचार तज्ज्ञांचा सल्ला ही प्रथा रुळलेली नसल्याने युरोपियन लिखाणात ज्या सहजपणे हे पात्र येऊ शकले असते त्या सहजतेने ते मराठीत येऊ शकत नाही. श्री. सखाराम भावे यांनी ही भूमिका चांगली करूनही संपूर्ण रचनेत हे विनोदी पात्र सहज सामावून जात नाही.

शरद तळवलकरांना या नाटकात प्रमुख भूमिका मिळालेली आहे. एखाद्या नाटकामधील दुय्यम विनोदी पात्राची भूमिका करणे निराळे आणि विनोदी प्रमुख भूमिका करणे निराळे. श्री. तळवलकरांनी ज्या कलात्मक संयमाने ही भूमिका सादर केली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणे आवश्यक आहे. ...पद्मा चव्हाण ही नटी सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे; अभिनयासाठी नाही. किंबहुना तिचा चेहरा काहीसा भावशून्य आहे. ही गोष्ट तिच्या दोषास्पद आवाजामुळे अधिकच जाणवते. परंतु प्रस्तुत नाटकात दिग्दर्शक श्री. नंदकुमार रावत्यांनी पद्माबाईंकडून हे हलकेफुलके काम ज्या सफाईने करून घेतले आहे ती पाहिली म्हणजे त्यांच्या दिग्दर्शनकौशल्याचा प्रत्यय येतो.

एखाद्या तरुण मराठी नाटककाराला विनोदी नाटकात, शाब्दिक कोट्या, प्रचलित संदर्भांवर आधारलेला उपहास, द्व्यर्थी चावट वाक्ये यांचा मोह सहसा टाळता येत नाही. श्री. सुरेश खऱ्यांनी तो टाळला. प्रयत्नाविना टाळला. परिणामी अत्यंत प्रसन्न संवाद, निर्भर विनोदी रचना, दिलखुलास वातावरण यामुळे 'सखी शेजारणी' हे नाटक पाहताना 'संशयकल्लोळ' सारख्या दजदार सुखात्मिकेचे स्मरण होते. सामाजिक उपहासावर आधारलेल्या जड शिक्षकी विनोदाने बेभानलेल्या मराठी प्रेक्षकाला श्री. सुरेश खऱ्यांनी जरा वेगळा विनोद दाखवण्याचा कौतुकास्पद प्रयत्न केला आहे. त्यांचे आभार आवर्जून मानायला हवेत. ◻ ◻ ◻

## चित्रपट

# भाई-भाई

सुनील दत्त–जुळ्या भावांच्या दुहेरी भूमिकेत. एक विचारप्रधान साहित्य लिहिणारा कोमल हृदयाचा लेखक कवी दीप. दुसरा मनाने चांगला, सुविचारी. पण चुकीच्या मार्गदर्शनाने वाममार्गाला लागलेला दरोडेखोर अशोक.

आशा पारेख–धनसंपन्न बापाची एकुलती एक लाडकी कन्या. नृत्यनिपुण, काव्य-प्रेमी, देखणी वगैरे वगैरे. कवी सुनील दत्तवर जीव टाकणारी, त्याच्या दर्शनाने उत्फुल्ल होणारी, विरहाने व्याकुळ होणारी.

प्राण–भूमिका नेहमीची. स्टाइल कोटाच्या हातात अडकवलेला रुमाल मधूनच नाकावर फिरवण्याची. आशा पारेखवर व तिच्या वडिलांच्या इस्टेटीवर डोळा. एका मोठ्या दरोडेखोर टोळीचा नायक.

मुमताज–प्राणच्या लुटारू टोळीतील नायिका. मस्त भरलेली. तितकीच तिखट जिभेची व सफाईदार हाताची. दरोडेखोर सुनील दत्तवर फिदा.

महमूद–सुनील दत्तचा (दीपच्या भूमिकेतील) जिगरी दोस्त. बेकरीत पाव भाजण्याचे व तो घरोघर वाटण्याचे आणि फावल्या वेळात बेकरीवाल्याच्या मुलीशी प्रेमाचे चाळे करण्याचे काम तो करतो.

या सगळ्यांची कथासूत्रात एकमेकाशी गाठभेट करून देणाऱ्या पूरक भूमिकात लीला चिटणीस, मनमोहन कृष्ण, जीवन वगैरे अनुभवी, मुरब्बी मंडळी.

याशिवाय स्वरसाज शंकर-जयकिशन यांचा. दिग्दर्शन राजा नवाथे यांच्यासारख्या कसबी मुरलेल्या दिग्दर्शकाचे.

असा सारा संच व इतर साऱ्या घटक गोष्टी चांगल्या असूनही 'भाईभाई'ची भट्टी जमलेली नाही. याचे कारण लेखक–दिग्दर्शक यांच्या मनातील भर कशावर द्यायचा याबाबतचा गोंधळ. परिस्थितीच्या फेऱ्यात सापडलेली तरुण मंडळी, त्यांना जर नेमक्या अशा गोंधळलेल्या वेळी चुकीचे मार्गदर्शन झाले तर कशी भरकटतात व याला आपली सामाजिक परिस्थितीच कशी जबाबदार असते हे विशद करण्याचा या चित्रपटाचा हेतू आहे. पण या अनुषंगाने चित्रपटाचे कथानक मांडताना त्या-मध्ये आगलेला कौटुंबिक भावनांचा तणावच शेवटी मूळ विषय निष्प्रभ करण्यास कारण ठरतो. दीप हा सत्प्रवृत्त (त्यालाही दुर्दैवाने आपल्या निष्ठा विकाव्या लागतात व सर्वसामान्य जनांना रुचतील अशी रहस्यकथेची पुस्तके लिहावी लागतात) आणि अशोक हा दुष्प्रवृत्त. आणि तरीही दोघांच्या भावना उदात्त.

यामुळे कौटुंबिक संघर्षालाही धार येत नाही. वाटते ती दोघांविषयी सहानुभूती. मग यामध्ये दोषी ठरते ती सामाजिक परिस्थिती पण ती तर या चित्रपटात इतकी अवास्तव आहे की चित्रपटातील मूळ हेतूवरचा जोरच नाहीसा होतो. आणि मग उरते एक करमणूकप्रधान चित्र. पण त्यातही वर उल्लेखिलेल्या परिस्थितीच्या आधारे निर्माण झालेल्या इतक्या घटना वारंवार डोकावतात की निर्भेळ मनो-रंजनही होत नाही.

तरीही हा चित्रपट इतर अनेक हिंदी चित्रपटांपेक्षा सरस आहे. याचे कारण सुरुवातीसच उल्लेखिलेली जबरदस्त मंडळी. या दृष्टीने दिग्दर्शक राजा नवाथे यांची कामगिरी विशेष उल्लेखनीय. त्यांच्या नेटक्या, सफाईदार दिग्दर्शनाने चित्रपटाची गती छान राहिली आहे. कथाविषयाचा मूळ आशय व करमणूक यांचे चित्रपट–घटनांतून परस्परांवर आक्रमण चालू असतानाही कथानक सतत पुढे सरकत राहते. त्यांना तितकीच साथ मिळाली आहे सुनील दत्तकडून. कवी आणि दरोडेखोर या अगदी परस्परविरोधी प्रकृतीच्या भूमिका त्याने उत्कटतेने वठविल्या आहेत. त्याच्या अभिनयातील सुधारणा निश्चितपणे जाणवते. अनुक्रमे याच दोन्ही प्रकृतीच्या भूमिका (छाया, सुजाता आणि मदर इंडिया) त्याने पूर्वी केल्या आहेत. यावेळचे त्याचे काम पूर्वीपेक्षा निश्चितच जास्त उत्कट आहे.

विशेषत: अखेरच्या प्रसंगातील कोर्टरूममधील त्याच्या निवेदनाची उत्कटता व शैली दीर्घकाल लक्षात राहील.

आशा पारेख, मुमताज, महमूद, प्राण वगैरे मंडळी कोठेही उणी पडत नाहीत.

शंकर जयकिशन यांचे संगीत समाधानकारक आहे. ‘सपेरा बीन बजा–मैं नाचुंगी’ या गाण्याची अतिशय जलद, धावती चाल फारच चांगली वाटली. (‘बोल रे कठपुतली’ किंवा ‘हरे काच की चुडीया’ या गाण्यांसारखीच) या वेळचे आशा पारेखचे नृत्यदृश्यही तितकेच चांगले आहे. पण ते या चित्रपटात आले कोठून? दुसऱ्या एखाद्या चित्रपटातले रीळ चुकून ‘भाईभाई’ला जोडले गेले असावे असे वाटण्याइतके ते चित्रपटबाह्य संदर्भरहीत वाटते.

– मुंबईकर



मुंबईच्या साऱ्या प्रश्नांवर उतारा म्हणजे जुळी मुंबई !
कोकण-विकासाची नांदी म्हणजे जुळी मुंबई !
जुळी मुंबई झालीच पाहिजे ! झालीच पाहिजे !

मुंबईकरांचे हाल दुप्पट करणारी जुळी मुंबई !
मयनगरी जुळी मुंबई !
तिचा विकास, पण बाकी महाराष्ट्र भकास !
कोकणचं शोषण पुरेपूर करणारी जुळी मुंबई !
ती झाली तर महाराष्ट्रात रक्ताचे सडे पडतील !

थोडक्यात

## विरोधाच्या भोवऱ्यात
## सापडलेली जुळी मुंबई

सु. ल. सोमण यांनी पनवेल, उरण या भागात जाऊन
अनेकांच्या मुलाखती घेऊन तयार केलेला विस्तृत लेख.
माणूस : बुधवार : ७ ऑक्टोबर अंक

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M-H 649



" साहेब, हे आपलं भाषण जातीयवाद्यांचा जळजळीत धिक्कार करणारं अन् हे निवडणूक मोहिमेत करायचं. घोटाळा होऊ नये म्हणून पहिलं तांबड्या शाईत टाईप केलंय्..."